नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी



श्रीमान् बाळकृष्ण गणेश तथा बाबासाहेब खापर्डे,
अध्यक्ष, विदर्भ साहित्य संमेलन, अधिवेशन अठरावें, तुमसर

...ल्या
करण्या-
...१६ रोजीं
करावी,
...ोच सभा,
...डे

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ

विशेष साधारण सभेची सूचना

रविवार दिनांक १८-१२-५५ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेने दिलेल्या आदेशानुसार, घटना समितीने सुचविलेल्या घटना दुरुस्तीच्या ठरावावर विचार करण्यासाठी, घटना नियम १० आणि २२ अनुसार, रविवार दिनांक २९ जानेवारी १९५६ रोजीं दुपारी दोन वाजतां केन्द्रीय कार्यालयांत, विशेष साधारण सभा भरेल.

तरी ह्या सभेला सर्व सभासदांनी अवश्य उपस्थित राहण्याची कृपा करावी, ही विनंती.

विशेष सूचना--गणपूर्तीच्या अभावीं ही सभा स्थगित झाल्यास, तीच सभा, त्याच जागीं, त्याच दिवशीं दुपारीं २-३० वाजतां भरेल.

दि. १८ डिसेंबर १९५५
केंद्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता,
सीताबर्डी, नागपूर १

ल. वि. पांढरीपांडे
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
श्री. दि. ब. पंडित

संपादक मंडळ :
डॉ. ना. के. महाजन
श्री. तु. ना. काटकर
श्री. म. अ. चान्सरकर
श्री. मा. नी. गलगलीकर
श्री. रा. ना. घाटोळे

वर्ष १० वें : अंक ९ वा

जानेवारी १९५६

संपादकीय

युगवाणीचा हा सम्मेलनांक हा कांही विशेषांक नव्हे. हा अंक जरा लौकर प्रसिद्ध होत आहे आणि यांत अध्यक्षीय भाषण प्रसिद्ध होत आहे हेच याचे विशेष.

यंदा विदर्भ साहित्य सम्मेलन तुमसरला भरत आहे. तुमसर म्हणजे मँगनीजच्या खाणी, विडयाचे कारखाने आणि तांदुळाची बाजारपेठ ह्यासाठी प्रसिद्ध. येथे साहित्याचा परामर्श घेतला जावा आणि साहित्यिकांना अतिथ्यासाठी पाचरण केलें जावें, हें सकृद्दर्शनीं विचित्र वाटावें ह्यांत नवल नाही. भूगोलाच्या पुस्तकांत गावाची प्रसिद्धी त्याच्या आर्थिक साधनसमृद्धीने वर्णिली जावी हें अर्थप्रधान काळाला साजून दिसत असलें तरी गेला इतिहास बदलण्याचें सामर्थ्य प्रत्यक्ष काळालाहि नाही. तुमसरच्या परिसराचा इतिहास साहित्याच्या दृष्टीने भरदार आहे म्हणून तेथें सम्मेलन भरण्यांत एकप्रकारचें औचित्य आहे. ह्या औचित्याचा सविस्तर निर्देश अध्यक्षीय भाषणांत आहेच.

ह्या दृष्टीने तुमसरला सम्मेलन होण्यांत औचित्य तर आहेच; पण लक्ष्मीने सरस्वतीला केलेलें हे आवाहन सरस्वतीला गौरवास्पद आणि लक्ष्मीला भूषणावह आहे. ज्या दोघांत व्यवहार व्हायचा त्या दोघांनाहि तो शोभादायक झाला की त्या व्यवहाराला सुभगताच येते. त्यांत हीणकसपणा गवसायचाच नाही.

म्हणून तुमसरच्या विदर्भ साहित्य संघाच्या शाखेचें अभिनंदनें करायला हवें आणि ह्या सम्मेलनाला सुयश लाभावें अशी प्रार्थना करायला हवी. आम्ही दोन्ही गोष्टी आनंदाने करीत आहोंत.

अनुक्रमणिका

कठोपनिषद्

डॉ. के. ल. ऊर्फ भाऊजी दफ्तरी

टिप्पणें--ऋग्वेदसंहितेंत ४।४०।५ येथे हाच श्लोक आहे पण त्यांत तेथे "बृहत्" हा शब्द नाही. असाच श्लोक वा. सं. १०।२४; १२।१४ तै. सं. ३।२। १०।१ शतपथ ब्राह्मण ६।७।३।११ येथेहि आहे. सद् म्हणजे राहणें ह्या धातूचे उपपद समास येथे पुष्कळच आहेत. ऋ म्हणजे जाणें, हालणें ह्या अर्थाचा धातू आहे, त्यापासून "ऋत" हा शब्द झाला आहे. त्याचा अर्थ हालणारा असा आहे. अर्थात् "ऋत" म्हणजे हालणारे जंगम प्राणी, हालणारा प्रवाह किंवा नदी, आणि "वाढणारे किंवा विकसणारे" असा घेतां येतो. जीव हा विकसलेलें ब्रह्मच होय असा ह्या श्लोकाचा भाव आहे. मुंडकांत १।७-८ येथेहि ह्या श्लोकांत सांगितलें तसेंच सांगितलें आहे. "शुचि", "हंस", "वसु", "होता" ह्यांचे अर्थ मागील टीकाकारास अनुसरूनच आम्ही केले आहेत. "वेदि" ह्याचा अर्थ "अग्नि" ह्याशीं जुळेल आणि "दुरोण" ह्याचा अर्थ "अतिथि" ह्याशीं जुळेल असा केला आहे. "बृहत्" म्हणजे "ब्रह्म" असा अर्थ घेतला आहे तोहि योग्य आहे. कारण "बृंह" किंवा बृह म्हणजे वाढणें ह्या पासूनच "मोठा" ह्या अर्थाचे "ब्रह्म" आणि "बृहत्" हे दोनहि शब्द झाले.

वल्ली ५ श्लोक ३-४

ऊर्ध्वं प्राणमुन्नयति अपानं प्रत्यगस्यति ।
मध्ये वामनमासीनं विश्वे देवा उपासते ॥३॥
अस्य विस्रंसमानस्य शरीरस्थस्य देहिनः ।
देहाद्विमुच्यमानस्य किमत्र परिशिष्यते ॥
एतद्वैतत् ॥४॥

अर्थ--शरीराच्या मध्य भागांत [मध्ये] बसलेला जो [यः(अध्याहृत)] लहानसा [वामन] जीव प्राणाला (उच्छ्वासास) वर ओढतो आणि अपानास खाली ढकलतो, त्याला सर्व इंद्रियें [विश्वे देवा] उपासतात म्हणजे उपभोग देतात. ॥३॥ शरीरांत असलेला [शरीरस्थस्य] हा जीव [अस्य देहिनः] जेव्हा घसरतो [विस्रंसमानस्य] आणि देहाला सोडून जातो [देहाद्विमुच्यमानस्य] तेव्हा येथे काय शिल्लक राहतें ? जें शिल्लक राहतें तेंच तें ब्रह्म होय. ॥४॥ ह्या दोन श्लोकांत "जीव" आणि ब्रह्म ह्यांचें अनुक्रमें वर्णन केलें आहे.

टिप्पणें--"यः" हें पद अध्याहृत न मानतां, "उन्नयति" आणि "अस्यति" हीं सप्तम्यंत विशेषणें "मध्ये" ह्याचीं मानूनहि तिसऱ्या श्लोकाचा अर्थ करतां येतो.

चवथ्या श्लोकांतील षष्ठ्यंत पदांची षष्ठी भावे षष्ठी होय.

वल्ली ५ श्लोक ५

न प्राणेन नापानेन मर्त्यो जीवति कश्चन ।
इतरेण तु जीवंति यस्मिन्नेतावुपाश्रितौ ॥५॥

अर्थः--उच्छ्वासाने किंवा श्वासाने कोणीच मर्त्य जिवंत रहात नाही. परंतु ज्यावर हे श्वासोच्छ्वास अवलंबून आहेत, त्या दुसऱ्यामुळे [इतरेण] म्हणजे जीवामुळे ते जिवंत राहतात. ॥५॥ ह्या श्लोकांत जीवाचें महत्त्व वर्णून पुढील श्लोकांत मरणाचे वेळीं तो जीव कोठे जातो ह्याचें वर्णन केलें आहे.

वल्ली ५ श्लोक ६-७

हंत त इदं प्रवक्ष्यामि गुह्यं ब्रह्म सनातनम् ।
यथा च मरणं प्राप्य आत्मा भवति गौतम ॥६॥
योनिमन्ये प्रपद्यंते शरीरत्वाय देहिनः ।
स्थाणुमन्येऽनुसंयंति यथाकर्म यथाश्रुतम् ॥७॥

अर्थ—येथपर्यंत ब्रह्माचें व जीवाचें वर्णन केलें आणि आता [च] हे गौतमा नचिकेता, मरणानंतर [मरणं प्राप्य] जीवात्म्याला [आत्मा] कोणती गति प्राप्त होते [यथा भवति] त्याविषयी गुह्य सनातन वेदांतील ज्ञान [ब्रह्म] मी तुला [ते] हें [इदम्] म्हणजे पुढील श्लोकांत सांगतों. ॥६॥ मरणानंतर कोणी जीव [अन्ये देहिनः] शरीर धारण करण्याकरितां [शरीरत्वाय] गर्भाशयांत [योनिम्] प्रवेश करतात म्हणजे पुनः जन्म घेतात. कांही दुसरे जीव [अन्ये] ब्रह्माला [स्थाणुम्] प्राप्त होतात. हें त्यांच्या त्यांच्या कर्मांप्रमाणे व ज्ञानाप्रमाणे घडतें [यथाकर्म यथाश्रुतम्]. म्हणजे ज्यांचें ज्ञान व कर्में चांगलीं ते ब्रह्माला जातात म्हणजेच पुनः जन्म घेत नाहीत आणि ज्यांचें ज्ञान आणि कर्में चांगलीं नाहीत ते पुनः जन्म घेतात. ॥७॥

टिप्पणें—"ब्रह्म" म्हणजे वेद म्हणजेच वेदांतील ज्ञान असाच अर्थ येथे करावा लागतो. "ब्रह्म" म्हणजे जगाचें आदिकारण असा अर्थ येथे करणें चूक आहे. कारण ह्या ब्रह्माचें वर्णन आतापर्यंत पुष्कळ केलेंच आहे व पुढील श्लोक आत्म्याच्या दोन प्रकारच्या गतींचें वर्णन आहे. ह्यावरून "इदं ब्रह्म" म्हणजे पुढील श्लोकांतील ज्ञान हा अर्थ उघड आहे.

स्थाणु म्हणजे स्थिर असें ब्रह्म असा अर्थ करावा, म्हणजे मागे वल्ली ३ श्लोक ७-८ येथे वर्णिलेल्या दोनहि गति येथे वर्णिल्या असा अर्थ निघेल. "स्थाणु" ह्याचा असा अर्थ न केला तर, येथे मरणानंतरची एकच गति वर्णिली असा अर्थ निघेल व तें योग्य नाही; कारण मरणानंतरची गति वर्णितों असें म्हटल्यानंतर दोनहि प्रकारच्या गति वर्णणें आवश्यक आहे. म्हणून "स्थाणु" म्हणजे "वृक्षादि स्थावर भाव" असा श्री शंकराचार्यांनी केलेला अर्थ अग्राह्य आहे.

वल्ली ५ श्लोक ८-११

य एष सुप्तेषु जागर्ति कामं कामं पुरुषो निर्मिमाणः ।
तदेव शुक्रं तद् ब्रह्म तदेवामृतमुच्यते ॥
तस्मिंल्लोकाः श्रिताः सर्वे तदु नात्येति कश्चन
एतद्वैतत् ॥८॥

अग्निर्यथैको भुवनंप्रविष्टो ।
रूपं रूपं प्रतिरूपो बभूव ॥
एकस्तथा सर्वभूतांतरात्मा ।
रूपं रूपं प्रतिरूपो बहिश्च ॥९॥
वायुर्यथैको भुवनं प्रविष्टो ।
रूपं रूपं प्रतिरूपो बभूव ॥
एकस्तथा सर्वभूतांतरात्मा ।
रूपं रूपं प्रतिरूपो बहिश्च ॥१०॥
सूर्यो यथा सर्वलोकस्य चक्षुः ।
न लिप्यते चाक्षुषैर्बाह्यदोषैः ।
एकस्तथा सर्वभूतांतरात्मा ।
न लिप्यते लोकदुःखेन बाह्यः ॥११॥

अर्थ—हीं इंद्रियें निजलीं असतां [सुप्तेषु] जो कामांमागून काम निर्माण करीत म्हणजे जागृतींत भोगावयाच्या उपभोगांची तयारी करीत जागा असतो, तोच शुद्ध म्हणजे वासनादिमलरहित [शुक्र] तोच ब्रह्म, तोच अत्यानंद [अमृतम्] असें म्हणतात. त्याच्याच आश्रयाने सर्व लोक म्हणजे जागृति, स्वप्न व तुर्या ह्या अवस्था असतात आणि त्याच्यापेक्षा वरचढ कोणीच नाही. हेंच तें ब्रह्म होय. ॥८॥ एकच अग्नि जसा सर्व भुवनांत म्हणजे लाकडांमध्ये प्रवेश करून राहतो आणि प्रत्येक लाकडामध्ये [रूपं रूपं] त्या त्या लाकडाचें रूप धारण करतो [प्रतिरूपो बभूव] त्याप्रमाणे सर्व भूतांचा अंतरात्मा असलेला हा एकच परमात्मा (ब्रह्म) प्रत्येक प्राण्यांत [रूपं रूपं] त्या त्या प्राण्याचें रूप धारण करतो [प्रतिरूपो बभूव] म्हणजे गाईत गाईसारखें, घोड्यांत घोड्यासारखें व मनुष्यांत मनुष्यासारखें रूप धारण करतो आणि शिवाय बाहेरहि तो असतोच. ॥९॥ प्राण [वायुः] जसा एकच असून सर्व भुवनांत म्हणजे प्राण्यांमध्ये प्रवेश

करून राहतो आणि प्रत्येक प्राण्यामध्ये [रूपं रूपं] त्या त्या प्राण्याचें रूप धारण करतो [प्रतिरूपो बभूव] त्याप्रमाणे सर्व भूतांचा अंतरात्मा असलेला हा एकच परमात्मा (ब्रह्म) प्रत्येक प्राण्यांत [रूपं रूपं] त्या त्या प्राण्याचें रूप धारण करतो आणि [प्रतिरूपो बभूव] म्हणजे गाईंत गाईसारखें, घोड्यांत घोड्यासारखें आणि मनुष्यांत मनुष्यासारखें रूप धारण करतो आणि शिवाय बाहेरहि तो आहेच ॥१०॥ सर्व जीवांचा [लोकस्य] डोळाच असलेला म्हणजे डोळ्यांस आपल्या प्रकाशाने वस्तू दाखविणारा असलेला हा सूर्य, दृश्य वस्तूंच्या [चाक्षुषैः] बाहेरचा काळेपणा रंग; दुर्गंध वगैरे दोषांनीं [बाह्यदोषैः] लिप्त होत नाही म्हणजे दूषित होत नाही, त्याप्रमाणेच सर्व भूतांचा अंतरात्मा असलेला हा एकच परमात्मा, लोकांच्या दुःखाने लिप्त होत नाही म्हणजे दुःखी होत नाही; कारण तो जीवांचें रूप धारण करतो तरी खरोखर जीवांच्या सुखदुःखावस्थांच्या तो बाहेर आहे म्हणजे सुखदुःखावस्थाहून तो भिन्न आहे. जीवस्थितींतील सुखदुःखावस्था ह्या परमात्म्याचें स्वरूप नव्हत. परमात्म्याचें स्वरूप सुखदुःखविरहित असणें हेंच आहे, असा भाव आहे. ॥११॥

टिप्पणें--"कामं कामं निर्मिमानः" ह्याचा अर्थ "स्वप्नांतील देखावे उत्पन्न करीत" असा कोणास वाटेल पण तो चूक आहे. कारण स्वप्नांतील देखावे असत्य असतात आणि ते असत्य देखावे उत्पन्न करण्याबद्दल स्तुति कवि करील हें संभवत नाही. त्या शब्दांचा खरा अर्थ "जागृतींत विषयोपभोग घेऊन थकलेल्या शरीरास पुनः त्या उपभोगास समर्थ करणें" असाच असला पाहिजे, कारण झोपेंत खरोखर हेंच घडत असतें.

अकराव्या श्लोकांतील "बाह्यः" ह्या शब्दाने व सर्व श्लोकाने देखील हेंच दाखविलें आहे की सुखदुःखें जीवस्थितींतच असतात, व केवळ ब्रह्मस्थिति ही सुखदुःखातीत आहे.

वल्ली ५ श्लोक १२-१३

एको वशी सर्वभूतांतरात्मा ।
एकं रूपं बहुधा यः करोति ॥
तमात्मस्थं येऽनुपश्यंति धीराः ।
तेषाम् सुखं शाश्वतं नेतरेषाम् ॥१२॥

नित्योनित्यानां चेतनश्चेतनानाम् ।
एको बहूनां यो विदधाति कामान् ॥
तमात्मस्थं येऽनुपश्यंति धीराः ।
तेषां शांतिः शाश्वती नेतरेषाम् ॥१३॥

अर्थ—स्वतंत्र असलेला [वशी] जो सर्व जीवांचा एकच अंतरात्मा आहे व जो एक असून अनेक जीव बनतो, तोच स्वतःमध्ये [आत्मस्थं] आहे असें जे शहाणे मनुष्य पाहतात त्यांनाच शाश्वत सुख मिळतें; इतरांना तें शाश्वत सुख मिळत नाही. ॥१२॥ जीवांचें प्रिय करणारा [नित्य] असा हा जो एकच चेतन परमात्मा, परमात्म्यास प्रिय [नित्यांना] अशा पुष्कळ चेतन जीवांचे काम पुरवितो [विदधाति] तोच आपणांमध्ये आहे असें जे शहाणे मनुष्य पाहतात त्यांनाच शाश्वत शांति मिळते; इतरांस ती शाश्वत शांति मिळत नाही. ॥१३॥

टिप्पणें--"नित्योनित्यानां" ह्याचा "नित्यः अनित्यानां" असा पदच्छेद करून "अनित्यानां" म्हणजे विनाशिनाम् हें जीवांचें विशेषण करावें असें प्रथमदर्शनीं वाटतें, पण तें योग्य नाही. कारण जीवांना ह्या उपनिषदांत तरी अनित्य म्हणजे विनाशी मानलें नाही. शिवाय "विदधाति कामान्" ह्या विधानाशीं विनाशी किंवा अविनाशी ह्या विशेषणापेक्षा "प्रिय करणारा" व "प्रिय" हींच विशेषणें चांगलीं जुळतात आणि नित्य ह्याचा "प्रियकारी" व "प्रिय" असा अर्थ वैदिक भाषेंत आहेच. "रयिर्न चित्रासूरो न संदृगायुर्न प्राणो नित्योन सूनुः" (ऋग्वेद १।६६।१) येथील "नित्यो न सूनुः" ह्याचा अर्थ सायणाचार्यांनीहि "पुत्र इव प्रियकारी" असाच केला आहे. आणि "नित्यं न सूनुं मधु बिभ्रत उपक्रीळंति" (ऋग्वेद १।६६।२?) येथे "नित्यं न सूनुम्" ह्याचा अर्थ सायणाचार्यांनीं "औरसं प्रियं पुत्रमिव" असा केला आहे. "उपप्रजिन्वन्नुशतीरुशंतं पतिं न नित्यं जनयः सनीळाः" (ऋग्वेद १।७१।१) "नित्यं न सूनुं पित्रोरुपस्थे" (ऋग्वेद १।१८५।२) ह्या ठिकाणीं "नित्य" ह्याचा "प्रिय" असाच अर्थ आहे. ("न" म्हणजे "इव" असा अर्थ वैदिक भाषेंत आहे हें उश्लांत ठेवावें) (श्रीयुत तर्कतीर्थ कोकजे कृत धर्मस्वरूपनिर्णय, प्रकरण दुसरें, पानें ३४-३७ पहा.)

वल्ली ५ श्लोक १४-१५

तदेतदिति मन्यंतेऽनिर्देश्यं परमं सुखम् ।
कथं नु तद्विजानीयां किमुभाति विभाति वा ॥१४॥
न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं ।
नेमा विद्युतो भांति कुतोऽयमग्निः ॥
तमेवभांतमनुभाति सर्वम् ।
तस्य भासा सर्वमिदं विभाति ॥१५॥

अर्थ—ज्याला आम्ही "तत् एतत्" असें (एतद्वैतत् ह्या वाक्यांत) अनेकदा म्हटलें आहे तें ब्रह्म वर्णन करण्यास अशक्य [अनिर्देश्य] असें परम सुख आहे असें कोणी मानतात; पण खरोखर तें तसें नाही. (असा भाव आहे) कारण तें सुख त्या ब्रह्मास भासते किंवा नाही [किमुवाभाति] स्पष्ट भासतें किंवा नाही, [किमु वा विभाति] हें मीं म्हणजे जीवानें कसें जाणावें. (जाणतां येत नाही हा भाव आहे.) ॥१४॥ कारण ब्रह्माच्या त्या निद्रारूपी अद्वैत स्थितींत [तत्र] चंद्र, सूर्य, तारका, वीज किंवा अग्नि ह्यांचा प्रकाश पडत नाही. जेव्हा तें ब्रह्मच जागृतींत जीवरूपाने प्रकाशूं लागतें तेव्हाच त्यामागून त्याच्या प्रकाशाने हे सर्व प्रकाशूं लागतात. ब्रह्माचें तें अनिंदेश्य परम सुखहि जागृतींतच भासूं शकतें हा भाव आहे. ॥१५॥

टिप्पणें—हे दोन श्लोक सर्व उपनिषदांत अत्यंत महत्त्वाचे आहेत. कारण उपनिषदांनी ठरविलेलें मनुष्याचें साध्य "जागृतींतील आत्यंतिक सुख" होय असें ह्या दोन श्लोकांवरून स्पष्ट दिसतें. ब्रह्माच्या मूळच्या निद्रारूपी अद्वैत अवस्थेंत परम सुख असलें तरी त्याचें तेव्हा भान नसतें, जीवस्थितींत म्हणजे जागृतींतच त्या सुखाचें भान होतें; म्हणून "जागृतींतील आत्यंतिक सुख" हेंच मनुष्याचें साध्य ठरतें, अशी उपनिषदांची विचारसरणी आहे. तें जागृतींतील आत्यंतिक सुख, ब्रह्म आपणांतच आहे व सर्वांतच आहे असें जाणणाऱ्यास मिळतें असें मागील श्लोक बारातेरा ह्यांत सांगितलें आणि "जाणणें" हें जागृतींतच घडतें, अर्थात् परमसुखहि जागृतींतच मिळतें हें सांगण्याकरितां हे चवदा व पंधरा श्लोक दिले आहेत.

"किमु वा"—प्रश्नार्थक शब्दाशीं 'वा' जोडल्यानें त्याचा प्रश्नार्थकच अर्थ होतो. आपट्यांचा कोश पहा. जग हें कधी दिसतें व कधी दिसत नाही. अर्थात् ज्याच्या प्रकाशाने हें जग दिसतें तें ब्रह्महि कधी प्रकाशतें व कधी प्रकाशत नाही. ह्याच जागृति व निद्रा ह्या अवस्था होत. ह्या प्रत्यक्ष व सिद्ध गोष्टींस अनुसरूनच ह्या श्लोकांचा अर्थ केला पाहिजे. श्री शंकराचार्यांनी तसें केलें नाही म्हणून त्यांचा अर्थ अग्राह्य आहे.

वल्ली सहावी

वल्ली ६ श्लोक १

ऊर्ध्वमूलोऽवाक्शाख एषोऽश्वत्थः सनातनः ।
तदेव शुक्रं तद् ब्रह्म तदेवामृतमुच्यते ।
तस्मिल्लोकाः श्रिताः सर्वे तदु नात्येति कश्चन ॥
एतद्वैतत् ॥१॥

अर्थः—ब्रह्म हें वर असलेलें मूळ आणि जीव ह्या खाली असलेल्या शाखा ह्यांनी बनलेला हा अनादि

अनुक्रमणिका

[सनातन] जगद्रूपी अश्वत्थ आहे. तें मूलच [तदेव] शुद्ध म्हणजे वासनादिमलरहित [शुक्रम्], तेंच ब्रह्म, तेंच अत्यानंद [अमृतम्] असें म्हणतात. त्याच्याच आश्रयानें सर्व लोक म्हणजे जागृति, स्वप्न व तुर्या ह्या अवस्था असतात. आणि त्याच्यापेक्षा वरचढ असा कोणीच नाही. हेंच तें ब्रह्म होय ॥१॥

वल्ली ६ श्लोक २-३—

यदिदं किं च जगत्सर्वं प्राण एजति निःसृतम् ।
महद्भयं वज्रमुद्यतम् य एतद्विदुरमृतास्तेभवंति ॥२॥

भयादस्याग्निस्तपति भयात्तपति सूर्यः ।
भयादिंद्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पंचमः ॥३॥

अर्थ—ज्यापासून हें सर्व कांही [इदं किं च] जगत्, प्राण हालूं लागला असतां [प्राणे एजति-भावे सप्तमी] उत्पन्न झालें आणि ज उगवलेल्या वज्राप्रमाणे मोठें भयकारक आहे त्या ब्रह्माला जे जाणतात, ते अत्यानंदाचा अनुभव घेणारे होतात. [अमृता भवंति] ॥२॥ त्या ब्रह्माच्या भयानेच अग्नि व सूर्य तपतात, वायु वाहतो, इंद्र पाणी देतो आणि पांचवा मृत्यूहि प्राण्यांना मारतो [धावति]. ॥३॥

टिप्पणें—"प्राणो एजति" हे दोनहि शब्द सत्यम्यंत आहेत असें मानल्यानें अर्थ फार चांगला लागतो; कारण कांही उपनिषदांच्या मतें ब्रह्मापासून प्रथमतः प्राणच उत्पन्न झाला. आणि त्या प्राणाच्या हालण्याने म्हणजेच अनेक प्रकारच्या व्यापाराने जगत् उत्पन्न झालें. उदाहरणार्थ प्रश्नोपनिषद् १।४ आणि २।३ पहा.

"पंचमः"—पंचमः म्हणण्याचें कारण येथे सांगितलेले अग्नि, सूर्य, इंद्र, वायु आणि मृत्यु मिळून पांच होतात.

वल्ली ६ श्लोक ४

इहचेदशकद्बोद्धुं प्राक् शरीरस्य विस्रसः ।
ततः सर्गेषु लोकेषु शरीरत्वाय कल्पते ॥४॥

अन्वय--इह तद् (ब्रह्म) बोद्धुम् अशकत् (ततः) प्राक् शरीरस्य विस्रसः (मरणं) चेत् ततः (मरणात्) सर्गेषु लोकेषु शरीरत्वाय कल्पते. येथे पहिला "ततः" अध्याहृत घ्यावा लागतो.

अर्थ--ह्या लोकीं (म्हणजे मरणापूर्वी) तें ब्रह्म जाणूं शकला [अशकत्-लुङ्] त्या पूर्वी जर शरीराचा विनाश झाला, तर त्याला त्यानंतर [ततः] ब्रह्मानेच उत्पन्न केलेल्या लोकांमध्ये [सर्गेषु लोकेषु] शरीर धारण करण्याकरिता जन्मावें लागतें [कल्पते]. ॥४॥

टिप्पणें—विस्रसः—हें प्रथमा विभक्त्यंत नाम मानून त्याचा अर्थ "विनाश" असा मानावा. "विस्रसा" म्हणजे "विनाश" असा अर्थ आपट्यांच्या कोशांत दिलाच आहे.

श्री शंकराचार्यांनी "शरीरस्य विस्रसः (पंचमी) प्राक् इह तत् ब्रह्म बोद्धुं चेदशकत् संसार-बंधनाद्विमुच्यते, न चेदशकत् बोद्धुं ततः सर्गेषु लोकेषु शरीरत्वाय कल्पते" असा अन्वय केला आहे. ह्यांत अध्याहृत पदें पुष्कळच आहेत. त्यापेक्षा आमचा अन्वय चांगला, कारण त्यांत अध्याहृत पद "ततः" हें एकच आहे.

मध्यप्रांताच्या इतिहासाचीं साधनें

काळु घराण्यांतील कागदपत्रें

शकर गोविंद चट्टे

[युगवाणीच्या मागील अंकांत जे कागद प्रसिद्ध झाले ते कागद काळु घराण्यांतील असून तेथें ग्रामजोशी घराण्यांतील कागदपत्रें असें चुकीने पडलें आहे. काळु घराण्यांतील आतापर्यंतचे कागद श्रीमंत त्र्यंबकराव उर्फ दादासाहेब काळु यांच्या संग्रहांतील असून यापुढील कागद श्रीमंत बाबासाहेब काळु संस्थान वाशीम यांच्या संग्रहांतील आहेत. हीं कागदपत्रें प्रसिद्ध करण्यास परवानगी दिल्याबद्दल मी उभयतांचा आभारी आहें. हीं.पत्रें प्रसिद्ध करतांना आरंभीं परिचयात्मक टीप द्यावी अशी कांही मित्रांनी सूचना केली. परंतु अशा टीपा देतांना पत्रांचा जितका अभ्यास करावयास वेळ पाहिजे तितका सध्या वेळ नाही कारण प्रत्यहीं नवीन कागद उपलब्ध होत आहेत. त्यांच्या नकला करणें, वाचन करणें हें काम अत्यंत जिकिरीचें आहे. तेव्हा हीं साधनें ग्रंथरूपाने प्रसिद्ध करावयाचा योग आल्यास सविस्तर टीपा देतां येतील.]

पत्र क्रमांक १

श्रीराम

पैवस्ती छ. ५ जमादिलावल

सन १२१३

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामाजीपंत दादास्वामी गोसावी यासी• सेवक पांडुरंग गणेश सा. नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता. छ. ३ माहे जमादिलावल जाणुन स्वकीये लेखन करणे. विशेष तुम्ही जासुदाबरोबर पत्र पाठविले ते पोहचून सविस्तर मजकूर समजला. लिहिले की रा गोविंदराव त्रींबक त्या प्रांती आहेत त्यास मा. नीले गावोगाव रोखेमसाले करितात आणि फौजेचा उपसर्ग मनस्वी. येविशीइ राव म॥ याजला येक पत्र की डोणेगाव व हिवर वगैरे यासी उपसर्ग न लागावा. त्यास याजपूर्वी तुमचा जासुद आला होता त्याजबरोबर रावमजकूर याजला पत्र लिहिण्यांत आले आहेत ते पोहोचले असल. तर ते पत्र व येक ग्रहस्त त्याजकडे पाठवावा म्हणजे उपसर्ग होणार नाही. आणि येविषयी तेही समजूनच आहेत की हे गाव अमक्याकडे आहेत तेव्हा समजूनच करतील. आम्ही तुम्हास लिहिले होते की प्रसंग विडवर. येदर्थी कितेक गोष्टी आटोरा आटोप करावी. त्याचे उत्तर तुम्ही लिहिले की निक्षून आज्ञा यावी म्हणजे तैसे केले जाईल. त्यास याचे लिहिणे हेंच जे गावांत जे आहेत त्यांणी आपलाले ठिकाणीच असावे. प्रस्तुत तैसा प्रसंग आधी तुम्हावरच येतो असे नाही. परंतु सावधता जरूर व सिवंदीचे लिहिले. त्यास तीहजाराचें सिवंदीचे काही प्रयोजन नाही. तैसा प्रसंग आला तर तुमचे दोनच्यारसे काय करितात. गरज गावाचे मजबुती करिता शेपन्नास मात्र असावेत. व तुम्ही लिहिले की गाव मातबराचा तेव्हा कोण्ही आसऱ्याकरिता येतो. त्याजला दुसऱ्याचे हाती कैसे घ्यावे. हें लिहिले परंतु आपले येथील चाल अैसी नाही. वाजवी जे असेल तैसे करीत असावे. रा. आपाजी गोपाळ गनीमाचे चिरंजिवाचे मागे आहेत व हाली गोविंदरावही आहेत तेव्हा आता पारपत्य चांगलेच घडत आहे. वरकड वर्तमान वरचेवर तुम्हाकडील कळत असावे म्हणजे त्याप्रमाणे

इकडूनहि लिहिण्यांत येत जाईल. आज चतुर्थी रविवारी श्रीमंत नानासाहेबी श्रीमंत रा. भाऊसाहेबाचा निरोप घेऊन निघालेत. मजलाही समागमे दिघले आहे. वासीमचे सुमारे येत आहेत. फिरंगी जाफराबादेवर आहेत. आमच्या फौजाही देऊळघाट व भादोल्याचे घाटे चढून मुकाबल्यावर आहेत ता. गोविंदराव त्रिंबकही देऊळघाटचे सुमारे बलाविले आहेत. तुम्ही आपले सावधतेत असावे हे विनंती.

पत्र क्रमांक २

श्रीबालासा

विनंती विज्ञापना ऐसी जे आपणापासोन स्वार जालो ते किनखेड्याहून डोणेगावास आलो. महमद करीम आपणाकडेस आलेत किनखेड्याचे वर्तमान विदित केलेच असल. आम्हाजवळ कोण्ही माणूस नाही. बर असो. महमद करीम आम्हाजवळ असते तर उत्तम होते. मौजे नागझरीचें...न दार पाच सेत वाहिली आहे. तेही जून आहेत. सेतात बीजही होत नाही. गावचे वर्तमान असे आहे. पाटलास येथे बोलावूव आम्हाजवळ आला आहे. गावचा फडच्या करोन लौकरच येत आहे. दुसरे इकडे फौजेची फार गर्दी आहे. फौजेचा मुक्काम उतरादपेठ प्रां अबडापूर येथे आहे. पंचमीची मौंज जाली. मौंजीमुळे पाच सात मुक्काम जालेत. अबडापुरास व विसोलीस खांदण गावात घरोघर सुरु आहे. दानादुना व भांडी व चीजवस्त उंट भरोन नेतात. कांही विचार विलकुल नाही. विठ्ठल गोविंद यांचे घर खांदले. चीजवस्त भांडी व दाना कुल हवेलीहून घेऊन गेले. जातीसही धरुन नेले. त्याचा खंड सदतीस हजार रुपये ३७००० जाला. सेख भिकन यांनी जिमा आपला केला. खेडले मेहकरचें जमीदार लष्करात आले त्याचा जोवसाल नमुद आहे. असो गर्दी आहे. मुलुख अवघा उजायाड जाला. गर्दी मचून राहिली आहे. रामाजीपंत दादानी लष्करांत बातनी ठेवली आहे. रोज संध्याकाळी बातनी असती. बुधवारी बातनी आली की दौलतराव सिंदे हजारा पाचशा स्वारानसी पुढे ब्रह्मणपुरास आलेत. आणि बाजीराव भडोद्यावर आले आहेत. याची त्यांची ब्रह्मणपुरावर भेट होणार. मसलहत ब्रह्मणपुरावर होऊन पुण्याचा रूख आहे मागाहून फौजहि ब्रह्मणपुरावर येणार. लाख दीड लाख फौजही आहे कुशाबा व श्रीधर बापु पुण्याहून गवईला राजे उभेता निघाले. पसपुरास आले. नागपुराहून फौजहि कांही त्याहास आनावयास गेली आहे. दोन चार हजार फौज त्याहा समागमे सडी आहे. असे वर्तमान लष्कराहून आले. सिंद्याचे वकील नागपूर व हैदराबादेस गेले आहेत. कळावे. कटी मसलहत आहे. पुढे होणार जाणार ईश्वराकडे असे. ज्यानी घाटावर फौज अमरसिंग वगैरे यांनी आनीली तेही नजरबंद आहे. कळावे बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. ता. क. घरचाहि परामर्श करीत असावें. घरीं दाने बिलकूल नव्हते. लेकराबाळाचा परामर्श करावा.

पत्र नं. ३

राजश्री दादासाहेबांचे सेवेसी

सेवक बापूजी सदाशिव ठाणे हिवर सा. नमस्कार विनंती उपरी. साहेबाकडे आगोदर दो प्रहरा दिवसा विनंती पत्र लिहिले त्या उपरांतिक तिसराप्रहरा राजश्री यमाजीपंत याचा''मौजे विसोली येथे पडला. पंत मशारनिलेचा सरंजाम पाच सातसे आहेत. त्यास आपले येथील गुरे व माणसे व सखारामपंत आटकले आहेत. दुसरे श्रीमंत नानासाहेब व दादासाहेब हेहि उबर प्रो बाळापूर येथे आले आहेत. सरंजामहि समागमे बहुत लाठा आहे. तोफाहि चाळीस पंचेचाळीस आहेत. उदई कुच होऊन सिराळीयाचे घाट येऊन वरते येणार ऐसे वार्तमान आहे. श्रीमंत बापुसाहेबाचेहि फौजेचे वर्तमान राक्षसभवनाचे नजीक बोरगांव आहे. तेथे मुक्काम आहे ऐसे वर्तमान आहे दुसरे दादासाहेबास (तुमचे) पत्र होते. त्यापत्राचे उत्तर उंत्ररीयाचे मुक्कामचे आहे. ते सेवेसी पाठविले आहे. तर तुमचे पत्र एक यमाजीपंतदादास आले पाहिजे म्हणजे गुराची सुटकारा होईल. आणि आमचीहि बंदोवस्ती होईल नाही तर गावचा खराबा बहुत होईल. सेवेसी कळावे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

पत्र नं. ४ श्रीराम

तीर्थरूप राजश्री आबासाहेब वडिलाचे सेवेसी. आपत्य मुदगल बापूजी चेरणावर मस्तक ठेवून साष्टांग

नमस्कार. विनंती विज्ञापना ऐसीजे. येथील कुशल मार्गेस्वर वय त्रयोदशी वडिलाचे आसिरवादे आनंदरुप. विशेष आसीरवादपत्रें आलीत परमानंद जाला. आज्ञेप्रमाणे कारखाना वऱ्हील संवल्यास लाविला. पश्चेमेकडील लाहगलीच्या चार कमाना राहिल्या, ते पुढे उष्णकाळांतही होईल. उंबरखेडची मासलत पांडुरंगपंत नकास यांनी सखाराम विठ्ठलासी शराकत केली. रसद भरणा याजकडून न मिळे. ते सखाराम विठ्ठलानी पंच्यासी हजार रुपये देऊन जातीने उंबरखेडास आला. गाजीखानानी मुलावे मारीले. पांडुरंगपंती सत्तावीस हजार रुपये रखवाली ठराविली. भरणाच जेव्हा याहास न जाला तेव्हा मामलतींचे काम याजकडेस कोनतेहि नाही. येक गाजीरखानाचे मात्र रखवालीचे वोलण्यात होते. पुन्याची गर्दी ऐकून खानास पत्र लिहिले की पुन्यावर गर्दी जाली मामलतदार दुसरा येईल, तुम्ही जातीने येऊन आपला गुंता उगवून घ्यावा. सखाराम विठ्ठल सिस्तीचा ऐवज घेऊन जाईल. हे ऐकता जातीने जमियेत सुद्धा कसवा पार आला. हेच राजवटीस पडून लाख रुपये खंड केला, सत्याशी हजार रुपये खानाचे येथे दाखल जाले. तेरा हजार रुपये मध्येस्त तेथील जमीनदारापैकीहि कोण्ही होतेत त्यातच हेहि पंत होतेत. गाजीखानाबरावरच निघून आले वासिमासी आले आहेत. सखाराम विठलचे पदरी जो ऐवज सिस्तीचा पडला होता तोही घेतला. आणि वस्तीपासूनही घेतला. सखाराम विठलापासी हजार वारासे सिबंदी होती. तोही निघुन पातुरास आला. सर्वस्व याजला पेच बसला. नंतर उंबरखेडचे लाख रुपये घेऊन नानदेस येऊन मागती परगन्यात निघाला. विडुल व साकर वगैरे मोठेमोठे गाव लुटून खंडून बंद धरून फुलसावंगीस गेला. नानदेस अद्याप आला नाही. जुनें कारभारी येशवंतराये वगैरे आता भयेभीत आहेत. दिवानीचे कारभारात आता योगीराज दरोबस्त आहे. वरकड वर्तमान वडिलाचे आसिरवादे आनंदरुप असे. जमीदार जोर तलबी वेगळा पैसा देत नाहीत. कसव्यांत नाहीत. येक नानदेत येक आळेगावांत. कारकून जातो. त्यासी बोलतात जेमाबंदीवर फडचा करून देऊ.

आता कसब्यास आल्यास त्यासी कटकट करावी लागल तेव्हा देतील. जळकेकराकडेस येवज बहुत. त्याचा मूल नानदेंत योगीराजाचे कैदेत. जउळके लुटिले तेव्हापासून तोहि तेथेच आहे. सुपसेल्यावर पाटलांनी घरें बांधिलीत. येक सेत मोठे दोशा टक्याचे योगीराजास वा न पेरून पाटलानी दिल्हे परंतु त्याचे समाधान नाही. खानगीच्या चिठचाकरिता गावास जागीरदार मोकासदार याचा उपसर्ग तिळमात्र नाही. वडिलाचे पायाची सर्व मर्यादा करून आहोत. सिरदूर परगन्याचे कुलासे. तेथेही आता काही कटकट नाही. चाडुदावर सिस्तीचा आख जमीनदारानी भारी घातला. परगन्यास आट पैसे घेतले. सिरदुरास जाऊन आट पैसे प्रमाणेच फडच्या केला. मध्येंतरी चिटचाचपाटचा गावावर कडचा लेहतात तेव्हा काळोपंतास सांगून मना करविले. बाकी राहिली ते जेमाबंदीवरच फडच्या करून देऊ. पश्चिमेची सफील पडली. पायवाट जाली. याजकरितां येथून वेलदार पाठविले आहेत. रामाजीपंत अद्याप डोनगावास आले नाहीत. खेड्याकडेसच आहेत. वरकड वर्तमान वडिलाचे आसीरवादे आनंदरुप असे. वडिलांनी येथे ज्यास ज्यास जे नेमनुक करून दिली ते तो आगेमागे सर्वास पावतच आहे. कोणाचे राहत नाही. गोशाळ गोविंद याजवर महर्गतेमुळे कर्जदारी से दोनसे जाली त्याचे तकाजे नित्य होऊ लागले त्याजमुळें येथून खफा होऊन वडिलाकडेस आले आहेत. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

वडिलांचे सेवेसी आपत्य बाळकृष्णाने चेरणावर मस्तक ठेवून नमस्कार. विनंती विज्ञापना ऐसीजे. चिरंजीव सौभाग्यवती बुजाबाई प्रसूत जाली. कन्या जाली. खोकला, ज्वर अतिशये आहे व तुमचे आसीरवादे आरोग्ये होईल हे विज्ञापना.

पत्र नं. ५

पैवस्ती छ २१ माहे रजब

सन १२१३

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामाजीपंत दादा स्वामीजीचे सेवेसी

से।। आपाजी आनंदराये सा. नमस्कार विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पोहचून मार समजला. येजमानाचे पत्री मजकूर लिहिले त्याचे जोब लिहि आहेत ते मनन करुन त्याउंतर यावे म्हणून आपण

लिहिले. त्यास आपणाकडुन जे पत्रे येतात त्याचे जौब वरचेवर तपसिले लिहिण्यांत येतात. हाली आपण लिहिले त्याचेही जौब पाठविले आहेत. जळचराची बातनी मलकापुरा पलिकडे आलें. सिंदे जळगावावर आहेत. आम्हीही या मैदानात (आहोत) परंतु मागील अर्थे आपले ध्यानांत आहेत. जो ईश्वरी नेम असल तो खरा. आज येथून कूच होऊन वाडेगावावर गेलो. तेथ कांही मुकामात होईल. येजमान सडे सुबेदाराचे भेटीस जाणार आहेत. आम्हीही समागमे येऊ. बापु पांड्याचा मार लिहिला त्यास कला (?) हस्तगत जालियास अवघ जोबसाल बोलण्यांत येतील. विटोजी आटोळे याजला यापूर्वीच पत्र गेली आहेत. कळावे बहुत काय लिहिणे हे विनंती.

श्रीराम

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री मुदगलपंत दादा स्वामीचे सेवेसी.

पो. रामाजी शामराज सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकुशल लिहीत असावे. विशेष आपण नानदेहून येऊन चिरंजीव सिवरामपंत बापु आदीकरून सर्वत्राचा सांभाळ केला हे वडीलपणास उचित. आपले आज्ञेस चिरंजिवास उजर नाही. आम्ही खातरजमा आहोत. त्याहास पुढे प्रपंच करणें तेव्हा तुमची आज्ञा वंद्यच आहे. इकडील राजकृत्य. आम्ही कुलास. वरल्यावर सैन्यात जाऊन श्रीमंत दादासाहेब व रावसाहेबांची भेट घेऊन मजकूर दर्शविला श्रीमंतास श्रवण्यारुष (?) केले. रा. आपाजी गोपाळ यास सरकार आज्ञा व दादासाहेबांचे पत्र सादर जाले की डोनगाव आदिकरून प्रांतीचे संरक्षण करून असावें. अलीसाहेब यासही आज्ञा आपा रावजीपाशी चाकरीची जाली. पंचेवीस स्वार येथे तैनातीस आहेत. शंभर सवाशे पायदळ चाकर नित्य स्वाराचा जमावा कोसावर दिवसा जात आहे. पुण्यप्रताप येजमानाचा. राजश्री जेनार्दनपंत बाबा वक्षी वासिमावर आले काय. त्याहाचे सल्हेत आले असेल. तत्रापि चिंता नाही. श्रीमंतानी होळकराची आपली सिंद्याची गठन व्हावी या अर्थी सिंद्यानी प्रांत कांही होळकराचा घेतला होता तो व मूळ सोडचिठी सुद्धा पाठविली होळकरही समीप वीस पंचेवीस कोसावर आला. भेटी जाली. यावर खुलासा होऊन मसलहत ठहरली. फिरंगी व मोगलाची फौज औरंगाबादेवर आहे. काल मंगलवारी कोण्ही बाटसरू आले. त्यांनी सांगितले की फिरंगियाचा आग्रह की शहरांत आमचे ठाने असावे. फौज वा आग्रह की जैसे आहे तैसे असावे. याजवरून परस्परे किंतु आला. ते आपलाले ठिकाणी येकासी येक इतबार करून नाहीत. सिंद्याकडील व सरकारच्या बेदड्या (?) नी घाटावर जाऊन फिरंगियाचे जिनसीचे चार पाच हजार बैल आणिले. श्रीमंत बाजीराव साहेबही पुन्याहून फिरंगियापासोन निघून किल्ल्यावर गेले सत्य मिथ्या ईश्वर जाणे. औरंगाबादेवर महर्गता बहुत. तीनसेर अन्न जाले. फत्तेपुरावर चार सेर जाले. याप्रमाणे होळकराचे लष्करात येदा पर्जन्य मानसिक. बहुधा होळकराची यांची भेट जाली. यावर फौज घाटावर चहडतील. छावणीचा डौल दिसत नाही. बेनिसिंग बेफौजी. नसीब भारी. असबाब सुधा रवाना जाला. चर्चा नानदेची, परंतु नागपुरकडेस रवाना जाला. कलकत्त्याकडूनही समुद्रवासीय यांनी उमाळ केला. येकून गर्दीच आहे. नानदेने बहुतच लावन (?) घातली. परिसता आपण मागती जाणार. उत्तम आहे. आम्ही तो रात्रंदिवस सिकंज्यात. वडिलाचे पुण्य समर्थ. वरकड विचार काय. यंदा आज पावेतों खडीचे मुकामाहून आल्यावर सिवदी सात आठ हजार होणार. पुढे कोठवर भोग. काम येका खेड्याचे. खर्च मनस्वी. तो विचार पत्री लिहिता येत नाही. आपले भेटीचा लाभ घडता तर उत्तम होते. वडिलाची आज्ञा जाली की तुम्ही सहसा स्थल सोडून बाहीर न निघावे. लाचार. रा. राघोपंतजीची व चिरंजिवाची पूर्ती निर्मलता करून जाणे. घडवावे. मी त्याहावेसे नाही. बहुत काय लिहिणे. लोभ किजे. हे विनंती.

रा. जैकृष्णपंत दादा स्वामीचे सेवेसी सा. नमस्कार विनंती उपरी आपण गावास आलात आणि मुलाहृचा सांभाळ केला. उचित आहे. पत्रावरून समजल. लोभ किजे हे विनंती.

अनुक्रमणिका

क वि ता

हाक

आता साहवत नाही
आता राहवत नाही
आता माझाच मजला
अन्त पाहवत नाही.

काळचा काळोखाची धुन्दी
आता उधाणते आहे.
मत्त वादळाची मस्ती
आता पिसाटते आहे.

शुष्क पाचोळा वाऱ्यांत
आता व्याकुळतो आहे
नव्या हिमतीने हिरवें
आता झगडतें आहे.

आणि जळते सोडत
श्वास, जळण्यास मला
राजपथींचा धुराळा
आता बोलावित आहे.

आता साहवत नाही
आता राहवत नाही
अन्त माझाच मजला
आता पाहवत नाही.

—वसु भगत

जीवनलहरी

-१-

पापणीवरी माझ्या
मधुस्वप्नें तरंगती
स्मृतिनेंहि अंगावर
रोमांच इथे फुलती

मधुमादक कल्पनेंत
अनुभूती घोटाळत
वसुधा तेजाभवती
घोटाळत जणु फिरते ।

-२-

रजनीच्या बागेतिल
स्वप्नांचीं रातफुलें
उसलोनी परिमळतीं
गंधानें विश्व डुलें

क्षणभंगुर गंध इथे
मन माझें भोहवितां—
माझें 'मी'पण सरतां—
अवतरते नवकविता !

-३-

आज तुझी चितेवरी
कोमल तनु जळतांना
उंच उंच ज्वाला त्या
आभाळास भिडतांना

येई एक विचार मनीं—
त्यांत उडी मारावी
"स्त्री"साठी सती इथे
नवी घडी बसवावी !

-४-

कोसळती जलधारा
वीज कुठे कडाडते
झोपडीत दूरवरी
तेवतसे दीप तिथे

मीलनक्षण शेवटचे
सखि माझी मोजतसे
बेटकुळी चेंगरतां
हृदय इथे छेदतसे !

—योगेश्वर अभ्यंकर

‘ नवरसामाझारिं शृंगारसा ’

—रघुनाथपंडित (नलदमयंतीस्वयंवर)

बळीराम येरकुंठवार

(लेखांक २ रा)

‘ रति ’ या शब्दाची अन्वर्थकता जशी लक्षांत ठेंवली पाहिजे तशीच मानसशास्त्रीय ‘ Sentiment of sex-love ’ याचेंहि स्वरूप नीट ग्रहण केलें पाहिजे. मॅक्डुगलने असें दाखविलें आहे की, ‘ sex love ’ मध्ये चार उपजत-वृत्तींचा सुसंगत मेळ असतो. ‘ Sex instinct, ’ ‘ Potental instinct, ’ ‘ self-display ’ a ‘ self-abasement ’ या instincts यांच्या अन्योन्य-परिपोषांतूनच स्त्री-पुरुषांची रती निर्माण होते व परिपक्क होते. त्याने असेंहि सुचविलें आहे की, या उपजत-वृत्तींचा अन्योन्य-संबंध उपजतच असावा. तो म्हणतो की, ‘ The Presence of maternal element in the attitude of a woman towards her lover has been recognised by countless writers of romance. And that the tender protective element commonly enters into the sentiment of the man for the beloved woman is equally obvious. That sex-love should thus combine the most purely altruistic with the most ruthlessly egoistic tendency of human nature, seems sufficiently accounted for in the case of the woman by the great strength of the maternal impulse and the ease with which it is aroused in her in all personal relations; and in the man it is perhaps sufficiently accounted for by the fact that woman, especially at the age at which she is most strongly attractive to man, resembles in many respects, both mental and physical, the child, the normal object of the parental or protective impulse. (Social Psychology, P. 338-339) वत्सलरस हा स्वतंत्र रस नसून, रति स्थायीभाव असलेल्या शृंगाराचाच तो एक प्रकार आहे, असें म्हणणाऱ्यांच्या पक्षास मानसशास्त्रीय अधिष्ठान कसें आहे हें यावरून स्पष्ट होऊं शकेल. भक्ति-रसाबाबत पुढे थोडेसें विवरण करावयाचेंच आहे. स्त्री-पुरुषांच्या प्रेमांत वत्सलता सहजच कशी येते याचा बोध एवढयावरूनहि होईल. बालक व स्त्री यांच्यांत किती विलक्षण साधर्म्य आहे व स्त्री कितीहि वाढली तरी तिच्यांतलें बाल्य कमी कधीच कसें होत नाही याचें सविस्तर विवरण मी माझ्या प्रसिद्ध होऊं घातलेल्या पुस्तकांत केलेलें आहे. ‘ रति ’ ही अष्टविध पैलू असलेली मानसवृत्ति आहे. आणि म्हणूनच तिच्यांत वात्सल्य, भक्ति इ. भावनांचा सहज अंतर्भाव होऊं शकतो. मॅक्डुगलच्या म्हणण्याप्रमाणेच कामविषयक मानसशास्त्राची (Sex psychology) सखोल मीमांसा करणाऱ्या हॅवलॉक एलिसनेहि स्त्री-पुरुष प्रेमाचा पैलूदारपणा स्पष्ट केला आहे. स्त्रीच्या प्रेमभावनेचें विवेचन करून तो म्हणतो की, ‘ It is the presence of this essential ten-

dency which leads to a certain apparent contradiction in a woman's emotions. On the one hand, rooted in the maternal instinct, we find pity, tenderness and compassion; on the other hand, rooted in the sexual instinct, we find a delight in roughness, violence, pain and danger, sometimes in herself, sometimes also in others. The one impulse craves something innocent and helpless, to cherish and protect, the other delights in the spectacle of recklessness, audacity, sometimes even effrontery. A woman is not perfectly happy in her lover unless he can give at least some satisfaction to each of these two opposite longings. (Love and Pain, Studies in the Psychology of Sex. Vol. 1 P. 95) आधुनिक शास्त्रांप्रमाणे पुरुषाच्या प्रेमवृत्तींत स्वभावतःच 'instinct of self-display' ही प्रबळ असते तर स्त्रीच्या प्रेमवृत्तींत 'instinct of self-abasement' ही स्वभावतःच प्रबळ असते. आत्मबलाच्या पूर्ण आविर्भावांत पुरुषाला प्रेमसुख लाभतें तर स्वतःच्या शरीराचें व मनाचें विलयन करून आत्मबलानें उज्ज्वल बनणाऱ्या पुरुषाच्या चरणीं त्यांना अर्पण करण्यांत स्त्रीला प्रेमसुख लाभतें. ज्या स्त्रीला स्वतःचें असें विलयन करून टाकतां येत नाही ती स्त्रीच नव्हे व प्रेमाच्या देवतेंतींत ती कमअस्सलच असते असें सर्व एतद्विषयक शास्त्रज्ञांचें निश्चित प्रतिपादन आहे. ह्या दृष्टीनें हॅवलॉक एलिसचें 'Love and Pain' हें प्रकरण अतिशय मननीय आहे. अनेक स्त्री-पुरुषांची व अनेक शास्त्रज्ञांची साक्ष देऊन त्यानें स्त्री--पुरुषांच्या या स्वभावाची चांगली फोड केली आहे. 'Love me forever and make me suffer still more' ही सहज वृत्ति प्रेमांत समर्थ असलेल्या सर्व स्त्रियांमध्ये आढळून येते. एका स्त्रीने हॅवलॉक एलिसला असें लिहिलें होतें की, रतिसुखाच्या आत्यंतिक अवस्थेंत स्त्रियांत जीं लक्षणें प्रकट होतात तीं सर्व दुःखांत उत्पन्न होणाऱ्या लक्षणांसारखींच असतात. (tears, cries, etc). स्त्रीच्या सुखाचें सारें रहस्य तिच्या त्या म्हणण्यांत प्रकट झालें आहे. या सर्व गोष्टींचा विचार करूनच शेवटीं हॅवलॉक एलिस असें म्हणतो की, 'Subjection of women बद्दल कोरडा वादविवाद करण्याचे दिवस आता निघून गेले आहेत. स्त्रियांच्या या स्वभावविशेषाचा नीट बोध करून घेऊनच सामाजिक प्रगतीचें तारूं हाकलें पाहिजे. त्यांना पुरुषाची छोटी प्रतिमा समजून पुरुषी वळणावर नेणें सर्वथैव निसर्गविरुद्ध आहे. तो म्हणतो, 'It is as true now as in Bacon's day that we only learn to command nature by obeying her. To ignore facts is to court disappointment in our measure of progress' (P. 103) आगरकरांपासून (संपूर्ण आगरकर भाग १ ला) गजेंद्रगडकरांसारख्या आधुनिक सुधारकांपर्यंत (महाराष्ट्र सामाजिक परिषद १९५३ चा अहवाल) जवळजवळ सर्व विद्वानांच्या लेखनांत या बाबतींतलें अज्ञान व भ्रम पुरेपूर आढळून येतात. अन्याय व जुलूम कोणत्याहि क्षेत्रांत केव्हाहि वाईटच. स्त्रीच्या बाबतींत पुरुषाने दुर्गुण दाखविले तर त्याला वठणीवर आणणें हेंहि आवश्यकच. परंतु मूळ स्वरूपाबाबतच अज्ञान व भ्रम उराशीं कवटाळून आवेश, सत्यनिष्ठा, अन्याय व जलूम यांची चीड इ. सद्‌गुण कां असेनात कोणी उगीचच दाखवूं लागला तर तो प्रशंसनीय खास ठरत नाही. स्त्री-पुरुषांच्या निसर्गसिद्ध स्वभावविशेषांच्या दृष्टीने श्री. रांगणेकरांची 'कुलवधू' किती दरिद्री व फिकी वाटते तेंहि लक्षांत येईल. ललित वाङ्‌मयांतील अशीं किती तरी उदाहरणें दाखवितां येतील. वैद्यकीय व्यवहारांत या स्वभावविशेषांच्या योग्यायोग्य प्रकटीकरणाने कसे दारुण व रमणीय प्रकार घडलेले आढळून येतात ते एक दोन लहानशा उदाहरणांवरूनहि लक्षांत येण्याजोगें आहे. गर्भाधानाच्या प्रसंगीं पुरुषाची बोबडी

वळून त्याला तात्पुरती नपुंसकता येण्याची घटना नित्याची आहे, असा तज्ज्ञांचा अनुभव आहे. मोपाँसा प्रभृतींनी आपल्या कथांमध्ये या प्रसंगाचें मानसिक चित्रण चांगलें केलें आहे. स्त्रीच्या ठिकाणीं 'maternal instinct' मधून उत्पन्न होणारी 'Protective impulse' व 'tender emotion' उदित झाली नसली तर, 'अगदीं बिलकूलच' अशा भेदक व तुच्छतादर्शक उद्गारामुळे कित्येकांचें पौरुष विनाकारणच कायमचें कसें गमावलें आहे याची साक्ष वेल्डे प्रभृतींनी दिलेलीच आहे. याच्या उलट, प्रथम रात्रीस नवोढा स्त्रींत आढळून येणाऱ्या profound and elemental dread' मुळे उन्मत्त बनून तिच्यावर पाशवी आक्रमण करणाऱ्या पुरुषांतहि तसाच पितृवात्सल्याचा भाव उदित झालेला नसल्यामुळे स्त्री कायमची थंड (frigid) झाल्याचीहि भरपूर उदाहरणें आहेत. याप्रमाणेच अशा प्रसंगीं परस्पराबद्दल 'Protective impulse' व 'tender emotion' दाखविली म्हणजे त्यांत किती माधुर्य निर्माण होतें याचेहि नमुने पहावयास मिळतातच. शारीरिक रतींत ही गोष्ट तर परिणतीची परमावधि असलेल्या 'platonic' प्रेमांत (म्हणजे रतींतच) हीं गोष्ट किती गाढपणानें वसत असेल याची कल्पना येऊं शकेल. असो.

रति या शब्दाचा अर्थ 'sentiment of love' असा न घेतां 'sentiment of sex love' असा घ्यावा असें कबूल केलें तरी (भरत स्वतः 'इष्टार्थविषयप्राप्त्या रतिः समुपजायते'— अ. ७, ९ असा पूर्वाधार देत रति शब्दाचा व्यापक पण निश्चित अर्थ मान्य करीत असला तरी शृंगाराचें वर्णन करतांना 'स च स्त्री–पुरुषहेतुकउत्तमयुवप्रकृतिः—अ. ६–असेंच म्हणतो.) या मानस विकाराचें खरें स्वरूप काय आहे या प्रश्नानें आधुनिक शास्त्रज्ञांना मोठें वुचकळ्यांत टाकलें आहे. सृष्टींत स्त्री–पुरुष असे वेगवेगळे विग्रह निर्माणच का झाले हेंच त्यांना जिथे कळत नाही, तिथे त्यांच्यांत निसर्गसिद्ध असलेल्या अनिवार ओढीचें यथार्थ आकलन होणें कसें दुष्कर झालें असेल याची कल्पनाच करावी.

कामप्रवृत्तीचा सर्वंकषपणा जगाच्या निदर्शनास आणून देणाऱ्या फ्राईडला हा प्रश्न सुटलेला नाही. खुद्द मॅक्डुगलहि, हा प्रश्न उपस्थित करून देखील पुढें पाऊल टाकूं शकला नाही. हॅवलॉक एलिसनें आपल्या 'An Analysis of Sexual Impulse' या प्रकरणांत संशोधनाचा केवढा खटाटोप केला आहे, पण त्यालाहि अखेरीस विषण्ण होऊन अर्जुनाप्रमाणें मटकन खाली बसावें लागलें. Prof. Crew हा फार मोठा आणि शास्त्रज्ञ, विशेषतः नाणावलेला जननशास्त्रज्ञ (geneticist). त्याने निःसंकोचपणानें कबूल केलें आहे की, "what, then is sex ? The layman may perhaps find an answer, but no biologist has yet given a sufficiently comprehensive and satisfactory reply. We do not know what sex is." (An Introduction to the Study of sex, P. 12) श्री. चापेकर प्रभृतीप्रमाणें कित्येक पाश्चात्यशास्त्रज्ञांनाहि पूर्वी असें वाटत असें की, स्त्री–पुरुषभेद हा निव्वळ शारीरिक आहे व त्यांतील ओढहि निव्वळ तशीच आहे. परंतु त्यांचा हा भ्रम आता फिटला आहे. या संबंधी देखील जास्त सविस्तर चर्चा मी माझ्या प्रसिद्ध होऊं घातलेल्या पुस्तकांत केली आहे. इथे तिचा नुसता मथितार्थ देत आहे. प्राण्यांवरील प्रयोगावरून व मनुष्यावरील विविध निरीक्षण व अनुभवांवरून असें निश्चित लक्षांत आलें आहे की, स्त्री–पुरुष-विशिष्ट इंद्रियें नष्ट केल्यानंतर अथवा त्यांचा जन्मतः पूर्णपणे अभाव असल्यानंतर देखील विलक्षण स्त्री–पुरुष आकर्षण प्रतीतीस आलें आहे. अशा प्राण्यांमध्ये व मानवी व्यक्तींमध्ये जबरदस्त भोगवासना व उत्कट संभोग–प्रकार आढळून आले आहेत. एलिसनें या बाबत विविध उदाहरणें दिलीं आहेत. कामवासनेच्या दृष्टीनें ज्या गुह्येंद्रियांच्या (sexual organs) विशेष स्रावांचा (hormones) आजकाल अतिशय उदोउदो करण्यांत आलेला आहे—या उदोउदोला मॅक्डुगलनें पहिलेपासूनच योग्य विरोध केला आहे— त्यांच्याकडे स्त्री–पुरुषाच्या आकर्षणाचें व संभोगा

दुय्यम कारकत्व आहे ही गोष्ट, अलिकडें फार प्रसिद्धीस आलेल्या किनसे-मंडळींनी नीट दाखविली आहे. (The Sexual behaviour in the Human Female). G. H. Seward या मानसशास्त्रिणीनेहि आपल्या 'Sex and the Social Order' या पुस्तकांत किंचित् दिग्दर्शन केलें आहे. 'वयसि गतेक: कामविकारः। शुष्के नीरे कः कासारः' हें श्री शंकराचार्यांचें विधान सामान्यत:च घ्यावयास पाहिजे. वार्धक्यामुळे शरीरांतील सारा रस आटून गेल्यावर कामवासनाहि सुकून जाते. परंतु, अशी अवस्था येऊनहि नव्वद नव्वद वर्षांच्या व्यक्तींमध्ये तारुण्यसुलभ सर्व वृत्तींचे व्यवहार उत्कटतेने आढळून आले आहेत. या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे स्त्री-पुरुषभेद व त्यांतील आकर्षण व अन्योन्यभोग यांचें मूळ फार खोल असलें पाहिजे, निव्वळ शारीरिक असण्यापेक्षा त्यांचा संबंध जीवांशीं अधिक असला पाहिजे ही गोष्ट पाश्चात्य शास्त्रज्ञांना किंचित् उलगडूं लागली आहे. रति स्थायीभाव असलेल्या शृंगाररसाचें साद्यन्त आकलन करण्यास या महत्त्वाच्या गोष्टीचा फार उपयोग आहे. परस्परांच्या शरीराचा उपभोग घेणें ही त्याची निव्वळ बाह्य स्थूल अभिव्यक्ति आहे, तिचें आंतरिक स्वरूप दोन जीवात्म्याच्या आकर्षणांत आहे. असें असल्यामुळेच शृंगाररसाचें क्षेत्र फार व्यापक झालें आहे. वात्स्यायनाला कामप्रवृत्तींत 'सामान्य' व 'विशेष' असा जो भेद करावा लागला त्याचें इंगितहि यांतच आहे.

आधुनिक मानसशास्त्र व मनोविश्लेषणवादी संप्रदाय यांनी 'Sex-instinct'चा खोलांत जाऊन जेव्हा विचार केला तेव्हा त्यांना असें लक्षांत आलें की, कामप्रवृत्तीचा व्यक्तीच्या 'अहं' वृत्तीशीं अत्यंत निकट संबंध आहे. मॅक्डुगलच्या मानसशास्त्राप्रमाणें कामप्रवृत्तीचा व 'self-consciousness' चा अतिशय घनिष्ठ संबंध आहे. तो म्हणतो की, कामप्रवृत्तीनें intensification of self-consciousness' होतें; इतकेंच नव्हे तर तिनेंच त्याचें 'enrichment' हि होतें. फ्राईडने आपल्या विचारसरणीप्रमाणे उपजत वृत्तींचे दोन गट पाडले आहेत. एक गट 'sex—instincts' चा व दुसरा गट 'ego-instincts' चा. फ्राईडच्या कल्पना नेहमीच विकासमान रहात असल्यामुळे त्यांच्या निश्चित व्याख्या त्याला देतां आल्या नाहीत ही गोष्ट खरी आहे. मॅक्डुगल, एलिस प्रभृतींनी त्याच्यावर असा आक्षेप घेतलेलाच आहे. असें असल्यामुळे त्याच्या पंथाला उपजत वृत्तीच्या या दोन गटांची सांगड कशी घालावी हें कळलें नाही. 'मनोविश्लेषणांतील Narcissism' च्या सिद्धान्ताचा जास्त ऊहापोह आपणांस इथे करावयाचा नाही. पण त्यावरून हें लक्षांत येऊं शकेल की, त्या संप्रदायाची या बाबतींत कशी त्रेधा उडाली आहे. Narcissism म्हणजे काय तें थोडक्यांत पाहूं. ग्रीक पुराणकथेंत Narcissus नांवाच्या एका स्त्रीसौंदर्य असलेल्या आत्मरत तरुणाची गोष्ट आहे. एका व्यक्तीच्या पाण्यांत उमटलेल्या प्रतिबिंबावर त्याचें अतिशय प्रेम जडलें. परंतु तें स्वतःचेंच प्रतिबिंब आहे हें त्याला माहित नव्हतें. वयांत आल्यानंतर मुलामुलींत व विरुद्ध लिङ्गाच्या व्यक्तीबद्दल जें प्रेम उत्पन्न होतें तें त्यांत तत्पूर्वीच्या अवस्थेंत नसतें. तत्पूर्वी हें प्रेम स्वतःवरच जडलेलें असतें. Narcissismच्या कल्पनेबाबत फ्राईडची भूमिका कशी बदलत गेली आहे हें हॅवलॉक एलिसनें आपल्या 'The Conception of Narcissism' प्रकरणांत (Vol 3) चांगलें दाखविलें आहे. कामप्रवृत्तीचीच दुसरी बाजू म्हणजे आत्मप्रेम आहे, लहान मुलांत, स्त्रियांत (यावरूनहि बालक व स्त्री यांतील साम्य लक्षांत येईल.) हें प्रेम अधिक असतें. इ० प्रतिपादन मनोविश्लेषणवाद्यांनी केलें आहे. Stekel हा मनोविश्लेषणवादी जर्मन शास्त्रज्ञहि असेंच म्हणतो की, खरें प्रेम आपलें आपल्यावरच असतें. ज्या व्यक्तीबद्दल आपल्या ठिकाणीं अत्यंत प्रेम असतें त्या व्यक्तीशीं आपलें तादात्म्य घडत असतें, म्हणूनच तें असतें असें तो म्हणतो. वृद्ध जोडप्यांत शारीरिक साम्य आढळून येतें, तो प्रत्येकाने दुसऱ्यांत आत्मत्व पाहून निवड केल्याचाच परिणाम असतो, असेंहि तो म्हणतो. Sadger Rank Roheim, Abraham इ० शास्त्रज्ञांनी फ्राईडच्या उपजतवृत्तीच्या या

दोन गटांचा विचार करतां करतां अखेरीस अशी मजल गाठली की, "All human efforts, and man's most sublime aspirations, are brought within the Narcissistic sphere. But it is further suggested that Narcissism extends far beyond Man, far beyond even the ranges of comparative psychology and is the guiding motive of Nature herself. Thus Ferenczi, one of the most daring poineers of psycho-analytic speculation, has hazardously suggested that Narcissism is part of the process of evolution........" (Havelock Ellis, Vol. 3, P. 375) ही त्यांची मजल पाहिली म्हणजे उपनिषदांनी 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति' (बृहदारण्यक) असें जें अंतिम सत्य सांगितलें आहे त्याची यथार्थता व खोली चांगली मनांत भरते. वामन पंडितांनी तेंच तत्त्व,

पतिनिमित्त पती तुजला प्रिये ।
प्रिय असे सहसा म्हणतां नये ।।
परम आवडि आपुलि आपणा ।
वळख तूं तुज टाकुनि मीपणा ।।

अशा अनुवादरूपानें सांगितलें आहे. डॉ. वाटव्यांनी या तत्त्वाची, साहित्यशास्त्रदृष्ट्या थोडी टवाळीच केली आहे. 'अहंकारशृंगार' 'रतिशृंगार' इ० मतांचा उल्लेख करून पुढे रसांचें एकीकरण व पृथक्करण यावाबत त्यांनीं जी चर्चा केली आहे ती पहा व आधुनिक शास्त्रज्ञांची कामवृत्ति व अहंवृत्ति यावरील चर्चा पहा, म्हणजे खोल कोण व उथळ कोण याचा निवाडा लागेल. मनोविश्लेषणवाद्यांचा Ego-Libido चा सिद्धांत व भारतीय तत्त्वज्ञानावर आधारलेला 'आत्म-रती'चा सिद्धांत यांत तत्त्वतः फारसा फरक नाही. आणि म्हणूनच 'रति' स्थायीभाव असलेल्या शृंगारास आदिरस व रसराज मानणें शास्त्रसंगतच आहे. हाच रस सर्व रसांची योनि आहे; मग डॉ. वाटव्यांना रसांचा हा 'प्रकृतिविकृतिभाव' ठरविणें 'तितकेसें सशास्त्र नाही' (पृ. २३७) असें कितीहि वाटो !

'रति' या स्थायीभावांत 'अहंवृत्ति उत्कटतेनें कशी अनुस्यूत असावी लागते हेंहि लक्षांत घेण्याजोगें आहे. वात्सायनानें 'आभिमानिकसुखानुविद्धा फलवती अर्थप्रतीतिः प्राधान्यात् कामः' (१, २, १२) असें आपल्या शास्त्रापुरतेंच म्हटलेलें नाही. शरीर-संबंधांत 'मी या स्त्रीचा उपभोग घेणारा पुरुष' अशी अभिमान-वृत्ति पुरुषांत असते तर 'मी या पुरुषाकडून उपभोगली जाणारी स्त्री' अशी अभिमानवृत्ति स्त्रींत असते. या दोन वृत्तींतूनच स्त्री-पुरुषास त्यांचें त्यांचें सुख मिळतें. कामचक्राच्या धामधुमींत अगर स्त्री-पुरुषांच्या प्रेमाच्या धुंदींत या वृत्तीची स्पष्ट जाणीव होत नसली तरी, मोटर इंजिनच्या आंत असलेल्या व बाहेर न दिसणाऱ्या डायनामोप्रमाणे स्त्री-पुरुष सुखाची सारी विद्युच्छक्ति या वृत्तींतूनच निर्माण होत असते. पुरुषाच्या अभिमान-वृत्तीबद्दल वाद नाही. त्याची वृत्ति तर स्त्रियांच्या कैवाऱ्यांच्या दृष्टीनें कुप्रसिद्धच आहे. परंतु स्त्रीच्या आभिमानिक सुखाबद्दल मात्र अज्ञान व भ्रम भरपूर आहेत. 'मी उपभोगली जात आहें' अशी आभिमानिक वृत्ति ज्या स्त्रींत उदय पावत नाही ती स्त्री पुरुष-सुखहि खरें उपभोगूं शकत नाही हेंहि निश्चित. रसमर्मज्ञ शास्त्रज्ञांचा हाच अनुभव आहे. Colin Scott याचा "Sex and Art" हा लेख फार प्रसिद्ध आहे. त्यांत त्यानें असें म्हटलें आहे की, "The evidence of numerous literary expressions seems to show that under the influence of sexual excitement a woman regards her body as made for man's gratification, and that it is this complex emotion which forms the initial stage, at least, of her pleasure. Her body is the symbol of her partner, and indirectly for her, through his admiration of it, of their mutual joy and satisfaction" वात्स्यायनाचें प्रति-

पादन व Colin Scott चें म्हणणें एकच आहे. परंतु या म्हणण्याची व्याप्ति केवळ शरीरसंबंधापुरतीच मर्यादित नाही. ती मानवी मनोगुहेच्या अगदी आंतल्या भागासहि व्यापून राहणारी आहे. आणि म्हणून असें म्हणतां येतें की, कामप्रवृत्ति व अहंवृत्ति या 'रति' या भावाच्याच दोन बाजू आहेत. अथवा असेंहि म्हणतां येईल की, एकाच नाळानें वाढणाऱ्या अभिन्न यमलां-प्रमाणे (identical twins) त्या सहोदर आहेत. या गोष्टीचें एक गमतीदार प्रत्यंतरहि देतां येण्याजोगें आहे. रतिक्रीडेच्या सुखांत अधिक भर घालण्याकरितां रसिक जीवांनी, रंगमहालांत स्वतःचीं प्रतिबिंबें दाखविणाऱ्या मोठमोठ्या आरशांची जी विशेष योजना केलेली असते, ती या दृष्टीनें लक्ष देण्याजोगी आहे. स्वतःचें भान विसरून जाण्याच्या प्रसंगींहि, दुसऱ्या तऱ्हेनें, स्वतःचेंच भान अधिक दृढ करण्याचा हा मानवी स्वभाव विरोधात्मकतेनें किती शोभून दिसतो! या शोभेंत आणखी एका अलंकारानें विस्मयकारक भर घातली आहे. पुरुष हा जास्त आत्मनिष्ठ समजला गेला आहे व स्त्री ही जास्त पर-निष्ठ समजली गेली आहे. परंतु वस्तुस्थिति याच्या उलट आहे. स्त्री ही बालांप्रमाणेच कमालीची आत्मनिष्ठ आहे. प्रत्येक रसिकप्रिया स्वतःचें रूप कितीकदा तरी सजवितें व आरशांत कितीकदा तरी स्वतःस पाहून स्वतःची गोडी चाखते. असा एखादा रसिकप्रिय ठरला नसलेल्या मुलीहि भावी अपेक्षेनें (in anticipation) अभावितपणें हीच क्रिया करीत असतात. म्हणूनच स्त्री स्वभावतःच रूपगर्विता झाली आहे. अंतःकरणाचा संकोच करून टाकणारी लज्जा ही वृत्ति स्त्रियांचा निसर्गमधुर दागिना आहे. तो जरी 'self-abasement' मधून उत्पन्न होत असला तरी त्यानें स्त्रियांची आत्मप्रतिष्ठाच (self-respect) वाढते. 'विनयं मे रक्ष' म्हणणारें पात्र पर्यायानें हेंच करीत असतें. हा सर्व Narcissism चाच प्रभाव आहे!

'रति' या स्थायीभावाच्या यथार्थ व सुखबोधाकरिताच आतापर्यंत जी चर्चा केली आहे तिची पूर्ति आणखी दोन तीन महत्त्वाच्या मुद्यांच्या विवरणाशिवाय व्हावयाची नाही. त्यांपैकी पहिला मुद्दा असा आहे की, रति हा स्थायीभाव एखाद्या गंभीर सागराप्रमाणें आहे. सर्व नद्यांचें पाणी अखेरीस सागरास जसें जाऊन मिळतें व त्याचेंच तें परिपोषण करितें (समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत्) तसेंच रति या स्थायीभावाचें आहे. उत्साह, शोक, विस्मय, हास, भय, जुगुप्सा, क्रोध इ० भाव रति स्थायीभावाचें उत्तम पोषण करतात. किंबहुना असेंहि म्हणतां येईल की, रति स्थायीभावांतून यांचा उगम होतो व त्या स्थायीभावांतच त्यांचा लयहि होतो. भगवद्गीतेनें 'संगात् संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते' इ० श्लोकांत या तत्वाचा किंचित् आविष्कार केलाच आहे. रति स्थायीभावाचा हा विशेष नीट उलगडण्याकरिता हॅवलॉक एलिसच्या 'Love and Pain' या प्रकरणाचा चांगला उपयोग होतो. डॉ. वेल्डेनेहि "Ideal Marriage" या आपल्या जगप्रसिद्ध पुस्तकाच्या "Glimpses into General Human Sexual Physiology" या प्रकरणांत संक्षेपतःच पण सुंदर विवरण केलें आहे. पुरुषाच्या उत्साहवर्धक वीरश्रीनें स्त्री-हृदयाचें किती उद्दीपन होतें याचें जास्त वर्णन करण्याचें कारण नाही. पुरुषाच्या वीरत्वावर प्रसन्न होऊन स्त्रिया पुरुष प्रेमाच्या मोहांत अडकतात ही गोष्ट सर्वपरिचितच आहे. Marriage by capture बद्दल मानवशास्त्रांत (Anthropology) बरेंच वाद-रण माजलें आहे. स्त्रीस पळवून नेऊन तिच्याशीं विवाह लावण्याची प्रथा कित्येक रानटी मानवी समाजांत आहे. या प्रथेचा उगम कशांत आहे हा वाद जरी सोडून दिला तरी त्यांत कांही मानसशास्त्रीय खोल तत्त्व आहे हें एलिसनें उत्तम दाखविलें आहे. आपल्याकडेहि विवाहाचे अष्टविधी सांगितले आहेत. त्यांत 'राक्षस' या नांवाचा जो विधि सांगितला आहे तो 'marriage by capture' च आहे. श्रीकृष्णानें आपल्यास पळवून नेऊन आपल्याशीं विवाह लावावा, ही रुक्मिणीची अतिशय तीव्र कामना होती. अशा तऱ्हेची वृत्ति पुष्कळशा स्त्रियांत असते असें हॅवलॉक एलिस म्हणतो. (Vol. 3, P. 318) 'Marriage by Capture' मध्यें स्त्री अधिक सुखावते, हें नितांत खरें. 'श्रीकृष्णाची भरदार छाती पाहून आमचें मन मोहानें पुनः पुनः मोहांध होतें'

(वृहदुरः श्रियो वीक्ष्य धाम ते। मुहुरतिस्पृहा मुह्यते मनः ॥–श्रीमद्भागवत) असें रासक्रीडाप्रसंगीं म्हटल्याशिवाय गोपींना राहविलें नाही. पुरुशाने आपलें तेज व पारुष्य दाखवावें (वात्सायनानेंहि हेंच म्हटलें आहे) व त्यांनी विलोभित होऊन स्त्रीनें सर्वस्वी दुसऱ्याचेंच बनून जाण्याची आपली निसर्गमाधुरी ओतून प्रेमास सार्थ करावें, हें कामरहस्य आहे खरें, पण तें गूढ मात्र नाही. यापेक्षा भय, शोक इ० भावांनीहि स्त्री–पुरुषांच्या रतिभावाचें जें उद्दीपन होतें तें मात्र अत्यंत गूढ आहे. डॉ. वेल्डे म्हणतो की, "Such *Psychic Impressions* as act powerfully on the sexual emotions, and here we find that all such natural phenomena as give rise to *teror and anxiety*, can cause strong sexual excitement." (Ideal Marriage, P. 18) अशा प्रसंगीं, एकमेकाने एकमेकाच्या संरक्षणाकरिता म्हणून जवळ येऊन अन्योन्याचें सुख घ्यावें, एवढाच प्रकार नसतो, असें तो म्हणतो. भूकंप, वादळ इ. भौतिक व वातावरणात्मक गोष्टींचा परिणाम मनुष्याच्या मेंदूंतील केन्द्रावर कसा होतो याचें ज्ञान आम्हांस नाही, परंतु या गोष्टींचा उद्दीपक परिणाम होतो, ही गोष्ट मात्र खरी आहे असेंहि तो म्हणतो. Virgil ने ही गोष्ट ओळखली होती अशी तो साक्ष देतो. आपल्यालाहि 'मेघालोके भवति सुखिनोऽप्यन्यथावृत्तिचेतः। कंठाश्लेषप्रणयिनि जने किं पुरर्दूरसंस्थे'॥ (मेघदूत) असें म्हणणाऱ्या कालिदासाची साक्ष देतां येईल. भरताने शृंगाराच्या विभावांत अशा गोष्टींचा अंतर्भाव केलेलाच आहे. रति स्थायीभावाच्या साह्याने साक्षात् सायुज्यमुक्ति प्राप्त करून घेण्याच्या अभ्यासाकरिताच निर्माण झालेल्या 'गीतगोविंदा'चा प्रारंभ या दृष्टीने पहाण्याजोगा आहे. मेघाच्छन्न आकाश, काळोखी रात्र, सारी वनभूमि विशेष वृक्षांनी श्याम झालेली, अशा भयप्रद अवस्थेंत राधामाधवांची कुंजाकुंजांत रतिकेलि होते. (मेघैर्मेदुरमंबरं वनभुवं·····यमुनाकूले रहः केलयः ॥) वेल्डे पुढे आणखीहि असें म्हणतो की, "And not only *fear*, but *grief* may arouse sexual emotions...there is an *appreciable instinctive association of grief with love,* as can be confirmed by every one who studies his own or others' mental processes and characters." (P. 19) हॅवलॉक एलिस या सर्व विरोधी वाटणाऱ्या वृत्तींच्या उद्दीपकतेची जास्त चर्चा करतो. प्रथम शोकाबद्दलचें त्याचें विवेचन पाहूं. तो म्हणतो, शोकाने उद्दीपन झाल्याचें स्त्रियांत अधिक आढळून येतें. त्याने कांही स्त्रिया व कांही पुरुष यांचे एतद्विषयक अनुभव दिले आहेत. शोकाचे जेवढे जेवढे प्रसंग असतील, मग ते प्रत्यक्ष सृष्टींतले असोत की कलासृष्टींतले असोत, त्यांचा परिणाम उद्दीपकच व्हावा असा कांही लोकांचा नित्य अनुभव आहे. अंत्यविधींचा (funerals) असा परिणाम अनुभवणारे पुष्कळ आहेत असें तो म्हणतो. घरांत प्रिय माणसाचें प्रेत पडलें आहे व अकल्पितपणें उद्दीपनहि झालें आहे अशी विचित्र घटना अनुभवणारे लोक आहेत. भय, क्रोध, विस्मय, जुगुप्सा इ. भावांबाबतहि असेंच आढळून येतें. पशु, पक्षी, कीटक इ. योनींत स्त्री–पुरुषांतील भावजागृतीचा (Courting) प्रकार पाहिला म्हणजे भयप्रद गोष्टी रतिपोषक कशा होतात हें उत्तम लक्षांत येतें Colin Scott ने आपल्या सुप्रसिद्ध लेखांत ही गोष्ट चांगली विशद केली आहे. Stanley Hall या सुप्रसिद्ध शास्त्रज्ञाने इतर अनेक प्रश्नांप्रमाणेच या प्रश्नाचाहि खोल विचार करून असें म्हटलें आहे की, भीति हें एक फार मोठें बृंहण (tonic) आहे. पुरुषाचें उग्र वीर्य पाहून भय उत्पन्न होणाऱ्या स्त्रींतच त्याच्याबद्दल जास्त उत्तेजन उत्पन्न होतें ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे भय स्थायीभावाने रति स्थायीभावाची परिपुष्टि कशी होते तें लक्षांत येईल. क्रोधाचेंहि असेंच आहे. भीति व क्रोध या दोन्हीहि वृत्तींचा मिथुनीभाव साऱ्या सृष्टींत दिसून येतो. पशु, पक्षी, कीटकांमध्ये त्याप्रमाणेंच मानवांतहि भावजागृतींत (Courting) क्रोधाचा केवढा मोठा भाग असतो! पुरुषाच्या वीरवृत्तीने स्त्रीचें उद्दीपन होतें या म्हणण्याचाच दुसरा अर्थ असा आहे की, भीति, क्रोध, विस्मय इ० वृत्ती स्त्रीस उत्तेजक होतात.

स्त्रीचा असा एक स्वभावविशेष आहे की, तिला तिचें जीवन नेहमीच रोमाञ्चकारी (thrilling) हवें असतें. कांही तरी सतत नवनवीन रोमाञ्चकारी बदल तिला पाहिजे असतो. तिच्या शरीराची व मनाची घडणच अशी झाली आहे. डॉ. वेल्डेने आपल्या 'Sex Hostilily in Marriage' या अत्युत्कृष्ट ग्रंथांत या मुद्याची सांगोपांग शहानिशा केली आहे. या स्वभावाला वीर, भय, क्रोध, विस्मय इ० वृत्तींचीच खरी मदत होते. Hirn याने आपल्या 'Origins of Art" ग्रंथामधील "The Enjoyment of Pain या प्रकरणांत असें स्पष्ट म्हटलें आहे की, "........Anger, fear, sorrow, notwithstanding their distinctly painful initial stage, are often not only not avoided, but even deliberately sought." (P. 54) कित्येक स्त्रियांच्या बाबतींत असें आढळून येतें की, पुरुषाला चिडवून क्रोधतप्त केल्याशिवाय त्यांना पुरुषाचें सुखच घेतां येत नाही; मग ही गोष्ट साधण्याकरिता त्या हवे ते प्रकार करतील. क्रोध या भावाचा आविर्भाव अनुभवल्यानंतरच कित्येक तरुण–तरुणींत कामवेगाचा प्रथम आविष्कार झाल्याचें दिसून येतें. दुःखदायक गोष्टीहि सुखदायक कशा घडतात याचा पडताळा प्रेमाविष्कारांतील, दशन, ताडन, नखच्छेदन इ० सहज लीलांत मिळतोच. मनोविश्लेषणांतील 'Sadism' व 'Masochism' या संज्ञांनी याच गोष्टीचा विस्तार सांगितला आहे. जुगुप्सा उत्पन्न करणाऱ्या गोष्टीहि या सिद्धांतांतून सुटत नाहीत. एलिस स्पष्टच म्हणतो की, "Even when the emotion aroused is disgust it may stilmu act as a sexual stimulent," (Love and pain, P.178) डॉ. वेल्डेने याबाबत मोठें मार्मिक विवरण केलें आहे. सर्व कामशास्त्रज्ञांनी 'genital kiss' बद्दल सावधानपूर्वक शिक्षण दिलें आहे. 'गुह्ये......च चुम्बनं परिकीर्तितम्' असें भारतीय शास्त्रज्ञांनी हि सांगितलें आहेच. त्याबद्दल बोलतांना वेल्डे स्पष्ट म्हणतो की, "The old proverb says : from the sublime of the ridiculous is but a step. In the lore of love this proverb means that *supreme beauty and hideous ugliness are separated by a border-line, so slight that our minds and senses may transgress it, unawares !*" (Ideal Marriage, P. 156) जी गोष्ट एरव्ही जुगुप्सा उत्पन्न करील तीच गोष्ट, एखाद्या मात्रोपयोजित विषाप्रमाणे, सुखदायक कशी होऊं शकते याचें राजगुह्य वेल्डेने दिग्दर्शित केलें आहे. एरव्ही ज्या मुखरसाची माणसाव घृणा वाटते तोच कांहींदा किती प्रिय होतो ! जुगुप्सा या स्थायीभावाचीहि गोडी माणसास आवश्यक आहे, अशी विधात्याचीच पक्की योजना दिसते ! म्हणूनच लौकिक आनन्द देणाऱ्या व स्वयमेव दुर्गंधी आणणाऱ्या अवयवांच्या अति निकट सान्निध्यांत घाणीचा कळस उत्पन्न करणारीं मलोत्सर्गाचीं इंद्रियें त्याने जडवून दिलीं आहेत !! सारांश, मानवी अंतःकरणांतले सर्व भाव रति या स्थायीभावाचेंच कसें बृंहण करितात हें आतापर्यंतच्या संक्षिप्त चर्चेवरूनहि वाचकांच्या लक्षांत येऊं शकेल.

संस्कृत कवि व मराठी संत कवि यांनी आतापर्यंत चर्चिलेल्या तत्वाचें एका पूर्वकालीन ऐतिहासिक घटनेच्या निमित्तानें सुंदर चित्रण केलें आहे. ती घटना म्हणजे सीता–स्वयंवर ही आहे. शिवधनुर्भङ्गाच्या प्रसंगानें, कोणाकोणाच्या अंतःकरणांत कोणकोणते भाव उत्पन्न झाले व त्या सर्वांचाच परिणाम सीतेच्या अंतःकरणांतला रति स्थायीभाव उद्दीपित करण्यांत कसा झाला याचें चित्र सर्वच कवींनी हृद्यतेनें रेखाटलें आहे. वामन पंडित म्हणतात, धनुर्भङ्ग करावयास उठलेल्या रामचंद्राने त्या स्वयंवरसभेंत सुरमानवांना 'शृंगार–वीर–करुणादि नवरसांची' लीला दाखविली. (वस्तुतः साहित्यशास्त्राच्या दृष्टीनें इथे 'रस उत्पन्न झाले' हें म्हणणें काटेकोरपणाचें नाही. कारण त्या प्रसंगीं सुरमानवांत भावच उत्पन्न झाले होते, रस नव्हेत) ती कशी याचें कांहींसें सविस्तर वर्णन करतांना ते म्हणतात—

"शृंगाररूप पहिला रस चाखवीला;
बीभत्स शोककर त्यांतचि दाखवीला।
की पाहतां विषय मानुनि त्या मलाही,
चितानळीं मन करीलचि काम लाही" ॥

सभेंतील वेगवेगळया प्रेक्षकांच्या ठिकाणीं, करुण, वीर, हास्य, शांत, अद्भुत, भयानक, रौद्र व बीभत्स या रसांचा उदय झाला व जानकीच्या अंतःकरणांत शृंगाररसाचा उदय झाला. एवढया वर्णनानेच वस्तुतः सारें चित्रण पूर्ण होत नाही. एकटया सीतेच्याच अंतःकरणांत खुद्द रामचंद्राच्या मूर्तीमुळे या स्थायी भावांच्या छटांचे रंग पटापट कसे पालटले असतील व त्या साऱ्यांचाच परिणाम तिचा रति स्थायीभाव परिपुष्ट करण्यांत कसा झाला असेल हें पहाण्याजोगें आहे. श्री एकनाथांनी आपल्या 'भावार्थ रामायणां'त इतर गोष्टींचा विस्तार केला असूनहि सीतेच्या अंतःकरणाचें चित्रण केलें नाही. श्री समर्थांची प्रिय शिष्या वेणाबाई हिनें 'सीतास्वयंवरा'वरच स्वतंत्र ग्रंथ लिहिला आहे. रामायणें वदण्याचीं समर्थांचीं वरदानें लाभलेल्या या संत कवयित्रीनेंही, आपली काव्यकुशलता व भाषाप्रभुता सीतेच्या अंतःकरणांतला हा चित्रपट उमटविण्यास कां जुंपली नाही कोण जाणे! इतर हृदयंगम प्रसंग तर तिनें मोठे सुरसपणें वर्णिले आहेत. मृदु–मधु भाषेंत रामचरिताचें मानस अतिशय रसाळतेनें, हृद्यतेनें हळुवारपणें सांगणाऱ्या तुलसीदासांनीहि सीतेच्या मनांतील आंदोलनें फार सुंदर रेखाटलीं आहेत, पण त्यांतहि नवरसांचे झरे नाहीत. असो. विस्तारभयास्तव मीहि या चित्रणाचा मोह आवरतां घेतो. सारांश, शृंगारसार असलेल्या 'गीतगोविंदा'च्या 'रसिकप्रिया' टीकेनें म्हटल्याप्रमाणें, 'एवं कृतपरिकरसंकरः सकलरसचक्रवर्ती आनन्दमधुसन्दोहमधुरो रतिसहचरः शृंगाररसः समुन्मिषति', हेंच तत्त्व खरें आहे. मराठींत 'मांजर मारणें' या म्हणीकरिता जी दंतकथा सांगितली जाते तिच्यांतहि वरील सर्व भावांनी रतीचाच परिपोष कसा कसा होतो याचें उत्तम प्रत्यंतर मिळतें. (अपूर्ण)

पाणिनि सूत्रावरील अप्रसिद्ध टीका वैय्याकरणसर्वस्व

शंकर गोविंद चट्टे

संस्कृत व्याकरणशास्त्राचा प्रवर्तक भगवान् पाणिनि आहे असें जरी आज मानण्यांत येत असलें तरी पाणिनिपूर्वकालांत शाकल्य, काश्यप, शाकटायन, अपिशलि स्फोटायन, चांद्रवर्मन इत्यादि व्याकरणकार झाले असून त्यांचा उल्लेख पाणिनीनें केलेला आहे. " इंद्रश्चंद्र: काशकृत्स्नापिशली शाकटायनः । पाणिन्यमर जैनेंद्राः जयन्त्वष्टादिशाब्दिका " अशा प्रकारें अष्ट-शाब्दिकांचा निर्देश केला आहे. पाणिनीच्या अष्टाध्यायीवर कात्यायनाचीं वार्तिकें आहेत. कात्यायन दाक्षिणात्य असावा. पतञ्जलीने ' प्रियतद्धिता दाक्षिणात्याः ' असा जो उपहासपूर्वक उल्लेख केला तो बहुधा कात्यायनास उद्देशून असावा. पतञ्जलीनें पाणिनीय सूत्रावर भाष्य केलें आहे. पतंजली शेषाचा अवतार अशी कल्पना असल्यामुळे महाभाष्यास दुसरें नांव फणिभाष्य आहे. नैषधांत " परिरवावलयच्छलेन या न परेषां ग्रहणस्य गोचरः फणिभाषितभाष्यफक्किका विषमा कुण्डलतामवापिता " या श्लोकांतहि फणिभाष्याचा उल्लेख आहे.

पाणिनीची अष्टाध्यायी, कात्यायनाचीं वार्तिकें व पतंजलीचें महाभाष्य ही संस्कृत व्याकरणाची आद्य-त्रयी आहे. यांतहि " यथोत्तर मुनीनां प्रामाण्यम् " असा प्रामाण्यक्रम आहे. यद्विस्मृतमदृष्टं वा सूत्रकारेण तत् स्फुटम् । वाक्यकारो ब्रवीत्येवं तेनादृष्टञ्च भाष्यकृत् । (पदमञ्जरी) या कारणामुळेच हें प्रामाण्य मानण्यांत येतें. पाणिनि कात्यायन व पतञ्जलि यांचें प्रामाण्य सर्वच व्याकरणकारांना मान्य आहे. कैयट म्हणतो, " नहि भाष्यकारवार्तिककाराभ्यामभियुक्तः शब्दविषये कश्चिदस्ति " शब्दकौस्तुभांत १-१-२७ सूत्राच्या व्याख्येंत ' व्यथा द्वयेषामपि मेदिनीभृताम् ' या माघांतील श्लोकामधील ' द्वयेषाम् ' येथे सर्वनामतेचा विचार करतांना भट्टोजी दीक्षित म्हणतात, " यत्तु कश्चिदाह चान्द्रवर्मणव्याकरणे द्वयशब्दस्यापि सर्वनामताभ्युपगमात् तद्रीत्यायं प्रयोगः तदपि न । मुनित्रयमतेनेदानीं साध्वसाधुविभागः । तस्यैवेदानीन्तनशिष्टै वेदाङ्गतया परिगृहीतत्वात् ।

यापुढे अष्टाध्यायी, वार्तिकें, व महाभाष्य ह्या तीन ग्रंथांवरच अनेक टीका उपटीका झाल्या आहेत. महाभाष्यावर भर्तृहरीची वाक्यपदीय, कैय्यटाची महावाक्यप्रदीप, कैय्यटाचा टीकाकार नागोजीभट्टाची टीका प्रदीपोद्योत व उद्योताची व्याख्या, नागेशाचा शिष्य वैद्यनाथ पायगुण्डे कृत प्रभा, शेषनारायणाची सूक्तिरत्नाकर इत्यादि अनेक टीका आहेत. अष्टाध्यायी-टीका वामन व जयादित्य यांची काशिका, काशिकेवरील टीका, जिनेंद्रमुनीकृत पञ्चिका, यावरील टीका दुर्घटवृत्ति. काशिकेवरील दुसरी टीका हरदत्ताची पदमञ्जरी. अष्टाध्यायीची अन्य टीका शब्दकौस्तुभ–भट्टोजी दीक्षित. अष्टाध्यायीवर प्रक्रियाकौमुदी ही रामचंद्राचार्यांची टीका असून ती अष्टाध्यायींतील सूत्रक्रमानें नसून प्रकरणानुसार आहे. यावर रामचंद्राचा पौत्र विठ्ठल याची प्रसाद ही टीका आहे.

भट्टोजी दीक्षिताची अष्टाध्यायीवरील टीका सिद्धान्त कौमुदी. ही टीका पाणिनीय सूत्रानुक्रमानुसार नसून प्रकरणानुसार आहे. सिद्धान्त कौमुदी ही टीका झाल्यापासून अष्टाध्यायीसूत्रक्रमानुसार अध्ययन जवळजवळ बंद पडलें. एवढेंच नव्हे; तर " कौमुदी यदि कंठस्था वृथा भाष्ये परिश्रमः । कौमुदी यद्यकंठस्था वृथा भाष्ये परिश्रमः " अशा प्रकारें व्याकरणशास्त्रांत सिद्धान्त कौमुदीस महाभाष्याइतकें महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. सिद्धान्त कौमुदीनंतर मध्य-

अनुक्रमणिका

सिद्धान्तकौमुदी व लघुसिद्धान्त कौमुदी हे ग्रंथहि कौमुदीच्या धर्तीवर प्रकरणानुसार सूत्र विभागणी होऊन निर्माण झाले.

सिद्धान्त कौमुदीनंतर अष्टाध्यायी सूत्रक्रमानुसार व्याख्या करणाऱ्या टीकाग्रंथांची परंपरा जवळजवळ नष्ट झाली असतां वैय्याकरणसर्वस्व हा टीकाग्रंथ निर्माण झालेला दिसतो. हा ग्रंथ आज अतिशय दुर्मिळ झालेला असून पुष्कळांना ह्या ग्रंथाची माहिती देखील नाही. माझ्या संग्रहीं ह्या ग्रंथाची जी प्रत आहे ती फक्त पांचव्या अध्यायापासून अखेरपर्यंत आहे. ग्रंथ जुन्या वहीखात्याच्या कागदावर छापलेला असून बंगाली वळणाची देवनागरी लिपी आहे. ग्रंथाचा आरंभ उपलब्ध नसल्यामुळे मुद्रणस्थळ, काल व लेखक यांच्याविषयी माहिती मिळत नाही. लेखक कोण असावा, याचा शोध करीत असतां धरणीधर व काशीनाथ ह्या दोन पंडितांनी शके १७३१, इ. स. १८०९ मध्ये कोलब्रुक साहेबाच्या सहाय्यानें हा ग्रंथ तयार केला, इतकीच माहिती उपलब्ध झाली.

हा ग्रंथ सिद्धान्तकौमुदीपेक्षा अगदी वेगळ्या स्वरूपाचा आहे. सिद्धान्त कौमुदींत केवळ सूत्राचें विवरण आहे, तर या ग्रंथांत सूत्रविवरणाबरोबरच वार्तिक, काशिका, कैय्यट व भाष्य यांतील आवश्यक भाग दिला असून सूत्राचें व्याख्यान महाभाष्यांत केलेलें आहे किंवा नाही हें सांगितलें आहे. तेव्हा ह्या ग्रंथाचा परिचय व्हावा म्हणून कांही सूत्रांवरील टीका पुढे देत आहे.

(१) कृभ्वस्तियोगे संपद्यकर्तरिच्विः। ५-४-५०

संपद्यकर्तरि वर्तमानात्प्रातिपदिकात् डुकृञ्। भू। अस। इत्येतैर्धातुभिर्योगे वाच्विः स्यात्। अशुक्लः शुक्लः संपद्यते तं तथा करोति। शुक्लीकरोति। शुक्ली भवति। शुक्लीस्यात्। कृभ्वस्तियोगे किम्। अशुक्लः शुक्लो जायते। संपद्यकर्तरि किम्। कारकान्तरे माभूत्। अदेवगृहे देवगृहे संपद्यते। च्विविधानभूतवद्भावग्रहणम्। इह माभूत। संपद्यन्ते यवाः अभूततद्भाव इति वक्तव्यम्। प्रकृति विवक्षाग्रहणं च। इह माभूत्। संपद्यन्तेऽस्मिन् क्षेत्रे शालयः समीपादिभ्यः उपसंख्यानम्। अभूततद्भावे- कृभ्वस्तियोगे संपद्यकर्तरिच्विः इत्येषः सूत्रपाठः काशिकायाम्। अभूततद्भावग्रहणं वार्तिके दृष्टवान्यैः सूत्रे प्रक्षिप्तम् इति कैय्यटः।

अ अ। ८-४-६८

अ इत्येतस्य अ। इत्येष आदेशः स्यात्। विवृत- प्रयत्नकस्याकारस्य स्थाने संवृतप्रयत्नकोऽकारो अनेन क्रियते। वृक्षः। प्लक्षः। इह शास्त्रे कार्यार्थमकारो विवृत्तः प्रतिज्ञातस्तस्य तथाभूतस्यैव प्रयोगो माभूदिति प्रत्या- पत्तिः क्रियते। दीर्घप्लुतश्चानेन विवृतेनाऽकारे ग्रहण- म्न्येष्यते। इति काशिका। तेंन तयोः संवृतो न भवति। संवृते सर्वगुणमात्रिकस्य ग्रहणमिष्यते। इति काशिका। आदेशार्थं सवर्णार्थमकारो विवृतः स्मृतः। आकारस्य तथा न्हस्व तदर्थाभ्याणिनेरञः। कारिकेयम्। आदे- शार्थम्। वृक्षाभ्याम्। देवद ३ त्ता। आन्तर्यतो विवृ- त्तस्य विवृत्तौ दीर्घप्लुतौ यथास्याताम्। सवर्णार्थञ्च। अकारसवर्णग्रहणेन आकारमपि यथा गृह्णीयात् आकारस्य तथा न्हस्वः। अतिखट्वः। अतिमालः। अत्राकारस्य न्हस्वठञ्चमानो विवृतः प्राप्नोति संवृत्तो यथास्यादित्येवमर्थाप्रत्यापत्तिः। अकारस्य प्रत्यापत्तौ दीर्घस्य प्रतिषेधो वक्तव्यः। आदेशस्य चाऽनणत्वान्न- सवर्णग्रहणम्। केषामुदात्ताऽनुदात्तस्वरितानुनासिका- नाम्। सिद्धन्तु परनिर्देशात्। अकारस्य प्रत्यापत्तौ दीर्घप्रतिषेधः। आदेशस्य चाऽनणत्वात्सवर्णाग्रहणम्। सिद्धं तु न परनिर्देशात्। अत् अदितितपरनिर्देशः कर्तव्यः। इति अपरमते वार्तिकत्रयम्। एकशेषनिर्देशाद्वा स्वरानुनासिकभिन्नानां भगवतः पाणिनेः सिद्धम्। एकशेषनिर्देशोयम् अ अ इति भाष्यम्। षण्मात्रिका अकाणः स्थानिनो निर्दिश्यन्ते एवमादेशा अपि षडेव। ततश्चैकशेषस्तत्रषण्णां स्थानिनां निर्देशसामर्थ्याद्भिन्न- कालौ दीर्घप्लुतौ स्थानिभिर्नगृह्येते। तत्र यथासंख्यं षण्णां विवृतानां स्थाने षडादेशः संवृता भवन्तीति सिद्धमिष्टम् इति कैयटः।

केवळ उदाहरणार्थ म्हणून वर दोन सूत्रांची व्याख्या दिलेली आहे. त्यावरून पाणिनीय सूत्रावरील काशिका, कैय्यट व महाभाष्य यांच्यांतील विवरणाचा,

अनुक्रमणिका

सूत्राभ्यास करतांना परिचय व्हावा म्हणून, लेखकाने जो जो भाग आवश्यक होता तो तो संगृहीत केलेला आहे, असें दिसून येईल. या टीकेंत आणखी जें एक वैशिष्टय दिसून येतें तें हें की, अष्टाध्यायींतील ज्या सूत्रावर महाभाष्यांत व्याख्यान केलें आहे त्याचा लेखकाने उल्लेख केला आहे. त्यामुळे अष्टाध्यायींतील कोणत्या सूत्रावर भाष्य आहे हें सहज कळतें. तेव्हा सिद्धान्त कौमुदीच्या अध्ययनापेक्षा प्रस्तुत टीकेचें अध्ययन अभ्यासकांना जास्त उपयुक्त होण्यासारखें आहे. असें असतांहि या ग्रंथाचा अभ्यास न होण्याचें किंबहुना तो उपेक्षिला जाण्याचें मुख्य कारण म्हणजे भट्टोजी दीक्षिताच्या सिद्धान्तकौमुदीस प्रकरणवार सूत्रानुक्रमाच्या रचनेमुळे लाभलेली लोकप्रियता हें होय.

अभिप्राय

ज्ञानोदय

(षाण्मासिक हस्तलिखित. ज्ञानोदय मंडळ, नागपूर)

ज्ञानोदय मंडळातर्फे पंधरा ऑगस्टच्या स्वातंत्र्य मुहूर्तावर प्रकाशित झालेला 'ज्ञानोदय' हस्तलिखिताचा अंक अत्यंत चित्तवेधक आहे. छापील मासिकांपेक्षा करमुद्रितांना साहित्यसेवेचें अधिक मोल असतें. कारण त्यांत साधना, तप आणि शुचिता या त्रिविध गुणत्रयींचा सुरेख संगम झालेला प्रत्यक्षपणे दृष्टोत्पत्तीस येत असतो. त्यांतहि कलात्मक निर्दोषतेने नटलेला ज्ञानोदयासारखा अंक हाताळल्यावर तर प्रसिद्धिपराङ्मुख साहित्यसाधनेची उत्कृष्ट प्रचीति आल्याशिवाय राहत नाही. संपादक मंडळ आणि ज्ञानोदयाचें कार्यकारी मंडळ या दोहोंनी हा अंक नियोजनपूर्वक परिश्रमाने सजवला आहे. लेख, कविता, लघुकथा रेखाचित्रें इत्यादि वेगवेगळया दालनांना त्यांत भरपूर स्थान दिलेलें असून कलात्मक रंगसंगतीच्या मथळ्यांनी आणि संकेतात्मक सचित्रतेने या अंकाची आकर्षकता वाढविण्यास मदत केली आहे. प्रथमदर्शनीं डोळ्यांत भरणाऱ्या या बाह्य सजावटीचें संपूर्ण श्रेय उदयोन्मुख तरुण चित्रकार श्री. सुर्जीकर यांनाच आहे. त्यांचीं चित्रें वरपांगीं जरी मुळगांवकरांच्या वळणावर जाणारीं वाटलीं तरी कुंचल्यानें ओढलेल्या प्रत्येक रेखेंत एक प्रकारची अनिर्वचनीय सजीवता प्रामुख्यानें दिसून येते.

सौ. कुसुमताई जोशी यांची 'पंचवटीच्या छायेत' आणि कु. विद्या टोंगू यांची 'एका आईच्या पोटीं' या कथा, श्रीकांत साठे यांचे 'ढवळचा' हें शब्दचित्र आणि सौ. शांताबाई दंडिगे, मधु वावगावकर, प्रा. म ना. सरपटवार, सौ. लीला श्रीवास्तव, राम शेवाळकर, वसंत निनावे, सौ. प्रमिला भागवत, वसंत वऱ्हाडपांडे इत्यादींच्या कविता, या सर्वांमुळे ज्ञानोदयाचा हा १४ वा अंक सरस झालेला आहे. विविधतेंतलें सारें सौंदर्य त्यांत ठिकठिकाणीं विखुरलेलें आढळून येतें.

तरीपण कांही लेखांची निवड अधिक चिकित्सक पद्धतीनें जर झाली असती तर 'ज्ञानोदया'चा दर्जा अधिक वाढण्यास मदत झाली असती असें वाटतें. पृष्ठसंख्या वाढविण्यासाठी किंवा वैचित्र्य कायम ठेवण्यासाठी नाटयछटा किंवा एखादी प्रदीर्घ एकांकिका असलीच पाहिजे असा अट्टाहास न ठेवल्यास काटकसर आणि उच्च स्तर या दोहोंचाहि फायदा ज्ञानोदयाला मिळूं शकेल.

मासिकाचीं संपूर्ण १५० पानें श्री. देवदास पाटील यांनी मोत्यासारख्या सुबक अक्षरांत लिहून काढलीं आहेत. त्याबद्दल त्यांचें आणि इतका चांगला अंक काढल्याबद्दल संपादक मंडळाचें हार्दिक अभिनंदन.

ते चांगले नट आहेत व नाट्याच्या शास्त्रीय परीक्षणांत ते निष्णात आहेत. मृच्छकटिक, रघुवंश व अलंकारशास्त्र यांवरील त्यांचीं व्याख्यानें मोठीं मार्मिक व रसाळ होतात. एकाद्याचें ते विडंबन करूं लागले तर ते त्याची पाण्यावाचून करीत आहेत असें भासेल. त्यांचें वक्तृत्व रंगांत आलें म्हणजे त्याची गति फार मोठी असते. पण त्यांना तत्पूर्वी कोणी तरी डिवचल्यावाचून खरा रंग चढत नाही. ब्रह्मज्ञान व अलीकडचें विज्ञान याची ते सांगड घालत असतात. त्यांत प्रभाव असतो, पण स्पष्टीकरण क्लिष्ट असतें. त्यामुळे सामान्यांस बोध घ्यावयास अडचण जाते. ते कुटुंबवत्सल असल्यामुळे सर्व आप्तांना आपले वाटतात व असतात. मित्रांना ते उत्तम मित्र म्हणून असतात. पण त्यांच्या निष्ठेचा आजचा मुख्य विषय आत्मा व परमात्मा हा आहे. व त्यांत त्यांची नेहमी तंद्री लागलेली असते. त्यांचीं राजकीय, सामाजिक, धार्मिक व साहित्यिक मतें आजच्या नवमतवाद्यांना बव्हंशीं सनातन्यासारखीं वाटणें स्वाभाविक आहे. अर्थात् कै. दादासाहेब खापर्डे यांच्यांतील बऱ्याच गुणांचा परिस्थितीनुसार बाबासाहेबांत विकास झाला आहे, यांत संशयच नाही. विदर्भ साहित्य संघास बाबासाहेबांसारखा रसिक व गुणग्राहक अध्यक्ष लाभत गेला हेंहि विदर्भ साहित्य संघाचें भाग्य होय! त्यांना अभिवादन करून मी रजा घेतों!

उमेदवारीसंबंधी प्रपत्र

१९५६–५७ साळच्या विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीसाठी सभासदाच्या/अध्यक्षाच्या जागेकरिता उमेदवार म्हणून मी........................ ....यांचें नांव सुचवितों.

दिनांक........................ सूचक..............................

(स्वाक्षरी)

पूर्ण पत्ता ....

माझी या सूचनेला संमति आहे. अनुमोदक........................

दिनांक........................ (स्वाक्षरी)........................

उमेदवाराची स्वाक्षरी........................

पूर्ण पत्ता................................ पूर्ण पत्ता................................

संघवार्ता

हरीपांडे,
वि. सा. संघ,
कडून

केंद्रवृत्त, नागपूर

सांस्कृतिक कार्यक्रम :

" श्वेतकेतूची परंपरा "

ह्या विषयावर वि. सा. संघाच्या सांस्कृतिक कार्यक्रम समितितर्फे शनिवार दि. ९-११-५९ रोजी सायं. ६-३० वाजतां मुंबईच्या लॉ कॉलेजचे व्हाईस प्रिंसिपाल श्री. त्र्यंबक कृष्णराव टोपे यांचें विद्वत्तापूर्ण व्याख्यान झालें.

* *

नाट्य समिति :

" नाटकांतील कथानक आणि व्यक्तिदर्शन "

ह्या विषयावर वि. सा. संघाच्या नाटय समितीच्या व्याख्यानमालेतर्फे गुरुवार दि. १-१२-५९ रोजीं श्री. द. रा. गोमकाळे यांचें माहितीपूर्ण व्याख्यान झालें.

* *

विदर्भ साहित्य संघाच्या वाचनालयाचें उद्‌घाटन :

विदर्भ साहित्य संघाच्या गडकरी स्मारक समितीतर्फे कै. गडकरी वाङ्मय आणि इतर पुस्तकें असलेल्या ग्रंथालयाचें सोमवार दि. ३१-१०-५९ रोजीं सायं. ६-३० वा. उपाध्यक्ष, श्री. ना. रा. शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली श्री. वि. स. खांडेकर यांच्या हस्तें उद्‌घाटन झालें. ह्या प्रसंगीं श्री. वि. स. खांडेकर यांचें "नाटयवाङ्मयाचा व्यासंग" ह्या विषयावर उद्‌बोधक भाषण झालें. कार्यवाह श्री. पां. बा. गडकरी यांनी वाचनालयाच्या योजनेची माहिती देऊन या ग्रंथालयाला पुस्तकें आणि आर्थिक साहाय्य देण्याची विनंती केली.

* *

श्री. मनोहरभाई पटेल यांची भेट :

विदर्भ साहित्य संघाच्या तुमसर येथील १८ व्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष, श्रीमान् मनोहरभाई पटेल, विधानसभा सदस्य, यांनी भेट दिली. ह्या प्रसंगीं विदर्भ साहित्य मंदिराच्या

राधा–दामोदर दालनांत त्यांचें स्वागत करण्यांत आलें. तत्पूर्वी गडकरी सभागृहांत उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी श्रीमान मनोहरभाईंना पुष्पहार अर्पण करून विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळांतील सभासदांचा आणि उपस्थितांचा परिचय करून दिला.

श्रीमान् मनोहरभाईंनी मराठींतून स्वागताला उत्तर देऊन साहित्य आणि साहित्यिकांविषयीं आपला आदर व्यक्त केला आणि स्वागताध्यक्ष या नात्याने सर्वांना संमेलनास येण्याचें निमंत्रण दिलें. शेवटीं सरचिटणीस, श्री. ल. वि. पांढरीपांडे यांनी आभार मानले.

श्री. नानासाहेब जोग यांनी विदर्भ साहित्य मंदिराच्या योजनेची माहिती श्रीमान् मनोहरभाईंना करून दिल्यावर, ह्या नियोजित कार्याबद्दल त्यांनी आपली सहानुभूति व्यक्त केली.

*   *

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. १८-१२-५५ रोजीं सकाळीं ९ वाजतां, संघाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली, केन्द्रीय कार्यालयांत भरली.

(१) प्रथम सरचिटणिसांनी दि. ६-११-५५ च्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो सर्वानुमतें मंजूर झाला.

(२) घटना समितीने पाठविलेल्या घटना दुरुस्तीच्या ठरावावर विचार करण्यासाठी रविवार दि. २९ जानेवारी १९५६ रोजीं दुपारीं २ वाजतां सर्वसाधारण सभा बोलावण्यांत यावी, असें सर्वानुमतें ठरलें. (घटना दुरुस्तीच्या ठरावाचा मसुदा ह्याच अंकांत इतरत्र जोडलेला आहे.)

(३) अध्यक्षांनी मागील सभेंत ठरल्याप्रमाणे मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या कार्यकर्त्यांशीं झालेलें आपलें बोलणें सभेला निवेदन केलें. मध्यप्रदेश संशोधन मंडळाकडून कार्यकारी विश्वस्तांच्या सल्याने अध्यक्षांनी कराराचा मसुदा करून, लेखी लिहून घ्यावें आणि त्यांना कै. लोकमान्य टिळक सभागृहांत जागा देण्यांत यावी व तेथे मंडळाने संघाच्या परवानगीने सभा वगैरे कार्यक्रम घ्यावेत असें सर्वानुमतें ठरलें.

ह्या प्रश्नाच्या अनुषंगानेच उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांची, लोकमान्य टिळक सभागृहांत कै. लोकमान्य टिळकांचें तैलचित्र विदर्भ साहित्य संघाने लावावें, ही सूचना सर्वानुमतें मंजूर झाली.

(४) विदर्भ साहित्य संघाच्या १९५६–५७ सालच्या निवडणुकीच्या अध्यक्षांनी निश्चित केलेल्या तारखा सरचिटणिसांनी सभेला वाचून दाखविल्या; त्यांना सर्वानुमतें मान्यता देण्यांत आली. ह्या तारखा ह्याच अंकांत इतरत्र देण्यांत आल्या आहेत.

(५) विदर्भ साहित्य संघाच्या गोंडवण शाखेने मागणी केल्यावरून व त्या शाखेचें कार्य लक्षांत घेतां त्या शाखेला केंद्रीय कार्यालयाकडून पन्नास रुपये अनुदान ह्या वर्षीं देण्यांत यावें असें सर्वानुमतें ठरलें.

(६) १९९५-९६ चे निवडणूक लवाद, डॉ. य. खु. देशपांडे यांनी त्यांचे ताब्यांत असलेल्या नस्त्या आणि आलमारीच्या किल्ल्या कार्यकारी मंडळाच्या स्वाधीन केल्या. त्या निवडणुकी-बाबतचें काम आता संपलें आहे आणि म्हणून जुन्या मतपत्रिका व पाकिटें नष्ट करण्यांत यावींत व नस्त्यादि लेखी कागदपत्र कार्यालयांत सुरक्षित ठेवण्यांत यावेत ही त्यांची सूचना सर्वानुमतें मंजूर झाली.

(७) डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या सूचनेनुसार महाराष्ट्रांतील साहित्य संस्थांची एक सांघिक घटना तयार करण्याविषयी विदर्भ साहित्य संघाने दि. १७ सप्टेंबर १९९१ रोजीं मंजूर केलेला तद्विषयक ठराव, "आज अस्तित्वांत असलेल्या साहित्य संस्थांच्या प्रतिनिधींनी ही नवी संस्था स्थापन करावी. ह्या नव्या संस्थेने केलेले ठराव शिफारशींच्या स्वरूपाचे (Recommendatory) राहतील आणि आमच्या संस्थेच्या स्वायत्ततेला ढळ पोचेल असें कांहीहि आमच्या संस्थेला बंधनकारक राहणार नाही" अशा स्वरूपाच्या संशोधनासह अध्यक्षांनी मसुदा तयार करून तो महाराष्ट्र साहित्य परिषदेला पाठविण्यांत यावा, असें सर्वानुमतें ठरलें.

(८) विदर्भ साहित्य संमेलनाच्या १८ व्या अधिवेशनाला आलेले ठराव सरचिटणिसांनी सभेला सादर केले.

(९) संघशाखा घटना उपसमितीचे आमंत्रक श्री. द. रा. गोमकाळे यांनी पाठविलेल्या पत्रासोबत समितीने तयार केलेल्या अहवालावर कार्यकारी मंडळाच्या पुढील सभेंत विचार करण्यांत यावा, असें सर्वानुमतें ठरलें.

(१०) प्रा. कृ. व्यं. पेशकार यांनी केलेल्या सूचनेवरून विदर्भ साहित्य संघाच्या अमरावती शाखेला ह्यावर्षी पाऊणशें रुपये अनुदान मंजूर करण्यांत आलें.

अध्यक्षांनी उपस्थित सभासदांचे आभार मानल्यावर ही सभा संपली.

* *

गोंदिया-शाखा वृत्त

गेल्या आक्टोबर महिन्यांत गोंदिया येथील विदर्भ साहित्यसंघ शाखेसाठी खालील सभासदांची पुढील वर्षाकरितां पदाधिकारी व कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून निवड करण्यांत आली.

अध्यक्ष:--श्री. छोटुभाई क्षत्रीय.

उपाध्यक्ष:--१. श्री. केशव खंडेराव कुळकर्णी, २. श्री. सुरेंद्रराज रघुनाथराव डोये,

कार्यवाह:--बाळकृष्ण काशिनाथ देशमुख.

सहकार्यवाह:--प्रभाकर शंकर तनखिवाले.

सभासद:--श्री. वि. अ. लिमये, श्री. ना. ग. डवीर, श्री. ना. ह. तेलंग, श्री. स. गो. बापट, श्री. रा. वा. काटे, श्री. वा. कृ. देशपांडे, श्री. प्र. त्र्यं. घुसे, श्री. आबासाहेब देशपांडे, श्री. ग. गो. व्यवहारे, श्री. आनंद देशपांडे, श्रीमती अनसूयाबाई देशमुख, सौ. नलिनीबाई बापट.

ता० २०-११-५९ रोजीं वरील शाखेच्या विद्यमानें श्री. छोटुभाई यांचे घरीं श्री. मेहता यांचें 'अरविंद तत्त्वज्ञान' या विषयावर प्रवचन झालें. व्याख्यात्यांनी अधिकारवाणीने तत्त्वज्ञानासंबंधी चांगली उपयुक्त माहिती दिली.

* *

गोण्डवणशाखा वृत्त

वि. सा. संघ गोंडवण शाखेचा प्रथम वार्षिकोत्सव दि. ८ ते ११ डिसेंबरपर्यंत साजरा करण्यांत आला. दि. ८–१२–५९ रोजीं श्री. दादासाहेब सदाफळ यांचे हस्तें उद्‌घाटन होऊन नंतर श्री. मामासाहेब ओक यांचें "कालिदास दर्शन" या विषयावर व्याख्यान झालें. दुसऱ्या दिवशीं दि. ९–१२–५९ रोजीं श्री. भाऊ पुणेकर, बी. ए. यांचे अध्यक्षतेखाली श्री. पु. ता. पुराणिक यांचें "नाटक व कादंबरी यांचा तुलनात्मक विमर्श" या विषयावर व्याख्यान झालें. दि. १०–१२–५९ रोजीं दुपारीं २ ते ५ पर्यंत वक्तृत्व स्पर्धा झाल्या. त्यांत 'अ' गटांत माध्यमिक शाळेंतील शिक्षकांनी व 'ब' व 'क' गटांत माध्यमिक शाळेंतील विद्यार्थ्यांनी भाग घेतला. दि. ११–१२–५९ रोजीं सकाळीं ८ ते ९ निबंधलेखन व ९ ते ११ भावगीत स्पर्धा झाली.

दि० ११–१२–५९ रोजीं सायंकाळीं ५ वाजता 'युगवाणी' चे संपादक श्री. दि. ब. पंडित यांचे अध्यक्षतेखाली मुख्य व अखेरचा कार्यक्रम झाला. त्याच वेळेस माननीय मा. सां. कन्नमवार, स्वास्थ्य मंत्री, नागपूर हे उपस्थित होते. त्यांनी शाखेस रु. १५० ची उदार देणगी दिली. त्यांची, तसेंच सारे कार्यक्रम ज्या न्यू इंग्लिश हायस्कूलच्या शृंगारलेल्या भव्य सभागृहांत झाले, त्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. दादाजी कावडकर यांची वेळोवेळीं देत असलेल्या सहकार्याबद्दल, विदर्भ साहित्य संघाची गोण्डवण शाखा कायमची ऋणी आहे.

* *

विदर्भ साहित्य संघ

१९५६-५७ सालाकरिता मताधिकारी सभासदांच्या यादींतील दुरुस्ती

[घटना नियम १२ (अ) प्रमाणे १५ डिसेंबर ५५ पर्यंत मताधिकारी सभासदांच्या प्रसिद्ध झालेल्या सूचींतील नांवांबद्दल ज्या तक्रारी आल्या त्यांची खालीलप्रमाणें दुरुस्ती करण्यांत आली आहे.]

आजीव सभासद [अ] विभाग

नागपूर जिल्हा

१. श्री. चंद्रशेखर गजानन माडखोलकर; र. क्र. ९६; पृ. ४. यांचा पत्ता–C/o श्री. स. ल. पराडकर, वकील; प्रकाश बंगला, बालाजी प्लॉटस्, अमरावती हा आहे.

मताधिकारी सभासद [अ] विभाग

चांदा जिल्हा

१. डॉ. मु. वा. इंदापवार; र. क्र. २३, पृष्ठ १६; यांचा चांदा जिल्ह्यांतून बदललेला पत्ता—चितार ओळ, इतवारी; नागपूर हा आहे.

भंडारा जिल्हा

१. श्री. भरत श्रीहरी श्रीरामवार; मुख्याध्यापक; बाप्पा माध्यमिक शाळा; मु. देवरी (भंडारा) र. क्र. ४; पृष्ठ २१; यांचा भंडारा जिल्ह्यांतून बदलेला पत्ता—स. पा. बा. मा. शाळा; गुंजेवाही; त. ब्रम्हपुरी; जि. चांदा–आहे.

वर्धा जिल्हा

१. श्री पु. गो. निजसुरे, अधीक्षक; बुनियादी शिक्षण विद्यालय; वर्धा; र. क्र. २, पृष्ठ २२; यांचा वर्धा जिल्ह्यांतून बदलेला पत्ता—मुख्याध्यापक; सरकारी कृषि विद्यालय; वाशीम, जि. आकोला–हा आहे.

मतदार सभासद [ब] विभाग

अमरावती जिल्हा

१. श्री. शेषराव ढोके; र. क्र. १२९; पृष्ठ ४१; यांचा पत्ता—संपादक, "अमरावती जनपदसभा समाचार" मु. पो. धामोरी-कसबा, जि. अमरावती-हा आहे.

२. श्री. श्री. पुं. कठाळे, र. क्र. ६४; श्री. अ. ना. घोडे, र. क्र. ६६, कु. कुसुमताई विश्वंभरराव देशपांडे, र. क्र. ६५; श्री. नारायण शेषराव देशपांडे, र. क्र. ६७, ह्या धामणगांवच्या चार सभासदांचीं नांवें अनवधानतेने "ब" विभागांत पडलीं आहेत. तीं "अ" विभागांत आहेत असें समजण्यांत यावें.

चांदा जिल्हा

१. श्री. मारोती आत्माराम कोल्हे' मु. पो. कोठारी; र. क्र. २८; पृष्ठ ४७ ऐवजी श्री. मारोती आत्माराम लोहे असें वाचावें.

बुलढाणा जिल्हा

१. श्री. वि. भि. देशपांडे, अध्यापक; भारत विद्यालय; किनगांवजहू; र. क्र. २८; पृष्ठ ४८; ऐवजी श्री. वि. भ. देशपांडे असें वाचावें.

भंडारा जिल्हा

१. श्री. एम्. जे. नेमावरकर; जज्ज मॅजिस्ट्रेट; भंडारा; र. क्र. ६१, पृष्ठ ५१; ऐवजी श्री. जी. एम्. नेमावरकर असें वाचावें.

वर्धा जिल्हा

१. श्री. आर. एस्. सावतकर; र. क्र. १, पृष्ठ ५७ यांचा पत्ता—गुडस् फोरमन; सेंट्रल रेल्वे, स्टेशन वर्धा हा आहे

मुंबई

१. श्री. पी. एन्. इंदूरकर; र. क्र. १४; पृष्ठ ५८; ऐवजी श्री. पी. एन्. इंदूरकर; ७९, घोगा स्ट्रीट, मुंबई १; असें वाचावें.

(अध्यक्षांच्या आदेशानुसार)

दि. १७-१२-५५
केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता,
नागपूर-१.

ल. वि. पांढरीपांडे;
सरचिटणीस, वि. सा. संघ

चुकीची दुरुस्ती आणि क्षमस्व

१९५६-५७ सालच्या मताधिकारी सभासदांची यादी डिसेंबर अंकांत प्रसिद्ध करतांना अत्यंत परिश्रमपूर्वक खबरदारी घेऊन ती तयार करण्यांत आली. त्यानंतर १५-१२-५५ पर्यंत आलेल्या सर्व दुरुस्त्या ह्या अंकांत घेण्याची खबरदारी घेण्यांत आली आहे. असें असूनहि यादींत कांही दोष आणि मुद्रणदोषांमुळे उडालेलीं अक्षरें, अनुस्वार, कानामात्रादि राहून गेले असल्यास सभासद सहृदयतेने क्षमा करतील अशी आशा आहे.

दि. १६-१२-५५

ल. वि. पांढरीपांडे
सरचिटणीस, वि. सा. संघ

विदर्भ साहित्य संघ

विशेष साधारण सभेची सूचना

रविवार दिनांक १८-१२-५५ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेने दिलेल्या आदेशानुसार, घटना समितीने सुचविलेल्या घटना दुरुस्तीच्या ठरावावर विचार करण्यासाठी, घटना नियम १० आणि २२ अनुसार, रविवार दिनांक २९ जानेवारी १९५६ रोजीं दुपारी दोन वाजतां केन्द्रीय कार्यालयांत, विशेष साधारण सभा भरेल.

तरी ह्या सभेला सर्व सभासदांनी अवश्य उपस्थित राहण्याची कृपा करावी, ही विनंती.

विशेष सूचना--गणपूर्तीच्या अभावीं ही सभा स्थगित झाल्यास, तीच सभा, त्याच जागीं, त्याच दिवशीं दुपारीं २-३० वाजतां भरेल.

दि. १८ डिसेंबर १९५५
केंद्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता,
सीताबर्डी, नागपूर १

ल. वि. पांढरीपांडे
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

घटना दुरुस्तीचा मसुदा

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाने घटनाविषयक दुरुस्ती सुचविण्यासाठी जी उपसमिती नेमली होती त्या समितीने ता. १४ डिसेंबर १९५५ रोजीं पुढील दुरुस्त्या सुचविल्या आहेत:—

[१] ज्या अर्थी कार्याचा वाढता व्याप लक्षांत घेतां विदर्भ साहित्य संघाच्या १९५२ च्या घटनेंत फेरबदल करणें आवश्यक आहे, त्या अर्थी नियम २२ ला अनुसरून पुढील मांडलेले बदल करण्यांत यावेत:—

[२] घटनेच्या नियम ७ मध्ये खालील बदल करण्यांत यावेत—ई पदाखालील वाक्यांत "वर्गणी रुपये ५०" ऐवजीं "वर्गणी १०० रुपये" हे शब्द घालावेत.

[उ] 'पन्नास' ऐवजीं "शंभर" हा शब्द घालावा.

[ऊ] 'तीन' ऐवजीं 'सहा' हा शब्द घालावा.

नियम ७ खाली खालील स्पष्टीकरण टाकण्यांत यावें—'घटनेची वरील दुरुस्ती अंमलांत येण्याच्या तारखेच्या पूर्वी जे लोक आजीव सभासद झाले असतील त्यांच्या अधिकारांना या संशोधनाने बाध येणार नाही.'

[३] पूर्वीचा नियम ८ वगळून त्या ऐवजीं खालील नियम घालावा—

(१) ८ सभासदत्व : [१] वयाची २१ वर्षें पूर्ण झालेल्या कोणत्याहि मराठी भाषा-प्रेमी व्यक्तीस संघाचे उद्देश, घटना व नियम मान्य करून ठरविलेल्या नमुन्यावर स्वाक्षरी केली म्हणजे तीस सभासद होतां येईल.

(२) सभासद होऊं इच्छिणाऱ्या व्यक्तीने कार्यकारी मंडळाने निर्दिष्ट केलेल्या पत्रावर स्वतः सही करून आवेदनपत्र करून दिलें पाहिजे. त्या आवेदनपत्रा-वर संघाच्या मतदानाला पात्र अशा सभासदाची प्रस्तावक म्हणून व दुसऱ्या तशाच सभासदाची अनुमोदक म्हणून सही असली पाहिजे. आवेदनासह नियमानुसार त्या विशिष्ट सभासदत्वाची वर्गणी पाठविली पाहिजे. आवेदनपत्र आणि वर्गणी संघाचे केंद्रीय कार्यालयांत दिली पाहिजे व त्याची पोंच कार्यालयाने दिली पाहिजे.

(३) सभासदत्वासाठी आलेलीं सर्व आवेदनपत्रें सरचिटणीसाने कार्यकारी मंडळाच्या त्यानंतर होणाऱ्या पुढल्या सभेंत प्रस्तुत केलीं पाहिजेत. आवेदनपत्राला कार्यकारी मंडळाची मंजुरी ज्या दिवशीं दिली जाईल त्या दिवसापासून आवेदनकर्ता संघाचा सभासद मानला जाईल.

[४] **"नियम १२ निवडणुकी"**

या नियमांत खालील दुरुस्त्या करण्यांत याव्यातः—

(१) उपनियम "अ"—"यांची निवडणुक दरवर्षीं दिनांक १ मार्च पूर्वी करण्यांत येईल" या शब्दांऐवजी पुढील शब्द घालण्यांत यावेत; "यांच्या निवडणुकी दर तीन वर्षांनी दिनांक १ मार्च पूर्वी करण्यांत येतील."

(२) त्याच उपनियमांत "३० नोव्हेंबर पर्यंत" या ऐवजी "दिनांक २ डिसेंबर पर्यंत' व "३१ डिसेंबर" याऐवजी "दिनांक २ जानेवारीपर्यंत" असे अंक व शब्द घालण्यांत यावेत.

(३) सध्याच्या उपनियम 'इ'बद्दल खालील उपनियम घालण्यांत यावाः— "अध्यक्षाच्या निवडणुकीस तसेंच कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार सभासद होऊन ज्यांना संघाच्या नियमाप्रमाणे एक वर्ष झालें असेल व ज्यांच्याकडे कोणतीहि वर्गणी थकित नसेल अशाच सभासदांना राहील व त्यांचीं नांवें वरील सूचींत निराळीं दर्शविलीं जातील. या सूचीस 'अ' सूचि असें संबोधिलें जाईल."

अनुक्रमणिका

(४) उपनियम 'ई' मधील '३१ जानेवारीपर्यंत' या अंका आणि शब्दाऐवजी '२ फेब्रुवारीपर्यंत' असे अंक व शब्द घालण्यांत यावेत.

(५) उपनियम 'उ' ऐवजी खालील उपनियम घालण्यांत यावा:—[उ] नांवें सुचविण्याच्या शेवटच्या तारखेनंतर दोन दिवसांचे आंत निवडणुकीच्याकरितां उभे असलेल्या उमेदवारांच्या नामनिदर्शक पत्रिकांची छाननी करण्यांत आली पाहिजे. छाननीकरतां नेमलेल्या दिवसांच्या नंतर दोन दिवसांच्या आंत कोणत्याहि उमेदवारास आपली उमेदवारी लेखी विनशर्त मागे घेतां येईल. अशाप्रकारें उमेदवारी परत घेतली जाण्याचा समय संपल्यानंतर योग्यप्रकारें नामनिर्दिष्ट झालेल्या उमेदवारांची यादी निश्चित करून ती केन्द्रीय कार्यालयांत प्रकाशित झाली पाहिजे.

[६] उपनियम 'ऊ' मध्ये असलेला 'सरचिटणिसांनी' हा शब्द गाळण्यांत यावा व त्या वाक्यानंतर पुढील वाक्य जोडण्यांत यावें; 'कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीसाठी पाठविलेल्या मतपत्रिकेच्या प्रपत्रांत असलेल्या नांवांपैकी १६ उमेदवारांना मतें दिलींच पाहिजेत. तसें न केल्यास ती मतपत्रिका रद्द समजण्यांत येईल.

(७) उपनियम 'ए' मध्ये 'आपल्याला' या शब्दाऐवजी 'कार्यकारी मंडळाला' हे शब्द घालण्यांत यावेत, व प्रथम येणाऱ्या 'अध्यक्ष' या शब्दाऐवजी "उपनियम 'औ' प्रमाणे नेमलेला नेमणुकाधिकारी" हे शब्द घालण्यांत यावेत व दुसऱ्यांदा त्या नियमांत येणाऱ्या 'अध्यक्ष' या शब्दाऐवजी 'तो अधिकारी' हे शब्द घालण्यांत यावेत.

(८) उपनियम 'ए' मधील "ती चिठ्ठया टाकून करावी" या शब्दा ऐवजी "ती निवड निवडणुकाधिकाऱ्याने चिठ्ठया टाकून करावी" असे शब्द घालण्यांत यावेत.

(९) उपनियम "औ" बद्दल पुढील उपनियम घालण्यांत यावा:—"अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकीच्या तारखा ठरविणें व नामनिर्देश पत्रांची छाननी व तदनंतरची निवडणुकीसंबंधाची कामें करण्याकरितां चालू निवडणुकीकरिता उभे राहणारा व चालू कार्यकारी मंडळाचा सभासद नसलेला अशा एका सभासदाची नियुक्ति कार्यकारी मंडळ करील व हा अधिकारी निवडणुकाधिकारी या नांवाने संबोधिला जाईल. दोन्ही निवडणुकींची वर म्हटल्याप्रमाणे सर्व कार्यवाही या अधिकाऱ्याच्या आदेशाप्रमाणे होईल."

(१०) उपनियम 'अं' या उपनियमांतील "संमेलनप्रसंगीच्या" हा शब्द गाळण्यांत यावा.

(११) उपनियम 'अः' या उपनियमांतील "१५ दिवसांच्या आंत जाहीर केला पाहिजे" या शब्दानंतर संपणाऱ्या वाक्यानंतर पुढील वाक्य घालण्यांत यावें:—

"लवादाने अपरिहार्य कारणास्तव तशी मागणी केल्यास १५ दिवसांच्या मुदतीपेक्षा अधिक मुदत देण्याचा अधिकार अध्यक्षास राहील."

[५] **नियम** १४. या नियमांतील उपनियम 'अ' बद्दल खालील उपनियम घालण्यांत यावा:–

(अ) निवडणुकीच्या निकालापासून वीस दिवसांच्या आंत नवीन निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा, वर कलम ११ आ मध्ये नमूद केलेले पदाधिकारी निवडण्यासाठी, जुना अध्यक्ष बोलावील. नवीन अध्यक्ष व कार्यकारी मंडळाच्या नवीन सभासदांना ह्या सभेंत हजर राहून मत देण्याचा पूर्ण अधिकार राहील. त्यांपैकी कोणाच्या निवडणुकीविरुद्ध लवादासमोर अर्ज अनिर्णित आहे ही गोष्ट त्यांच्या मताधिकारास अगर सभेच्या निर्णयास बाधक होणार नाही. लवादाच्या निर्णयामुळे ह्या सभेच्या वेळीं ज्यांची निवडणूक रद्द झाली असेल त्यांना ह्या सभेच्या कारवाईंत भाग घेतां येणार नाही, परंतु इतर सभासदांना त्या जागेवर पुन्हा निवडणूक होईपर्यंत वाट न पहातां ह्या नियमानुसार पदाधिकारी निवडण्याचा व घटनेप्रमाणे इतर सर्व कार्य करण्याचा पूर्ण अधिकार राहील. लवादाने जर नवीन अध्यक्षाची निवडणूक रद्द ठरविली असेल तर पुन्हा निवडणूक होईपर्यंत जुना अध्यक्ष हाच नवा अध्यक्ष म्हणून कार्य चालवील. हें नवें कार्यकारी मंडळ दिनांक १ एप्रिलपासून अधिकारारूढ होईल.

[६] घटना नियम १४ मधील (इ) कलम वगळून त्या ऐवजी खालील नियम घालण्यांत यावा. "लवादाच्या निर्णयाव्यतिरिक्त कोणत्याहि अन्य कारणाने अध्यक्षाची अगर कार्यकारी मंडळांतील कोणतीहि जागा रिकामी झाल्यास ती भरण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील."

[७] पूर्वीच्या नियम १५ 'कार्यकारी मंडळाचीं कर्तव्यें व अधिकार' ह्यांत सुरुवातीला खालील वाक्य घालण्यांत यावें—

"कार्यकारी मंडळ हेंच सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट अन्वयें नेमावें लागणारें जनरल कौन्सिल समजलें जाईल."

[८] पूर्वीच्या नियम १६ द्रव्यनिधि व मालमत्ता ह्यांत खालील दुरुस्त्या करण्यांत याव्यात. (अ) कायमनिधि ह्या कलमांतील शेवटल्या ओळींतील "साधारण सभेची" ह्या शब्दाचे लगत पूर्वी "विश्वस्तांची किंवा" हे शब्द घालावे.

चालू निधि ह्या सदरांतील कलम (४) वगळण्यांत यावें.

[९] नियम १८ संमेलन यांत खालील दुरुस्ती करण्यांत यावी— [ई] च्या पूर्वीचा नियम वगळून त्या ऐवजीं खालील नियम घालण्यांत यावा--"संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी कार्यकारी मंडळ तीन नांवें सुचवील व ह्या तीन नांवांतून संमेलनाचें स्वागत मंडळ संमेलनाच्या अध्यक्षाची निवड करील. संमेलनाच्या अध्यक्षाचे अधिकार संमेलनापुरतेच मर्यादित राहील.

[१०] कलम २१ "इतर नियम" ह्यांत पुढील नियम जोडण्यांत येतात--

[ऐ] संघाच्या वतीने कायदेशीर कामें करण्याकरितां आणि कायद्याचा सल्ला देण्यासाठी योग्य सल्लागार नेमण्याचा अधिकार संघाच्या अध्यक्षास राहील.

अनुक्रमणिका

तसेंच न्यायालयीन कार्यासाठी संघाचे प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार अध्यक्ष, सरचिटणीस किंवा नागपूरचा चिटणीस ह्यांना राहील.

(ओ) (१) जर कार्यकारी मंडळाच्या मतें संघाच्या कोणत्याहि सभासदाचें वर्तन संघाचे ध्येय, उद्देश अथवा हित यांना बाधक होणारें असेल तर कार्यकारी मंडळास बहुमताने त्या सभासदाचें सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार राहील. परंतु अशा प्रकारचा ठराव करण्यापूर्वी कार्यकारी मंडळाच्या वतीने त्या सभासदाच्या वर्तनांतील आक्षेपार्ह भाग काय आहे हें त्यास लेखी कळवून त्याचें उत्तर मागविलें गेलें पाहिजे व ज्या सभेंत संबंधित सभासदाचें स्पष्टीकरण विचारण्यांत येईल त्या सभेसमोर तोंडी निवेदन करण्याची संधि त्या सभासदाला दिली पाहिजे.

(२) अशा रीतीने संघाचें सभासदत्व रद्द केल्या गेलेल्या व्यक्तीस कार्यकारी मंडळाचा ठराव पोचण्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आंत अपीलाचे रूपाने तो प्रश्न सर्वसाधारण सभेपुढे मांडण्याकरिता सरचिटणीसांकडे आवेदनपत्र देतां येईल.

(३) अशा प्रकारें अपील न केल्यास सभासदत्व रद्द झालेल्या व्यक्तीबाबत कार्यकारी मंडळाने केलेला निर्णय अखेरचा व निर्णायक समजण्यांत येईल; परंतु जर अपील केलें गेलें तर सर्वसाधारण सभेकडून होणारे निर्णय अखेरचे व निर्णायक समजण्यांत येतील.

वरील संशोधनें ता.…………………पासून अमलांत येतील.

आजच्या सभेंत स्वीकृत केलीं गेलेलीं संशोधनें, पुढे म्हटल्याप्रमाणे प्रभावी राहतील:—

वर्गणी बदलाबद्दलचें संशोधन १-४-५६ पासून.

इतर संशोधनें सभा ठरवील त्या तारखेपासून.

सभेने जर निवडणूक संपण्यापूर्वीची तारीख ठरविली तर निवडणुकाधिकारी नेमण्यासंबंधीची कार्यवाही त्या तारखेपासून दोन दिवसांत केली पाहिजे व तो अधिकारी त्या तारखेनंतर करावयाच्या निवडणुकीच्या कामकाजाबद्दल आदेश देईल व तत्पूर्वी अध्यक्षांच्या आदेशाने केल्या गेलेल्या कामांबाबत कोणाचाहि आक्षेप घेण्याचा कोणालाहि अधिकार राहणार नाही.

अनुक्रमणिका

१९५६--५७ सालासाठी

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष आणि कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकीविषयी सूचना

१. निवडणुकीसाठी मतदानाची शेवटची तारीख सोमवार दि. २०-२-१९५६ रोजीं सायंकाळीं ६ वाजेपर्यंत निश्चित झाली आहे.

२. मतदार सभासदांची 'अ' आणि 'ब' विभागांची यादी 'युगवाणी'च्या डिसेंबर १९५६ च्या अंकासोबत सर्व मतदार सभासदांकडे पाठविली आहे.

३. निवडणुकीस उमेदवार म्हणून उभें राहण्याचा अधिकार सभासद होऊन ज्यांना संघाच्या नियमाप्रमाणे एक वर्ष झालें असेल अशाच सभासदांना आहे. अशीं नांवें 'अ' विभागाच्या यादींत आहेत. तेव्हा मतदारांच्या 'अ' विभागांतील कोणत्याहि व्यक्तीस निवडणुकींत उमेदवार म्हणून उभें राहण्यास पात्र असलेल्या कोणत्याहि व्यक्तीचें नांव, तिच्या लेखी अनुमतिसह, कोणाहि मताधिकारी सभासदाला सुचवितां येईल.

४. निवडणुकीसाठी उमेदवारांचीं नांवें गुरुवार दि. १२-१-१९५६ रोजीं सायंकाळीं ६ वाजेपर्यंत केन्द्रीय कार्यालयाकडे सरचिटणीसांच्या पत्त्यावर पोचलीं पाहिजेत.

५. शनिवार दि. १४-१-१९५६ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां उमेदवार पत्रिकांची छाननी केन्द्रीय कार्यालयांत होईल. त्यावेळीं उमेदवारांनी स्वतः अगर प्रतिनिधी-द्वारा हजर राहावें.

६. सोमवार दि. १६-१-१९५६ रोजीं सायंकाळीं ६ चे आंत कोणाहि उमेदवारास आपली उमेदवारी परत घेतां येईल.

७. कार्यकारी मंडळासाठी एक अध्यक्ष व सोळा सभासद यांची निवडणूक होईल.

दि. १४-१२-१९५५
केन्द्रीय कार्यालय,
विदर्भ साहित्य संघ,
उत्तर अंबाझरी रस्ता,
सीताबर्डी, नागपूर-१.

बा. ग. खापर्डे
अध्यक्ष
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघ

परीक्षा-समिति

केंद्राधिकारी व परीक्षार्थी यांना महत्वाच्या सूचना

१ सर्व केंद्राधिकाऱ्यांना उत्तरपत्रिका जानेवारी १० पर्यंत आणि प्रश्नपत्रिका १५ जानेवारी ५६ पर्यंत पाठविण्यांत येतील.

२. परीक्षार्थींनी आपलीं प्रवेशपत्रें ता. १०-१-५६ ते १५-१-५६ चे दरम्यान केंद्राधिकाऱ्यांकडून न्यावींत.

३. पारंगताचे विद्यार्थी नसलेल्या सर्व केंद्रांकडून उत्तरपत्रिका पाठविल्याची "रजिस्ट्रेशन-स्लिप" ता. २३ चीच असलेली पाठविली पाहिजे.

४. पारंगतचें केंद्र असलेल्या केंद्रांकडून २४ जानेवारीची "रजिस्ट्रेशन-स्लिप" कार्यालयाकडे यायला पाहिजे.

५. वर सांगितलेल्या तारखांशिवाय अन्य तारखेस उत्तरपत्रिका पोस्ट केल्यास त्या रद्द ठरविण्यांत येतील व मुळीच तपासल्या जाणार नाहीत.

६. ग्रंथानुदानाकरिता चालूं वर्षी १ मे ५६ पर्यंत कोणतेंहि आवेदनपत्र स्वीकारलें जाणार नाही.

७. चालूं वर्षाकरिता प्रचारकांना पुरस्कार देण्याची योजना आहे. तिला अनुसरून प्रचारकांनी निर्धारित प्रचारक आवेदन पत्र पाठवून प्रमाणपत्र दि. १५-१-५६ च्या आंत प्राप्त करून घ्यावें.

८. पुरस्कार हवा असणाऱ्यांनी प्रचारक क्रमांक लिहूनच निर्धारित आवेदनपत्र परीक्षाफल घोषित झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत कार्यालयाकडें पाठविलें पाहिजे.

(प्रा.) पां. कृ. सावळापूरकर
संचालक

(प्रा.) माणिक के. वैतुले
कार्यवाह

केंद्राधिकारी सूचि

दि. १०-१२-५५ पर्यंत मान्यता पावलेल्या केंद्रांची सूचि

१ श्री. गु. वि. पोटे, B. A., LL. B., B. T.
प्रधानाध्यापक, श्रीशिवाजी हायस्कूल
तेल्हारा (जि अकोला)

२ श्री. म. स. संगई, B. A.
सीताबाई संगई हायस्कूल,
अंजनगांव सुर्जी (जि. अमरावती)

३ श्री. ज. भी. इंगळे, स्नातक,
मु. **कावली**, पो. अशोकनगर,
ता. चांदूर (जि. अमरावती)

४ श्री. प्रधानाध्यापक, सरस्वती विद्यालय,
गोंदिया (जि. भंडारा)

५ श्री. म. ता. राजूरकर
अध्यापक, नगरपालिका शाळा क्र. १.
वणी (जि. यवतमाळ)

६ श्री. त्र्यं. वा. सन्त
प्रधानाध्यापक, से. व. हायस्कूल
तेल्हारा, (जि. अकोला)

७ श्री. मा. शि. देशमुख, M. A., B T., LL. B.
केंद्राधिकारी, वि. सा. संघ,
मालेगांव, (जि. अकोला)

८ संचालक, मध्यप्रदेश भाषाविभाग
नागपूर

९ श्री. ना. दे. गिरडे
मुख्याध्यापक–माध्यमिक शाळा,
गिरड

१० श्री. गं. ना. खानझोडे,
मुख्याध्यापक–युनियन हायस्कूल
वडनेरा

११ श्री. गो. ना. निवसरकार, B. A.
मुख्याध्यापक–गुरुदेव सेवामंदिर,
मोझरी

१२ श्री. पुं. ब. चौधरी
मुख्याध्यापक–दा. भा. विद्यालय,
साऊर

१३ श्री. गो. ए. पळसोदकर
मुख्याध्यापक–पू. मा. शाळा,
शेंवा

१४ श्री. भा. ना. नांदूरकर, B. A.
शिवाजी विद्यालय,
यवतमाळ

१५ श्री. मा. सो. भोगळे, B. A. B. T.
मुख्याध्यापक–न्यू ईरा हायस्कूल,
जळगांव (वऱ्हाड)

१६ श्री. प्रधानाध्यापक,
जनपद हायस्कूल
पातुर्डा

१७ श्री. पां. या. सरमुकद्दम
मुख्याध्यापक–मराठी माध्यमिक शाळा,
रासेगांव

१८ श्री. अ. गु. देशमुख
सरकारी सिनीयर बेसिक स्कूल
बेलोरा

१९ श्री. शं. रा. बखारे
मुख्याध्यापक–रा. ध. हायस्कूल,
पांढुर्णा

अनुक्रमणिका

२० श्री. द. शं. फडके, B. A., B. T.
मुख्याध्यापक–न्यू हायस्कूल,
अमरावती

२१ श्री. गो. आ. भांडारी, B. A., LL. B.
वकील
साकोली

२२ श्री. म. शं. बनसोड, B. A., B. T.
मुख्याध्यापक–श्रीराम विद्यालय
रामटेक

२३ श्री. प्रधानाध्यापक,
शहीद मिश्रा हायस्कूल,
तिरोडा

२४ डॉ. दि. पु. रोपळेकर, L. H. M.
अजंठा

२५ श्री. वि. वा. देशपांडे,
मुख्याध्यापक–पूर्व माध्यमिक शाळा,
सिरोंचा

२६ श्री. ना. सि. पाटील
मुख्याध्यापक–लोक जीवन विद्यालय,
वेला

२७ श्री. र. सि. सजनपवार,
मुख्याध्यापक–स. मूलभूत विद्यालय,
गडचिरोली

२८ श्री. ल. वि. मानकर,
मुख्याध्यापक–आदर्श विद्यालय,
आमगांव

२९ श्रीमती चं. वऱ्हाडपांडे M. A., B. T.
मुख्याध्यापिका–नूतन म. विद्यालय
पहाडगंज, दिल्ली

३० श्री. ज. म. माकोडे,
अध्यापक–म्यू. इ. इ. हायस्कूल,
मोवाड

३१ श्री. रा. वि. करपे, B. A., B. T.
एम्. एम्. हायस्कूल,
हिंगणघाट

३२ श्री. ज. सो. नाडेकर, B. A. B. T.
नाडेकर हायस्कूल,
नरखेड

३३ श्री. कृ. आ. पाठक, B. A. B. T.
अध्यापक–एडेड हायस्कूल
दारव्हा

३४ श्री. य. के. शेकदार,
मुख्याध्यापक–ए. आय्. ई. एम. स्कूल,
पांढरकवडा

३५ श्री. रा. पं. कुळमेथे
मुख्याध्यापक–स. सि. बेसिक शाळा
सगांव, (जि. चांदा)

३६ श्री. श्री. पुं. कठाळे,
से. फ. ला. हायस्कूल,
धामणगांव

३७ श्री. पां. स. नानोटी, B. A. B. T.
अध्यापक, पब्लीक हायस्कूल,
उमरेड

३८ श्री. हृषिकेश शर्मा,
संचालक–म. प्र. राष्ट्रभाषा प्रचार समिति,
नागपूर

३९ श्री. ज. व्या. व्यास, M. A.
अध्यापक–नगरविद्यालय
सिंदी

४० श्री. गो. मो. रानडे, B. A. B. T.
उपप्राचार्य–महिला महाविद्यालय,
जवलपूर

४१ श्री. म. र. बनपूरकर
मुख्याध्यापक–ने. हि. हायस्कूल,
ब्रह्मपुरी

४२ श्रीमती मालतीबाई श्रीखंडे, M. A. B. T.
प्रधानाध्यापिका–गव्ह. गर्ल्स हायस्कूल
सागर

४३ श्री. सु. मो. निमकर
सरकारी सिनीयर बेसिक शाळा,
यावली

४४ श्री. वि. मो. कातोरे
मुख्याध्यापक–जनपद कन्या मिडलस्कूल,
अल्लीपूर, (जि. वर्धा)

४५ श्री. नि. वा. जोशी
मुख्याध्यापक–सरकारी सिनीयर बेसिक शाळा,
नागभीड

४६ श्री. क. रा. वुगदाने
केंद्रव्यवस्थापक–वि. सा. संघकेंद्र
मेहकर (जि. वुलढाणा)

४७ श्री. दे. ल. खर्चे, B. A.
एडेड् इ. एस्. हायस्कूल,
शेलगांव-बाजार (जि. वुलढाणा)

४८ श्री. उ. ग. बिनीवाले
प्रधानाध्यापक–भारतविद्यालय,
किनगांवजट्टू (जि. वुलढाणा)

४९ श्री. के. आ. देशमुख
मुख्याध्यापक–श्रीशिवाजी हायस्कूल
शिरजगांव-वंड (जि. अमरावती)

५० श्री. प्र. ग. बयेस, B. A.
मुख्याध्यापक–श्रीशिवाजी हायस्कूल
लोणार

५१ श्री. र. ल. उपासनी
मुख्याध्यापक–सरकारी पूर्वमाध्यमिक
शाळा, आर्वी (जि. वर्धा)

५२ श्री. जी. पी. इंगळे
प्रधानाध्यापक–आय्. इ. एम्. स्कूल
शेंदूरजना-घाट, (जि. अमरावती)

५३ श्री. गो. ब. देशपांडे
मुख्याध्यापक–पूर्व माध्यमिक शाळा
आर्णी, (जि. यवतमाळ)

५४ श्री. द. दा. भालेराव
मुख्याध्यापक–हायस्कूल, सावनेर

५५ श्री. भ. या. कुळकर्णी
मुख्याध्यापक–सरकारी पूर्व माध्यमिक शाळा
मूर्तीजापूर

५६ श्री. क्रा. स. मलेवार, B. A. B. T.
मुख्याध्यापक–नगरपालिका नेहरू विद्यालय,
तुमसर

५७ श्री. श्री. तु. तोंडरे
प्रधानाध्यापक–जनता विद्यालय,
नागभीड

५८ श्री. भा. पुं. आकलेकर, M. Com.
९२९ अ, वरचें माड (आकलेकर निवास)
उभादांडा-वेंगुर्लें

५९ प्रधानाध्यापक–जनताविद्यालय
नेरपिंगळाई

६० श्री. प. ग. कुंभारे
म. भा. विद्यालय,
देसाईगंज

६१ श्री. ना. ग. राऊत
प्रधानाध्यापक–म. मा. शाळा,
नेरी

६२ प्रधानाध्यापक–मन्रो हायस्कूल,
भंडारा

६३ प्रधानाध्यापक–दिनबाई विद्यालय
दिग्रस

६४ प्रधानाध्यापक
स. मा. शाळा
चिखली (जि. अमरावती)

६५ श्री. श्री. मा. कुळकर्णी,
भारतीय भाषाध्ययन मंदिर
नागपूर

६६ प्रधानाध्यापक–चौधरी हायस्कूल,
अकोला

६७ प्रधानाध्यापिका–सरकारी कन्याशाळा,
खामगांव

६८ प्रधानाध्यापक–मॉडेल हायस्कूल,
आर्वी

६९ प्रधानाध्यापक–नांदूरा हायस्कूल,
नांदूरा

७० प्रधानाध्यापक–शिवाजी हायस्कूल
आकोट

७१ प्रधानाध्यापक–न्यू इंग्लीश हायस्कूल
वरूड

७२ मुख्याध्यापक–सरकारी पूर्व माध्यमिक शाळा,
कामठी

७३ श्री. तु. ना. काटकर,
कस्तुरबा मार्ग–मानापेठ
चांदा

७४ श्री. प. गो. लाखणीकर, B. A. B. T.
समर्थ विद्यालय, लाखणी

७५ श्री. ब. पं. तांदळे
श्रीकृष्णभुवन–रामनगर
वर्धा

७६ श्री. श्रा. न. आप्पा
मुख्याध्यापक, माध्यमिक शाळा,
असदपूर

७७ श्री. धों. य. सडेकर
ज्ञानलता मंडळ
मु. पो.–चंदगड (जि. बेळगांव)

७८ श्री. ज्ञा. रा. साबू, B. A. B. T.
अध्यापक–सरकारी प्रशिक्षण विद्यालय,
बुलढाणा

७९ श्री. म. ल. मिटकरी, M. A. B. T.
प्रधानाध्यापक,
सेलू (जि. वर्धा)

८० प्रधानाध्यापक–सरकारी हायस्कूल,
चिखली

८१ श्री. ल. बा. पोठक
प्रधानाध्यापक,
वरोडा (जि. चांदा)

८२ प्रधानाध्यापक–सरकारी हायस्कूल,
मोर्शी

अनुक्रमणिका

८३ श्री. न. म. निळे,
बल्लारपूर

८४ श्री. यू. के. गोस्वामी
वाडेगांव
ता. बाळापूर, (जि. अकोला)

८५ श्री. जमनाप्रसाद केवलिया
राष्ट्रभाषा शिक्षणकेंद्र,
पंजाब नॅशनल बँकजवळ, ऑडाक हायस्कूल
वर्धा

८६ श्री. दे. ब. जाधव
मुख्याध्यापक–पूर्व माध्यमिक शाळा,
अकलारा; ता. चिखली
(जिल्हा बुलढाणा)

८७ श्री. शं. प. कुळकर्णी, B. A. B. T.
प्रधानाध्यापक–श. मा. शाळा,
उमरखेड (जि. यवतमाळ)

८८ सौ. शकुन्तलाबाई देशमुख
अध्यापिका–मराठी माध्यमिक शाळा,
अंतोरा (जि. अमरावती)

८९ श्री. ग. ल. वेलेकर
मुख्याध्यापक–नेहरू विद्यालय,
चिमूर

९० श्री. मुख्याध्यापक मराठी माध्यमिक शाळा,
मोहपा ता. सावनेर
(जि. नागपूर)

सूचना—वरील यादींत कांही चुका घडण्याची शक्यता आहे. संबंधितांनी सुधारणा सुचवावी ही विनंती. कार्यवाह–परीक्षा समिति.

विदर्भ साहित्य संमेलन

अधिवेशन अठरावें, तुमसर

(दिनांक २४ व २५ डिसेंबर १९५५)

स्वागताध्यक्ष श्रीमान् मनोहरभाई पटेल यांचें भाषण

उपस्थित प्रतिनिधि आणि बंधुभगिनींनो,

भंडारा जिल्हा आणि तुमसर शहर यांच्या वतीने स्वागतमंडळातर्फे मी आपले मनःपूर्वक स्वागत करतो. आमचें तुमसर हें शहर साहित्य आणि संस्कृति यांच्या चळवळीपासून आजपर्यंत दूर रहात आलेलें आहे. भंडारा जिल्ह्यांतील अशा या छोटया व्यापारी शहरांत विदर्भ साहित्य संघाचें १८ वें अधिवेशन भरण्याचा योग आला, हें मी आमचें सुदैव समजतो. कारण, त्यामुळे आपल्यासारख्या रसिक आणि विद्वान बंधुभगिनींच्या दर्शनाची आणि आपल्यापैकीं कांही विद्वानांचीं भाषणेंहि ऐकण्याची संधि तुमसरच्या जनतेला प्रथमच मिळणार आहे. म्हणून, मला आशा वाटते कीं, विदर्भ साहित्य संघाचें हें अधिवेशन आमच्या या लहानशा टुमदार शहरांत साहित्य आणि संस्कृति यांच्या चळवळीविषयीं अभिरुचि आणि आस्था निर्माण करील.

माझी मातृभाषा गुजराती आहे, हें आपण सर्व जाणताच. तरी देखील आपण मला या अधिवेशनाचें स्वागताध्यक्षपद सर्वानुमतें दिलें, ही घटना मी विदर्भ साहित्य संघाच्या उदार, राष्ट्रीय धोरणाची निदर्शक समजतो. या घटनेचा अर्थ असा कीं, विदर्भ साहित्य संघाचें व्यासपीठ हें मराठी भाषेचें व्यासपीठ असलें, तरी या व्यासपीठावर भारतांतील सर्व भाषाभगिनींना सारखेंच मानाचें स्थान आहे; व कोणत्याहि प्रकारच्या क्षुद्र संकुचित भेदभावांना विदर्भ शारदेच्या या पवित्र प्रांगणांत थारा नाही. मला हें माहित आहे की, विदर्भ साहित्य संघाने आपल्या व्यासपीठावर

अनुक्रमणिका

हिंदीभाषी आणि इतरहि अन्यभाषी साहित्यिकांचा सन्मान अनेक वेळां मोठ्या अगत्याने केलेला आहे. मी हें व्यापक राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने शुभचिन्ह समजतो. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा प्रत्येक भारतीय स्त्रीला आणि पुरुषाला असा आदेश आहे कीं, भारतांतील प्रत्येक व्यक्तीने आपल्या मातृभाषेबरोबरच राष्ट्रभाषा हिंदी आणि एक प्रादेशिक भाषा शिकण्याचा आणि बोलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महात्माजींच्या या आदेशाला सर्वथैव पोषक असेंच विदर्भ साहित्य संघाचें धोरण आहे, हें पाहून मला आनंद वाटतो. मी स्वत: महात्माजींच्या या आदेशानुसार आजपर्यंत वागत आलो आहे; व गुजराती ही जरी माझी मातृभाषा असली, तरी मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषा मला मातृभाषेइतक्याच प्रिय आहेत. या दोन्ही भाषांची मी आजपर्यंत यथाशक्ति सेवा करीत आलो आहे.

आमचें हे तुमसर शहर लहान असलें, तरी आपल्या या नागपूर प्रांतांतील तें एक मोठें व्यापारी केंद्र आहे. येथें तांदूळ उत्तम प्रकारचा पिकतो. तो किती स्वादिष्ट आणि सुगंधी आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव आपल्याला स्वागत मंडळाच्या पाहुणचाराचा आस्वाद घेतांना आपोआपच येईल. तांदुळाप्रमाणेच मँगनीजच्या खाणींबद्दलहि हा भाग प्रसिद्ध आहे; व त्यामुळें जगाच्या बाजारपेठेंत या आमच्या छोट्या शहराला महत्वाचें स्थान मिळालेलें आहे. या भागांत विडीचा धंदाहि भर-भराटीला आलेला असून त्या धंद्यांतील कामगार वर्गांत मुख्य भरणा आपल्या महार बंधूंचा आहे. भंडारा जिल्ह्यांतील ही प्रमुख जात सुसंघटित असून तिच्यांतून अनेक राजकीय, सामाजिक आणि साहित्यिक कार्यकर्ते उदयाला आले आहेत, हें सांगावयाला मला अभिमान वाटतो.

तुमसर शहराने आपल्या राज्याच्या आणि राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतिसाठी व्यापारांत मिळविलेल्या संपत्तीचा विनियोग आजपर्यंत कळकळीने केलेला आहे, ही गोष्टहि मला आपल्याला मोठ्या अभिमानाने सांगणें अवश्य वाटतें; व त्याबद्दल येथील व्यापारी वर्गाचें कोणीहि अभिनंदन करील. १९२० पासून १९४७ पर्यंत स्वातंत्र्याचा जो उग्र लढा भारतांत सर्वत्र चालू होता, त्या लढ्यालाहि तुमसरमधील आणि भंडारा जिल्ह्यांतील व्यापारी वर्गाने हातभार लावलेला आहे; व कांही व्यापारी बधूंनी त्या लढ्यांत प्रत्यक्ष भाग घेऊन बंदिवासहि भोगलेला आहे. राजकीय क्षेत्राप्रमाणेच धार्मिक, सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रांतहि तुमसरच्या धनिकांची सेवा संस्मरणीय अशीच झालेली आहे. येथील लोकमान्य टिळक राष्ट्रीय शाळा गेली २७ वर्षे ज्ञानदानाचें जें पवित्र कार्य करीत आहे, त्या तिच्या कार्याला तुमसरचा धनिक वर्ग आणि बाजार गंज अत्यंत निष्ठेने मदत करीत आलेला आहे. साहित्याच्या

क्षेत्रांतील तुमसरच्या दानशौर्याचें अगदी ताजें उदाहरण तर नागपूरच्या जनतेच्या रोजच्या पाहण्यांतच सध्यां येत असलें पाहिजे. तें उदाहरण म्हणजे अर्थातच मध्यप्रदेश हिंदी साहित्य संमेलनाचें नागपूर येथे उभारलेले जात असलेलें भव्य 'मोर भवन' हें होय. कै. श्रीमान् गोवर्धनदासजी, कै. श्रीमान् श्रीरामजी, सेठ फत्तेचंदजी मोर, सेठ दुर्गाप्रसादजी सराफ, धर्मवीर सेठ गोपीकिसनजी अग्रवाल, सेठ घासीलालजी प्रभृति तुमसरच्या उद्योगपतींनी भंडारा जिल्ह्याची आणि नागपूर प्रांताची केलेली सेवा इतकी थोर आहे की, त्यांचें दानशौर्य हा नागपूर प्रांताच्या सार्वजनिक जीवनाचा एक मोठा आधार आहे, असें म्हणावयाला मला शंका वाटत नाही.

पण तुमसरने केवळ व्यापारी केंद्र म्हणूनच देशाची सेवा केली आहे असें आपण समजूं नका. भंडारा जिल्ह्यांतील आदरणीय देशभक्त श्री. माकडे गुरुजी आणि त्यांनी गेली २७ वर्षे चालविलेली लोकमान्य टिळक राष्ट्रीय शाळा हे दोन्ही देशसेवा आणि स्वार्थत्याग यांचे खरोखरी अतिशय उच्च असे आदर्श आहेत. तुमसरच्या या राष्ट्रीय शाळेने गेलीं २७ वर्षे नागपूर प्रांताला स्वातंत्र्यनिष्ठ कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यसैनिक हे दोन्ही पुरविलेले आहेत; व त्या शाळेचे हें राष्ट्रकार्य लक्षांत घेऊनच मध्यप्रदेश मंत्रिमंडळांत काँग्रेसश्रेष्ठींनी श्री. माकडेगुरुजींना स्थान देऊन शाळेचा पर्यायाने गौरव केला. कर्मवीर बापूजी पाठक आणि श्री. दामलेगुरुजी यांचेंहि कार्यक्षेत्र टिळक राष्ट्रीय शाळा हेंच कांही काळ होतें. आज विदर्भ साहित्य संघाचें जे वार्षिक अधिवेशन येथे भरत आहे, त्याची जबाबदारी मुख्यतः या शाळेच्या चालकांनी घेतलेली असल्यामुळेच खरोखरी तिचा अध्यक्ष या नात्याने आपले सर्वांचे स्वागत करण्याचें भाग्य मला लाभलें आहे. हें अधिवेशन यशस्वी करण्याच्या कामी प्रजासमाजवादी पक्षाचे कार्यकर्ते श्री. नारायणराव कारेमोरे आणि इतर पक्षांचेहि कार्यकर्ते यांचें हार्दिक सहकार्य स्वागतमंडळाला लाभलें, ही गोष्ट तुमसरच्या सार्वजनिक जीवनांतील ऐक्याची निदर्शक आहे.

आपल्या या अधिवेशनाचें उद्‌घाटन राष्ट्रसंत श्रीतुकडोजीमहाराज यांच्यासारख्या अखिल भारताला आदरणीय होऊन बसलेल्या थोर समाजसेवकाकडून होत असून, त्याचें अध्यक्षस्थान विदर्भाचे जुन्या पिढींतील ज्ञानवृद्ध नेते श्रीमान् बाबासाहेब खापर्डे हे भूषित करणार आहेत. विशेष आनंदाची गोष्ट ही कीं, राष्ट्रसंतानी लिहिलेल्या 'ग्राम-गीते'च्या प्रकाशनाचा समारंभ गीताजयंतीच्या सुमुहूर्तावर आपल्या या अधिवेशनांत महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रो. डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या हस्तें व्हावयाचा आहे. महाराजांनी रचलेली ही 'ग्राम–गीता' मराठी प्रदेशांत सर्वत्र घरोघर वाचली जाईल आणि ग्रामसेवेचे जे पाठ

तिच्यांत दिलेले आहेत ते खेड्यापाड्यांतून निष्ठेनें आचरले जातील, अशी मला आशा आहे. तीन वर्षांपूर्वी विदर्भ साहित्य संघाचें अधिवेशन मोझरी येथें महाराजांच्या गुरुकुंजांत भरलें होतें; व आज त्यांच्या हस्तें या संमेलनाचें उद्‌घाटन व्हावयाचें असून त्यांच्या 'ग्राम–गीतेचें' प्रकाशन उद्या येथें व्हावयाचें आहे. या घटना विदर्भ साहित्य संघाला ग्रामीण जनतेविषयीं वाटणाऱ्या जिवंत कळकळीची साक्ष देतात, असेंच कोणीहि म्हणेल.

विदर्भ साहित्य संघाने मराठी जनतेंत साहित्य आणि संस्कृति यांच्याविषयीं आस्था आणि अभिरुचि उत्पन्न करण्याचें कार्य गेलीं तीस वर्षें अत्यंत चिकाटीनें चालविलेलें आहे. नागपूर येथें विदर्भ साहित्य मंदिराची सुंदर इमारत उभारण्यांत आल्यामुळें त्याच्या कार्याला आतां स्थायी स्वरूप प्राप्त झालेलें आहे. गेल्या विजया-दशमीच्या सुमुहूर्तावर विदर्भ साहित्य संघाने रंगमंदिराची योजना हातीं घेतली आहे. विदर्भ साहित्य संघाच्या व्यापक धोरणानुसार हें रंगमंदिर नागपूर प्रांतांतील सर्व भाषांच्या कलोपासकांना आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना खुलें रहाणार आहे. आज नाग-पूरसारख्या आपल्या राजधानीच्या शहरांत आधुनिक पद्धतीचें एकहि रंगमंदिर नाहीं. ती उणीव या योजनेनें भरून निघणार आहे. मला आशा आहे की, विदर्भांतील सर्व भाषांची आणि जातींची धनिक आणि रसिक जनता या योजनेला उत्साहानें हातभार लावून विदर्भ साहित्य संघाचें हें कलाकेंद्र मूर्तावस्थेला आणील.

मित्र हो, आमच्या या छोट्या शहरातर्फे मी आपलें पुन्हा एकवार हार्दिक स्वागत करतो; व आपल्या प्रासादिक वाणीनें जनतेला कार्यप्रवृत्त करणारे राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज यांना या अधिवेशनाचें उद्‌घाटन करण्याची प्रार्थना करतो.

नरकेसरी प्रेस, नागपूर

विदर्भ साहित्य संमेलन

अधिवेशन अठरावें, तुमसर

(दिनांक २४ व २५ डिसेंबर १९५५)

संमेलनाध्यक्ष श्रीमान् बाबासाहेब खापर्डे यांचें भाषण

अनुक्रमणिका

स्वागताध्यक्ष, उपस्थित प्रतिनिधि आणि बन्धु-भगिनींनो—

विदर्भ साहित्य संघाचें हें १८ वें अधिवेशन या आपल्या सुंदर आणि धनकनकसंपन्न गावीं भरत आहे. आपल्या सर्वांच्या साह्याने व सदिच्छेने मागच्या निवडणुकींत यश मिळाल्यामुळे या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून मला आपली पुन्हा एकदा सेवा करण्याची संधि लाभली, हा माझ्या आयुष्यांतला फार मोठा चिरस्मरणीय सुयोग आहे. कविकुलगुरु कालिदास आणि "यं ब्रह्माणमियं देवी वाग्वश्येवानुवर्तत" असें लिहिणारा कविचूडामणि भवभूति यांच्या अमर स्मृतीने पवित्र झालेलीं स्थानें ह्या गावासमीप आहेत. कदाचित् त्यांचीं पवित्र पाउलें ह्या गावाला लागलीं असण्याचाहि संभव आहे, आणि या गावीं हें संमेलन भरावें यांत फार मोठें औचित्य आहे. येथील विदर्भ साहित्य संघाची शाखा नुकतीच स्थापन झालेली असून ह्या समारंभाचा आपण उपक्रम केला आणि संघाला उपकृत केलें याबद्दल मी आपणास हार्दिक धन्यवाद देतों. संघाच्या पुढील कार्यासंबंधाने मला कांही सूचना करावयाच्या आहेत त्या मी माझ्या शेवटच्या समारोपाच्या भाषणांत करीन.

साहित्य क्षेत्रांत आज जीं अनेक मतमतांतरें प्रचलित आहेत त्यांपैकी कांहींचा तात्त्विक दृष्ट्या उहापोह करून भावी होतकरू साहित्यिकांस कांही मदत करतां आली तर कदाचित त्यांचा मार्ग सुकर होईल असें वाटल्यावरून त्या दृष्टीने मी यत्न करणार आहे.

लेखनाची प्रभावी शक्ति

आपण जें वाङ्मय लिहितों त्याला कांहीतरी उद्देश असला पाहिजे हें उघड आहे. तो उद्देश समाजाच्या जीवनाशीं निगडित असला पाहिजे हेंहि तितकेंच उघड आहे. मग तो उद्देश कोणताहि असो. परंतु हल्ली एक मत असें प्रचलित आहे की, लघुकथा, कादंबऱ्या, कविता आणि तत्सम इतर ललित वाङ्मय या सर्वांतून प्रतिपादन केलेल्या मतांचा आणि विषयांचा समाजावर कांहीच परिणाम होत नाही. लघुकथा, कादंबरी किंवा तत्सम लेखन, त्या त्या लेखनाकरिता निश्चित झालेल्या तंत्राप्रमाणे (Technic) 'चिरेबंदी' ठीकठाक निर्दोष असलें म्हणजे त्या लेखनाची पूर्तता झाली व त्याला कलात्मक निर्दोष लेखन म्हणावें. संसारांत उत्पन्न होणाऱ्या अडचणी किंवा प्रश्न कोणीहि मनुष्य पुस्तकें वाचून सोडवीत नाही, असें या मत-प्रतिपादकांचें म्हणणें आहे. लेखनाचा समाजावर परिणाम होत नाही हें म्हणणें मुळांतच तर्क-

शुद्ध वाटत नाही व तें अनुभवाच्या विरुद्ध आहे. लेखकांच्या लेखनामुळेच इंग्लंड, फ्रान्स, रशिया, इटली, वगैरे देशांत राज्यक्रान्त्या झाल्या असा इतिहास आहे. लोकमान्यांच्या लेखनानें 'केसरी' द्वारा आपल्या हिंदुस्थानांत जागृति उत्पन्न केली, स्वातंत्र्याची लालसा लोकांत वाढविली, पूर्व वैभवाचा आणि संस्कृतीचा अभिमान उत्पन्न केला, आणि Father of unrest in India' म्हणून दिगंत कीर्ति मिळविली. श्री. अरविंदांच्या लेखणीने बंगाल जागा केला आणि मोतीलाल घोष यांनी अमृतबझार-पत्रिकेच्या द्वारें बंगालांत नवचैतन्य ओतलें. हा इतिहास आपल्या डोळ्यांपुढे अद्याप ताजा आहे. याकड ओझरता जरी दृष्टिक्षेप केला तरी साहित्याचा समाजाच्या जीवनावर परिणाम होत नाही असें म्हणणें किती निराधार आहे हें स्पष्टपणें लक्षांत येण्यासारखें आहे.

ललित वाङ्मयाच राष्ट्राच्या उन्नतींत स्थान

ललित वाङ्मयाचा समाजावर जितका परिणाम होतो तितका इतर कोणत्याहि गोष्टीचा होत नाही असें मला वाटतें; कारण ललित वाङ्मय हें भावनांशीं निगडित असतें. आपण आपल्या मनांत खोल जाऊन जर पाहिलें तर त्या ठिकाणीं, मनाच्या खोलींत, आपणांस दोनच गोष्टी सापडतील, इच्छा आणि विचार ! ही इच्छा जीवनांत वाटणारी उणीव भरून काढण्याकरितां कांही तरी अधिक संपादन करण्याकरितां उत्पन्न झालेली असते आणि ही अधिकीची वाढ सुखाच्या भावनेचें मूळ आहे. सौख्यसंपादनाचीं साधनें मिळविण्याचे मार्ग शोधणें हें विचाराचें कार्य आहे. भावना या सुखदुःखात्मक आढळून येतात. सुख मिळविणें आणि दुःख टाळणें आणि हें कसें करतां येईल याविषयींचे विचार एवढेंच खरोखरी मनुष्याच्या मनाच्या अंतर्यामांत असतें. असें सांगतात की, मूल जन्मास आल्यावरोबर आईच्या देहांतून मिळणारें पोषण बंद झाल्यामुळे त्याला जी पहिली उणीवेची म्हणजे दुःखाची भावना उत्पन्न होते त्यामुळे मूल प्रथम आयुष्याला सुरुवातच रडण्यापासून करतें. असें असल्याकारणाने उणीवेची भावना अधिकीने भरून काढणें आणि तदर्थ यत्न करणें हेंच ऐहिक जीवनांतील सर्व खटपटींचें सारसर्वस्व आहे. परंतु भावना आणि विचार हे अलग अलग कप्प्यांत, एकमेकांपासून सर्वथैव विलग असे नाहीत. भावनेंत अत्यल्पांशाने विचार असतोच, आणि कोणत्याहि विचारांत थोडीबहुत भावना असतेच. कारण हे दोन्हीहि एकाच मनाचे समकालीन व्यापार आहेत. पण त्यांतल्या त्यांत अधिक महत्त्वाचा व्यापार कोणता, ह्याचा विचार केल्यास असें आढळून येईल की, भावना ही विचारापेक्षा अधिक महत्त्वाची आणि मोलाची आहे. प्रथम भावना होते व मग विचार येतो. 'श्रद्धामयोयम् पुरुषः' अशी आपल्यांत म्हणहि आहे. 'योयत् श्रद्धः स एव सः' हेंहि आपणांस रोज अनुभवास येतेंच. श्रीसंत तुकाराम महाराज म्हणतात, 'ज्याचें घडे जया ध्यान ।

तेंचि होई त्याचें मन'; व अशासारखीं वचनें आपणांस अनेक सापडतील. ह्या सर्वांचा संकलित अर्थ खरोखरी असा आहे की, मनुष्य हा भावनामय आहे, किंबहुना या भावनामयत्वांतच त्याचें मनुष्यपण आहे; तें मनुष्यपण त्याच्या विचारांत नाही. कोणीहि मनुष्य चांगला आहे किंवा वाईट आहे हें जेव्हा आपण ठरवितों, तेव्हा तें आपण त्याच्या भावनांवरून ठरवितों, त्याच्या विचारांवरून ठरवीत नाही. निर्बुद्ध मनुष्य जर सद्भावनांनी प्रेरित असेल, त्याचें मन शुद्ध असेल, तो इमानी असेल, विश्वासू असल आणि इंद्रिय-संयमी असेल, परदुःखाविषयीं कनवाळू असेल आणि 'स्वसुखनिरभिलाष' असेल, तर त्याला आपण चांगला मनुष्य म्हणतों, 'सज्जन' म्हणतों. परंतु मनुष्य कितीहि बुद्धिमान असला, तरल कल्पनांचा असला आणि हे गुण जर त्याच्याजवळ नसतील, तर आपण त्याला वाईट, दुर्गुणी असें म्हणतों. मनुष्याची परीक्षा, त्याच्या चांगलेंवाईटपणाची कसोटी ही त्याच्या भावनांत आहे, बुद्धींत नाही. योगबलाने मनुष्य जेव्हा परमतत्त्वांत लीन होतो तेव्हा तो भावनांनी लीन होतो, विचारांनी नाही. भावनेंत अद्वैतप्रतिपत्ति शक्य आहे; किंबहुना ती भावनेंतच शक्य आहे, विचारांत नाही. कारण विचार हा 'युष्मद् अस्मत् प्रत्ययगोचर' द्वैतांत आहे, व विषय व विषयी हे उभयतां त्याचे जनकजननी आहेत. द्वैतप्रतिपत्तीवाचून विचाराला वाव नाही. मनुष्याचें सर्वस्व भावनेंत साठविलेलें असल्यामुळे आणि मनुष्याची उत्क्रांति त्याच्या भावनांवर अवलंबून असल्यामुळे, भावनांवर परिणाम करणारे, भावनांशीं खेळणारें, भावना उद्दीपित करणारें, जें ललित वाङ्मय तें खरोखरीं मूल्यमापनाच्या दृष्टीने तत्त्वज्ञानापेक्षाहि श्रेष्ठ दर्जाचें ठरतें. तत्त्वज्ञान हें तर्ककर्कश विचारांवर आधारलेलें असतें. आणि मनुष्याच्या मनाच्या तर्क करण्याच्या सीमा कांही ठरलेल्या आहेत, तिथपर्यंतच तर्क जाऊं शकतो; पलीकडे नाही. तर्काने व विचाराने विश्वांतील गूढ साकल्याने उपलब्ध होऊं शकेल असें संभवत नाही. बर्गसाँ नांवाचा फ्रेंच फिलॉसाफर परवापरवा होऊन गेला. त्याने 'Creative Evolution' या नांवाचें विचारप्रवर्तक सुंदर पुस्तक लिहिलें आहे. त्यांत त्याने असें प्रतिपादन केलें आहे की, आपल्याला विश्वांतलें सर्व गूढ समजूं शकतें, असा जो बुद्धीचा दावा आहे तो खोटा असून तिचा तो व्यर्थ अभिनिवेश आहे. आणि सत्य जर समजून घ्यायचें असेल तर तें स्फूर्तीने (Intuition ने) विचाराच्या माध्यमावाचून समजून घेतलें पाहिजे. त्याच्या मतें, बुद्धि, तर्क हा पूर्णतया सत्य आकलन करण्याच्या मार्गांत अडथळा आहे. "योगश्चित्तवृत्तिनिरोधः" असें जे महर्षि पतंजलीने म्हटलें आहे, त्या वाक्यांत तरी चित्तवृत्ति ह्या शब्दाचा अर्थ खरोखरी विचार असाच आहे. ह्या विचारांचा विरोध केल्यावाचून योग साधत नाही म्हणजे योगास सत्ययुक्त होतां येत नाही. कविकुलगुरु कालिदासाने सत्यनिर्णयाची कसोटी "संदेहपदेषु वस्तुषु सतां अंतःकरणप्रवृत्तयः प्रमाणं" असेंच म्हटलें आहे. आणि यापैकी "सतां" हें पद अत्यंत महत्त्वाचें आहे. शुद्ध मनाच्या प्रवृत्तीलाच, म्हणजे शुद्ध मनाच्या भावनेला सत्य समजूं शकतें. मी ह्या मुद्याचें थोडें विस्तृत

अनुक्रमणिका

विवेचन केलें, याचें कारण असें की मला आपणांस असें सांगावयाचें आहे की, मनुष्यत्व हें भावनांत असून त्या भावनांचें शुद्धत्व त्याच्या उत्क्रमणाचें गमक आहे. या भावनांशीं संबंध ठेवणारें ललित वाङ्मय हें व्यक्तीच्या, समाजाच्या किंवा राष्ट्राच्या उन्नतीचें सारसर्वस्व असतें. आणि सत्पथावर चालणें असल्यास ह्या भावना शुद्ध करणें, व्यक्तीच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या भावना उन्नत करणें हाच खरा उत्क्रांतीचा मार्ग आहे. ज्या वाङ्मयामुळे भावनांना हीनत्व येत असेल, जें वाङ्मय मनुष्याच्या दुर्वासनांना उत्तेजन देत असेल, जें वाङ्मय हीन भावना प्रकट करीत असेल तें वाङ्मय व्यक्तीच्या, समाजाच्या किंवा राष्ट्राच्या हिताचें नाही. कदाचित् अशा वाङ्मयापासून द्रव्यलाभ होत असेल; परंतु द्रव्यलाभ हा वाङ्मयाचा हेतु नाही.

ललित वाङ्मय लेखकांची जबाबदारी

ज्याच्या बुद्धीस जेवढें पटेल तेंच सत्य आहे असें मानून, त्यावर विसंबून त्याने वागावें व लिहावें, असें प्रतिपादन करण्यांत येतें. मला हें अर्धसत्य वाटतें, आणि यांत जो धोका आहे त्याकडे लक्ष न दिल्यास अहित होण्याचा संभव आहे.

मनुष्याच्या चेहेऱ्याचें एकप्रकारचें स्वरूप ठरलेलें आहे. तथापि प्रत्येकाच्या चेहेऱ्यांत त्याच्या चेहेऱ्याच्या ठेवणींतील अवयवांचें प्रमाण इतरांकडून भिन्न असल्यामुळे प्रत्येकाचा चेहरा दुसऱ्याच्या चेहऱ्याहून भिन्न असतो आणि म्हणूनच एकमेकांची एकमेकांस ओळख पटते. तसें नसतें आणि सगळे चेहेरे अगदी सारखेच असते तर जगांत विचित्र घोटाळे झाले असते. आणि या घोटाळ्यांचें व्हानसें दिग्दर्शन कॉमेडी ऑफ एरर्स ह्या नाटकांत आहे. कांही वर्षांपूर्वी मुंबईस भूलभुलैया या नांवाचें नाटक करून दाखवीत असत. तेंहि चेहेऱ्यांच्या सारखेपणामुळे झालेल्या घोटाळ्यावर आधारलेलें होतें. पण चेहेऱ्याच्या साम्यतेच्या ह्या गोष्टी काल्पनिक असून, व्यवहारांत असलाच तर त्याला अत्यंत अल्प आधार आहे आणि तो अपवादात्मक समजला पाहिजे.

जसें चेहऱ्याचें, तसेंच मनुष्याच्या मनाचेंहि आहे. मनुष्याचें मन म्हणून कांही विशिष्ट गोष्ट सर्वसाधारण असली तरी प्रत्येकाच्या मनांतील घटकांचें प्रमाण निरनिराळें आहे; आणि म्हणूनच प्रत्येकाचें मन दुसऱ्याच्या मनापेक्षा निराळें आहे. या मनाच्या वैचित्र्यावर आणि निराळेपणावर मानवी मनाच्या विचारांचें आणि भावनांचें नानात्व अवलंबून आहे. म्हणून दोन मनांचें सर्वथैव साम्य आणि त्यांच्या विचारधारा कधीहि सर्वथैव सदृश असत नाहीत. असें असल्यामुळे प्रत्येकाने त्याला स्वतःला वाटत असलेल्या सत्यानुरूप वागावें व लिहावें, हें जरी कांही विशिष्ट सीमेपर्यंत खरें असलें तरी आपल्याहून भिन्न असलेल्या मनाचे विचार

अनुक्रमणिका

अधिक सुसंगत, वास्तववादी, सत्य, पवित्र, उन्नत आणि उत्क्रान्तिकारक असणें शक्य आहे हें विसरतां कामा नये. ह्या गोष्टीचा विसर पडल्यास अहंता बळावते आणि दुराग्रह वाढतो, असहिष्णुता उत्पन्न होते आणि कलहाला वाव मिळतो. म्हणून ललित वाङ्मय उत्पन्न करीत असतांना आणि स्वतःचें प्रतिबिंब त्या वाङ्मयांत ओतीत असतांना आपलें कुठेतरी चुकलें असण्याचा संभव आहे, ही शक्यता विसरून चालणार नाही. पण हेंच नेमकें उपेक्षिलें जातें, असा व्यवहाराचा अनुभव आहे.

ललित वाङ्मय निर्माण करणारांची वरील कारणास्तव अत्यंत सहिष्णु आणि विशाल अशी दृष्टि असली पाहिजे. इतकी विशाल की तींत सर्व विश्व मावलें पाहिजे. कारण आपल्या लेखनाचा व त्यांत प्रकट केलेल्या भावनांचा दुसऱ्या मनाशीं प्रत्यक्ष संबंध येणार आहे आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी लेखकावर आहे, हें जितकें सतत लक्षांत राहील तितकें अधिक श्रेयस्कर आहे.

आधुनिक शास्त्रज्ञांची विश्वाकडे पाहण्याची भूमिका

हल्लीच्या उत्पन्न होत असलेल्या वाङ्मयासंबंधीं व वाङ्मयाच्या निर्मात्यांसंबंधीं विचार करतां असें दिसतें की हल्ली विश्वाकडे पाहण्याची अर्वाचीन शास्त्रज्ञांची जी दृष्टि बदलत आहे तिच्याकडे आपल्या लेखकांचें जावें तितकें लक्ष गेलेलें नाही. ह्याला अपवाद नाही असें नाही. परंतु सर्वसाधारणतः हें विधान मला समर्थनीय वाटतें. पाश्चात्य भौतिक शास्त्रज्ञांची (म्हणजे Scientistsची) विश्वाकडे पाहण्याची आता जुनी दृष्टि कायम नाही. आणि भौतिक शास्त्रज्ञ तत्त्वज्ञांची भाषा बोलूं लागले आहेत. बाहेरच्या विश्वाचें यत्नतः परिशीलन केल्यानंतर कित्येक ख्यातनाम भौतिक शास्त्रज्ञांचें असें निश्चित व निर्णीत मत आहे की आता मनुष्याला स्वतःचें मन समजल्याखेरीज व विश्व समजून घेण्याच्या स्वतःच्या मनाच्या शक्तींचें प्रमाण, परिमाण व सीमा मनुष्याने जोखून पाहून ठरविल्याखेरीज विश्वांत प्रतीत होणाऱ्या गोष्टींचें मूल्यमापन मनुष्याला यथार्थतेने करतां येणार नाही. त्यापैकी जीन्स आणि एडिंग्टन् हे दोन प्रमुख आहेत. एडिंग्टनने एका ठिकाणीं लिहिलेल्या मजकुराचा गोषवारा येणेप्रमाणे आहे. त्याच्या वाक्यांचें हें भाषांतर नव्हे. तो असें म्हणतो की, " ह्या अनंताच्या समुद्राच्या वाळवंटावर उमटलेलीं कांही विचित्र पाउलें मला दिसलीं तीं कुणाचीं असतील याविषयी फार विचार करून अगाध कल्पना बांधल्या. शेवटीं त्या पावलांच्या आकारावरून ज्या प्राण्याचीं तीं असतील त्या प्राण्याची मी मूर्ति घडविली आणि बघतों तों ती मूर्ति–माझीच. " भौतिक शास्त्रज्ञाला आत्मनिष्ठ तत्त्वज्ञान (Subjective Philosophy) अधिक सुंदर व काव्यमय

शब्दांनी सांगणें शक्य नाही. जसें हें भौतिक शास्त्रज्ञाचें तसेंच मानसिक शास्त्रज्ञांचेंहि आहे. मनुष्याच्या मनाकडे पाहण्याची दृष्टि प्रत्यहीं बदलत आहे. आणि मनाचें विश्लेषण रोज नवीन पद्धतीने व दृष्टीने होत आहे. आणि हें मानसविश्लेषण अगदी प्रथमावस्थेंत आहे, व त्याची प्रगति होत आहे, हें लक्षांत बाळगूनच त्या विश्लेषणावर आधारलेल्या ललित वाङ्मयाची रचना झाली पाहिजे. यूंग हा फ्रॉईडचा शिष्य खरा, परंतु फ्रॉईडहून त्याचीं मतें मनोविश्लेषणाच्या क्षेत्रामधे इतकीं भिन्न आहेत की, फ्रॉईडच्या मतांपासून त्याने आपली स्फूर्ति घेतली असेल हें प्रथमदर्शनीं अश्रद्धेय वाटतें. ह्या मनोविश्लेषणाच्या बाबतींत मला एवढेंच सुचवावयाचें आहे की, ह्या शास्त्रांत जणूं काय अंतिम सिद्धान्त ठरले आहेत असें मानून जें लिखाण लिहिलें जातें, तें चिरस्थायी तर होणें शक्य नाहीच, पण समाजास हितकारी वळण लावील की नाही ह्याहि बद्दल शंका बाळगण्यास पुष्कळ जागा आहे.

ललित वाङ्मय निर्मीत असतां लेखक कोणत्या भूमिकेवरून आपल्या विषयाचें प्रतिपादन करीत आहे हें त्याने स्वमुखाने बोलून दाखविणें आजच्या परिस्थितींत इष्टच नव्हे तर आवश्यक आहे. बर्नार्ड शॉ, आपल्या लेखनाला विस्तृत प्रस्तावना जोडून ज्याप्रमाणे आपली भूमिका स्पष्ट करीत असत, त्याप्रमाणे आजच्याहि वाङ्मयनिर्मात्यांनी वाचकांस आपली भूमिका स्पष्ट करून सांगणें फार जरूरीचें झालें आहे. असें झालें असतां वाचकाची दिशाभूल होणार नाही. टीकाकारासहि टीका करणें सोपें होईल. लेखक हा पुस्तकांच्या नांवाने ओळखला न जातां विशिष्ट विचारप्रणालीच्या नांवाने ओळखला जावा, म्हणजे त्या मतांहून भिन्न मत असलेल्या लोकांना त्या लेखकाच्या पुस्तकांविषयी ग्राह्याग्राह्यता ठरवितां येईल. हल्लीं तसें होतांना दिसत नाही. त्यामुळे बहुतेक सर्व टीकात्मक लिखाण व्यक्तिनिष्ठ असलेलें दिसतें. त्याऐवजीं तें तत्त्वनिष्ठ व्हावें, एवढेंच माझें म्हणणें आहे.

यापुढे जो काळ येणार आहे त्याकडे दृष्टि देतां तत्त्वनिष्ठात्मक वाङ्मय व टीका निर्माण होणें हेंच जनहिताचें ठरणार आहे.

राष्ट्राचें भवितव्य ललित वाङ्मयावरच

कृपा करून आपण आपल्या भोंवताली आज निर्माण होत असलेली परिस्थिति लक्षांत घ्या. देशांत कामकरी, श्रमजीवी वर्ग झपाट्याने वर येत आहे. या वर्गाला साक्षर करण्याचा प्रांतिक आणि केंद्रीय सरकारचा झटून सारखा यत्न सुरू असून त्याकडे पैशाचा उदार ओघ वाहात आहे. त्याचबरोबर यांत्रिक युगांत विजेच्या वेगाने प्रगति होत आहे. ह्या प्रगतीमुळे थोड्याच वर्षांपूर्वी जें काम करायला शंभर माणसें लागत होतीं तें काम आता तितक्याच वेळांत

चार दोन माणसें करूं शकतात. एवढेंच नव्हे तर आजपावेतों जीं कामें केवळ मनुष्यच करूं शकेल असें मानलें जात होतें, तीं कामेंहि आता यंत्र करूं लागलें आहे. उदाहरणार्थ, दुकानांत विक्रीचीं कामें यंत्रें करतात. रेल्वेवर तिकीटविक्रीचें काम यंत्र करूं लागलें आहे. अनेक आकडयांच्या बेरीज वजाबाक्या यंत्रें करतात, आणि अकरा अकरा आकडयांचे गुणाकारहि यंत्र एका सेकंदाच्या दशांश कालांत करूं शकतें. मनुष्याकडून करविलीं जाणारीं कामें यापुढे पुष्कळशीं यंत्रें करतील हें उघड आहे. ह्याप्रमाणे यंत्रांच्या कारवाईमुळे रिकामीं झालेलीं माणसें श्रमजीवी असल्याकारणाने त्यांच्या पोटापाण्याची सोय पाहाणें हा एक फार मोठा प्रश्न आहेच, पण त्याचबरोबर सुधारलेल्या यंत्रांमुळे पदार्थनिर्मितीची वाढ अत्यंत जलद व सुकर होऊन मागणीपेक्षा पुरवठा जास्त होऊं नये म्हणून यंत्र चालवण्याचे तासहि कमी होतील. अधिक मजुरी आणि कमी तास काम ही हल्लीच्या श्रमजीवी वर्गाची मागणी सतत चालूच आहे. हें स्वप्न साकार होण्यास फारसा कालावधि लागेल असें वाटत नाही. यंत्राने केलेलें प्रचंड उत्पादन, श्रमाचे कमी तास आणि वेतनाची वाढ, ह्या गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे साक्षर झालेल्या श्रमजीवी वर्गाला खर्चाला हातीं पैसा आणि रिकामा पुष्कळ वेळ ज्या काळीं मिळेल असा काळ दूर नाही. ह्या उरलेल्या वेळीं हा श्रमजीवी वर्ग साक्षर झाल्यानंतर जें वाङ्मय वाचील त्या वाङ्मयामुळेच पुढे राष्ट्राच्या उन्नतीचा अगर अवनतीचा पाया रचला जाणार आहे. तरी माझी विनंती आहे की, विश्वरचनेसंबंधींच्या भौतिक शास्त्राच्या कल्पना, मनोविश्लेषणाचे अधुरे निर्णय, आगामी कालांतील जनतेची ज्ञानलालसा आणि जनतेला ही लालसा पूर्ण करण्यास मिळणारा वेळ व वाव ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊनच ललित वाङ्मयनिर्मात्यांनी लेखन करावें. कोणत्याहि इतर व्यवसायापेक्षा ललित वाङ्मयनिर्मात्यांची जबाबदारी समाजकल्याणाच्या, राष्ट्रकल्याणाच्या व जगत्कल्याणाच्या दृष्टीने फार मोठी आहे. आणि हें उत्तरदायित्व कसें तरी वाङ्मय, कशा तरी पद्धतीने, कुणातरी करिता निर्माण करून पार पडणार नाही. सत्याला स्मरून एका विशिष्ट तत्त्वाला अनुसरून, आत्मोन्नतीकडे लक्ष ठेऊन, स्वमताविषयीं दुरभिनिवेश न बाळगतां समाजांत विशिष्ट विचारांचा व भावनांचा प्रसार करण्याकरिता, विशिष्ट हेतूनेच वाङ्मय लिहिलें गेलें पाहिजे. तें लिहीत असतांना लेखकाला पूर्ण स्वतंत्रता मिळाली पाहिजे व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या बऱ्यावाईट परिणामाचें पुण्य-पाप पत्करण्यास वाङ्मयनिर्मात्यांनी सिद्ध असलें पाहिजे. मी ललित वाङ्मयावर विशेष भर देऊन बोलतों, कारण हें वाङ्मय मनुष्याच्या अंतःकरणांत वावरणाऱ्या आकांक्षांशीं व भावनांशीं, आणि म्हणून मनुष्यत्वाशीं प्रत्यक्ष निगडित आहे, व त्याचा जीवनावर अत्यंत मोठा प्रभाव पडतो. राष्ट्राचें पुष्कळसें भवितव्य या वाङ्मयावर अवलंबून आहे.

अनुक्रमणिका

भारताची सांस्कृतिक संपदा दर्शविणारें वाङ्मय निर्माण व्हावें

आपल्या भारतांत उत्पन्न होणारें वाङ्मय भारताच्या संस्कृतीला धरून भारताची पूर्वपरंपरा पुढे चालविणारें असलें पाहिजे. त्यावाचून आमचें जगतांत वैशिष्टय उरणार नाही. जें इतरांजवळ नाही व आमच्याजवळच आहे असें कांही जगास आम्हाला सांगावयाचें आहे, असें आज सर्वत्र बोललें जातें. तें जगविण्याचा आपले लेखक कांही यत्न करीत आहेत काय? याचा विचार झाला पाहिजे.

भविष्य काळांत भारतीयांची अमर संस्कृति सजीव राखणें व पुढे वाढीस लावणें साहित्यिकांच्या स्वाधीन आहे. इजिप्त, खाल्डिया, बॅबिलोन, ग्रीस, रोम येथील व इतर संस्कृति जशा कालवश झाल्या, तशी भारतीय वैदिक संस्कृति नामशेष न होतां हा कालपावेतों जीव धरून राहिली, याचें कारण त्या संस्कृतींत इतरांपेक्षा कांही अधिक वैशिष्टय आहे, हें उघड आहे. तें वैशिष्टय ओळखून साहित्यिकांनी तें जिवंत ठेविलें पाहिजे व वाढविलें पाहिजे; तरच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें चीज झालें असें होईल.

माझ्या मतें हं वैशिष्टय म्हणजे भारताची सात्म्यानें, एकत्वानें, स्वेतरांशीं समरस होऊन विनाकलह जगण्याची कला हें होय. आम्ही भारतीय पौर्वात्य सहानुभूतीनें सर्वांशीं सात्म्य ओळखून व अनुभवून आत्म्याच्या विभुत्वावर, अमरत्वावर व उत्क्रांतीच्या अनंतत्वावर भरवसा ठेऊन जगणारे असल्यामुळे, आपच्या स्वभावांत म्हणजे आत्मभावांत कलहाचें बीज नाही. आम्ही सर्व निसर्गाशीं आपलें सख्याचें नातें ओळखतों. आमचें मनुष्याशीं तर राहोच, पण पशुपक्षांशीं व वृक्षपाषाणांशींहि सहजीवनाचें व प्रेमाचें नातें आम्ही ओळखतों व तदनुरूप आम्ही वागत आलों आहोंत. सहजच व अर्थात्‌च याचे पडसाद आमच्या वाङ्मयांत उमटले आहेत आणि ते चौकसपणें पाहणारास स्पष्ट दिसतात.

थोर अलौकिक पुरुषाचा जन्म झाला म्हणजे आपला रक्षक, सखा जन्मास आला म्हणून सर्व चराचराला व भूतमात्रांना आनंद होतो व क्षयकर्ता, आसुरी संपत्तीचा धनी जन्मास आला म्हणजे हा क्षोभकर्ता जन्मास आल्याबद्दल विश्वांत औदासिन्य पसरतें व विपरीत घटना घडून दुश्चिन्हें होतात अशी आपल्या वाङ्मयांत वर्णनें आहेत. दुर्योधनाच्या जन्मकाळीं गाढव ओरडलें व इतर दुःश्चिन्हें झालीं असें भारतांत वर्णन आहे. उलट सूर्यवंशोद्भव रघुराजाच्या जन्मकाळीं,

> " दिशः प्रसेदुर्मरुतो ववुः सुखाः प्रदक्षिणार्चिर्हविरग्निराददे ।
> बभूव सर्वं शुभशंसि तत्क्षणं भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम् ॥ "

असें कवि कुलगुरु कालिदासानें वर्णन केलें आहे. तसेंच श्रीरामचंद्राच्या जन्मकालीं

> " निर्दोषमभवत्सर्वमाविष्कृतगुणं जगत् ।
> अन्वगादिव हि स्वर्गो गां गतं पुरुषोत्तमम् ॥ "

अनुक्रमणिका

असें वर्णन आहे. शकुन्तांनी म्हणजे पक्ष्यांनी शैशवकालीं पोसली म्हणून त्या मुलीचें नांव शकुन्तला पडलें, ती तपोवनांत वाढली आणि आश्रमांत कष्टाने तिने पाणी घालून वाढविलेले वृक्ष आणि नीवारादि धान्यावर वाढविलेले मृग तिचे आप्तबंधु झाले व ती सासरीं गेली तेव्हा आश्रमवृक्षांनी तिला वस्त्रें व भूषणें दिलीं व हरणांनी लडिवाळपणें निरोप दिला, असें कालिदासाने शाकुंतल नाटकांत वर्णन केलें आहे. निसर्गाशीं कलह न करतां सात्म्याने जगण्याचें व तन्मय जीवन घालविण्याचें हें स्पष्ट व उत्तम उदाहरण आहे. आम्ही वसंतांत फुलांचें स्वागत करतों, उन्हाळ्यांत उघडयावर आनंदाने झोपतों, पावसाळ्याच्या प्रथम मेघाचें कालिदासाच्या यक्षाप्रमाणे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों व "आई रे सावनकी बदरिया" असें उल्हासाने गातों. शीतकालास दीपोत्सवापासून प्रारंभ करतों आणि शक्त्यनुसार आनंद लुटतों. असें सात्म्याचें जीवन आम्ही जगतों. ही आमची परंपरागत संपदा आहे.

मनुष्यजीवनाचा निसर्गाशीं घनिष्ठ संबंध

कोणी म्हणेल कालिदासाने केलेलीं व भारतांतील वर्णनें केवळ कविकल्पना आहेत, पण आमचे तत्त्वज्ञ व अनुभवी योगी सांगतात, शिकवतात त्याप्रमाणे जर विश्व विश्वंभराच्या नियतीस अनुसरून चालत असेल आणि भौतिक शास्त्रांतील जगप्रसिद्ध संशोधक आइन्स्टाईनहि म्हणतो त्याप्रमाणे हें विश्व एकसूत्रबद्ध असेल तर निसर्गाच्या एका देशांत घडणाऱ्या घटनेचा विश्वांतील अखिल चराचरावर परिणाम घडत असल्यास त्यांत तर्कप्रतिकूल अथवा अश्रद्धेय असें कांहीच नाही. आपल्या शरिराला किंचित् कोठे इजा अथवा सुखस्पर्श झाला असतां तो जसा सर्व शरीरभर जाणवतो, तसेंच हें फार मोठ्या प्रमाणावर आहे. तथापि हीं वर्णनें केवळ कविकल्पना आहेत असें जरी घटकाभर मानलें तरी अशा कल्पना कवीला सुचाव्यात व त्याने निर्भयपणे त्या आपल्या ओजस्वी वाणीने सांगाव्यात, यांतहि फार मोठें वैशिष्टय आहे व यालाहि फार खोल अर्थ आहे. निसर्गाशीं सात्म्य ओळखणारा कवीच असें लिहूं शकेल व लिहील. ह्या अथवा तत्सदृश कल्पना आपल्याला भारताबाहेरच्या वाङ्मयांत कोठे आढळल्या काय ? ग्रीकांच्या वाङ्मयांत क्वचित् दुश्चिन्हांच्या कलहजीवी कल्पना आढळतातः पण त्या देवतांचा कोप झाल्याचीं चिन्हें आहेत. मानव आणि निसर्ग ह्यांच्यामधील सात्म्याच्या व सहानुभूतीच्या कल्पना ग्रीक वाङ्मयांत आढळत नाहीत. कँट्सारखे बुद्धिजीवी, तर्ककर्कश ह्या कल्पनांना Dreams of the Visionaries म्हणतात. पण त्यांनाहि निसर्गाचा एकसूत्रीपणा मान्यच आहे. आणि केवळ तर्काधिष्ठित बैठकीवरून मानवी मनाला समाधान लाभत नाही म्हणून कँट-सारख्या बुद्धिनिष्ठ तत्त्ववेत्यालाहि नीतिकल्पनांचे व सौंदर्यभावनांचे (Aesthetic) विश्लेषण करणें अपरिहार्य झालें. भौतिक विज्ञानाला तर विश्वाच्या एकसूत्रीपणावर निश्चल विश्वास

ठेवल्यावाचून पुढे पाऊलच टाकतां येत नाही अशी अवस्था आहे. "Ideas and Opinions" ह्या आपल्या पुस्तकांत अल्बर्ट आइन्स्टाइननीं भौतिक सायन्स संबंधी म्हटलें आहे की, "It is in this striving after the rational unification of the manifold that it (Science) encounters its greatest succsses" आणि G. R. Groves म्हणतात........."...Every theory is an attempt at unifying diverse phenomenon, and no scientist could work without a belief in a unitary orderliness in nature." विश्व हें एकात्म असल्यामुळे विश्वाच्या एका देशांत घडणाऱ्या घटनांचा विश्वांत इतरत्र सगळीकडे परिणाम होतो, ही केवळ कविकल्पना नसून अबाधित सत्य आहे; आणि सृष्टींतला ललामभूत, विचारशील व विकारशील जो प्राणी–मनुष्य-त्याच्या विचारांचा, आचारांचा व वर्तनाचा निसर्गावर दूरगामी परिणाम होतो असें म्हणणारे, केवळ कल्पनेच्या भराऱ्या मारतात असें म्हणण्याचें कारण नाही. ऋषिकुमार जेव्हा शकुंतलेला घेऊन दुष्यंताच्या दरबारीं गेले तेव्हा, हे कां आले असतील ह्याचा तर्क करतांना दुष्यंताच्या मनांत अशी शंका येऊन गेली की, कदाचित् माझ्या दुराचरणामुळे तपोवनांतील वेलींना फुलें येण्याचें थांबलें असेल, म्हणून हे माझ्याकडे तक्रार करायला तर आले नसतील ना? "अहोस्वित्प्रसवो ममापचरितैर्विष्टम्भितो विरुधाम्", दुष्यंताच्या ह्या प्रश्नांतच निसर्गाशीं मनुष्य-जीवनाचे घनिष्ठ संबंध असल्याची स्पष्ट कबुली आहे. माझ्या सांगण्याचा इत्यर्थ असा आहे की, निसर्ग हा एकसूत्रबद्ध, एकजीव व संपूर्णतया एकच असल्यामुळे त्या निसर्गाचा एक घटक, जो मनुष्य, त्याच्या विचारांचा, आचारांचा, वागणुकीचा सबंध निसर्गावर परिणाम होतो; हें मुळांतच आम्ही पौर्वात्य ओळखीत असल्यामुळे आम्ही निसर्गाशीं सहानुभूतीने, प्रेमाने व एकजीव होऊन राहतों व वागतों. मी याला सात्म्याचें जीवन म्हणतों. या जीवनांत कलहाला स्थान नाही. कलह कधी घडतच नाही असें माझें म्हणणें नाही, परंतु तो जीवनांत आपाततः अन्य कारणामुळे, अनुषंगाने येतो व केवळ मनुष्याच्या अपूर्णतेचा द्योतक आहे. त्याला जीवनांत स्थान असलें तरी तो आमचा आदर्श नाही, तो आमचा विहित मार्ग नाही, म्हणून आमच्या वाङ्मयांत कलहाला स्थान नाही. आमच्या पूर्व कवींनी "ट्रॅजेडी"—दुःखांतिका लिहिली नाही किंवा खलपुरुषहि उत्पन्न केला नाही. ही ट्रॅजेडी अथवा हा खलपुरुष आमच्या संस्कृतींत जन्मास आले नाहीत. ते आगांतुक पाहुणे आहेत. आणि जागतिक काळाच्या ओघामुळें आमच्या ओसरीवर ह्यांना थोडी जागा देणें अपरिहार्य असेल तर तें निरुपाय म्हणून आहे व हे पाहुणे आहेत हें लक्षांत ठेऊनच आम्हास वागलें पाहिजे. त्यांना देवघरापर्यंत प्रवेश देतां कामा नये.

आम्ही आमच्या लेकरांना देखील या सात्म्याचीच घुटि देतो, कलहाची देत नाही. आई लेकरांना गोष्ट सांगते —"काऊ ये, चिऊ ये, दाणा खा, पाणी पी, भुर्रकन उडून जा." या

गोष्टींत आमची संस्कृति आहे. आमच्या साम्योपजीवी जीवनाचे पडसाद आहेत. निसर्गाचें निर्व्याज प्रेम आहे. आईचें अंतःकरण आहे, आणि मुलाला आजन्म पुरेल इतकी भरगच्च शिकवणूक आहे. हे काऊ चिऊ तुझे भाऊ आहेत; यांचें पोषण-रक्षण तुझें कर्तव्य आहे. हें करीत असतांना त्यांच्यावर बंधन घालूं नकोस, प्रत्युपकाराची अपेक्षा करूं नकोस; त्यांना आपल्या परी सुखाने, स्वेच्छेने जगूं दे, भुर्रकन् उडून जाऊं दे; अशी ही शिकवणूक आहे. कदाचित् इतर संस्कृतीच्या कलहोपजीवी लोकांनी म्हटलें असतें, " दाणा खा, पाणी पी, पुष्ट हो, मग मी तुला चिरून खाईन. "

पाश्चात्यांच्या मतें जीवन म्हणजे कलह

निसर्गाशीं सतत कलह करून विषम परिस्थितींत जे जगतात, त्यांच्या धर्मांत, समाजांत, राष्ट्रजीवनांत, तत्त्वज्ञानांत आणि वाङ्मयांत कलहाला प्राधान्य दिलें जातें. ते स्पर्धेने (Competetion) जगतात. व त्यांचें जीवनसूत्र Struggle for Existance आणि Survival of the fittest असें आहे. त्यांच्या डोळ्यांपुढे जीवनांतले क्लेशच प्राधान्याने असतात. साम्याने जगणारे सहकार्याने (Co-operation) जगतात व त्यांचें जीवनसूत्र Protection of the weakest निर्बलाचें रक्षण असें आहे. एकत्र कुटुंब पद्धति हें सहकारी जीवनाचें व अशक्तांच्या रक्षणाचें प्रत्यक्ष प्रतीक आहे.

कलहोपजीवी संस्कृतींत ट्रॅजेडी व संघर्षाची कला उत्पन्न होते. संघर्षावाचून कला नाही, संघर्षावाचून जीवन नाही, किंबहुना जीवन म्हणजेच कलह अशी त्यांची धारणा आहे. आमची नाही. परंतु ह्या कलहोपजीवी संस्कृतीच्या संपर्कामुळे आणि स्वतःच्या संस्कृतितत्त्वाच्या अनभ्यासामुळे आमच्या पढितांत हल्ली या कलहकलेचें स्तोम माजलें आहे असें दिसतें.

जिकडे तिकडे कलहकलेचा बोलबाला

कलहांत कला नाहीअसें माझें म्हणणें नाही. जगांत कलह व दुःख आहे हें कोणास सिद्ध करीत बसण्याची गरज नाही. सूर्यप्रकाशाइतकी ही गोष्ट उघड आहे. " प्रतिकूलतया वेदनीयम् दुःखम् । " अशी आमची दुःखाची व्याख्याच आहे. आणि कोणासहि दुःख नको असल्याकारणाने सुखाच्या क्षणापेक्षा दुःखाचे क्षण मनुष्याच्या मनाला अधिक जाणवतात, अधिक बोचतात. जणूं काय ते जीवाला घासून जातात आणि वेदना उत्पन्न करतात. त्यामुळे त्या वेदनांना सहज फुटलेली बोलक्या मनाची वाचा जे उद्‌गार काढते, ती कलहकला बनते. परंतु ही कलहकला साम्याच्या कलेपेक्षा फार कमी दर्जाची आहे व तींत मन रमूं देणें हितावह नाही. आज जिकडे पाहावें तिकडे या कलेचा बोलबाला दिसतो. भावगीतें, विरहाचीं आणि हताश जीवांचीं. नाटकांमधून ज्यांत रड असेल ते प्रवेश हिरिरीने केले जातात. कादंबऱ्यांतून कामवासना,

अनुक्रमणिका

त्यापायीं असूया, कलह, त्यापायीं मारामाऱ्या, खून आणि त्यापासून उत्पन्न होणारा आयुष्यांतला उद्वेग हेंच दाखविण्याचा यत्न फार. रेडिओवरून बहुधा अशी एक गोष्ट ऐकूं येत नाही, बहुधा अशी एक श्रुतिका नाही की जिच्यामधे कलह, संघर्ष आणि एका ना दुसऱ्या निमित्ताने रडारड नाही. दबक्या आवाजांत धापा व उसासे टाकत शब्दांवर आघात देऊन रडण्याचा एक अभिनव प्रकार निघाला आहे. हें सर्व थांबावें अशी माझी सूचना आहे. आयुष्यांत दुःख आहे ही गोष्ट जरी खरी असली तरी त्याचाच अविष्कार करीत बसणें हा दुःखपरिहाराचा मार्ग नव्हे, किंवा त्यांत आमच्या संस्कृतीचें प्रतिबिंबहि नाही. राजवाड्याच्या कोपऱ्यांत कोठे तरी केर असतो आणि घाणहि साठविलली असतेच. म्हणून त्या घाणीचें वर्णन म्हणजे जसें राजवाड्याचें वर्णन नव्हे, त्याप्रमाणेच मनुष्याच्या परमेश्वराने दिलेल्या ह्या पवित्र जीवनांत दुःखहि आहे, म्हणून त्याचेंच गाणें गात बसणें हें जीवनाचें वर्णन नव्हे. जीवनांत दुःखाप्रमाणे आनंदहि आहे आणि प्रत्येक ल्हान सहान गोष्टींतून आनंद शोधून काढून, कष्टांत व दुःखांत आनंदाचे जीवन जगणारे जगांत कोणी नाहीत असेंहि नाही. उमलणारी फुलाची कळी, हसरें लेकरू, उड्या मारणारें कोकरू आणि पाडस, सूर्याच्या अस्तोदयाचे रंगीबेरंगी गालीचे, खळखळ वाहणारें पाणी, गाणारे पक्षी आणि आईची प्रेमळ दृष्टि, आणि लक्षावधि अशा संसारांतल्या बारीक सारीक गोष्टींत आनंदमय देवाची अभिव्यक्ति आहे. आधीच ज्या जगांत भरपूर दुःख आहे त्या जगांत पुन्हा आणखी काल्पनिक दुःख घालण्याची गरज नाही, आणि जीवन कष्टमय करण्याची आवश्यकता बिलकुल नाही.

अशा प्रकारचें लिखाण लिहिणारे आपण वास्तववादी असल्याचा दावा सांगतात. जगांत दुःख आहे तसें आम्ही चितारून दाखवितों असें ते म्हणतात. परंतु ते चितारीत असलेलें चित्र जितकें वास्तववादी असेल तितकेंच आनंदाने जगणाऱ्या, इतरांकरिता क्लेश सोसणाऱ्या आणि त्यांत आनंद मानणाऱ्या परोपकारी थोर व्यक्तींचें जीवनहि वास्तवास धरून आहे. किंबहुना त्यांच्या जीवनांतल्या वास्तवांत अधिक पावित्र्य आहे. स्वार्थाकरिता जगून तो साधत नाही म्हणून शोक करण्यापेक्षा परार्थाकरिता कष्ट करून त्या कष्टांतच आनंद पाहणाऱ्याचें जीवन खचित् अधिक उदात्त आणि पवित्र आहे. कबीर म्हणतात, "कोई तनदुखी, कोई मनदुखी, कोई धनबिन रहत उदास। थोडे थोडे सबही दुखी, सुखी हरीका दास," हरी का दास म्हणजे विश्वाचा संसार चालविण्याकरिता कष्ट करून परमेश्वराच्या उत्क्रान्ति-संकल्पाला मदत करणारा आणि त्या कष्टांत आनंद व धन्यता मानणारा.

एकांगी दृष्टिकोणामुळे वाङ्मयाला विसंगत वळण लागत आहे

पाश्चात्यांच्या संपर्कामुळे त्यांच्या जीवनदृष्टी आत्मसात करून आम्ही आता वाङ्मय निर्माण करूं लागलों आहोंत. त्या दृष्टी ज्यांना पटत असतील त्यांनी त्या दृष्टीने वाङ्मय लिहावें हें सरळ आहे.

परंतु नडतें तें इथे की, हें सर्व एकांगी सुरू आहे. तुलनात्मक अभ्यास करून आमच्या संस्कृतींतील जीवनाचीं मूलतत्त्वें समजून घेऊन, तुलनात्मक दृष्टीने अभ्यास केल्यानंतर, पाश्चात्यांच्याच जीवनाच्या दृष्टी ज्यांना पटल्या असतील त्यांच्याविषयी कांहीहि म्हणणें नाही. आमच्या जीवनपद्धतीचा व त्या पद्धतीच्या आधारभूत तत्त्वांचा खोल अभ्यास केल्यावर पाश्चात्यांच्या एका जन्ममरणाच्या टीचभर कालावर अवलंबून ठरविलेलीं जीवनमूल्यें कोणास पटतील असें वाटत नाही. परंतु अशा प्रकारच्या तुलनात्मक अभ्यासाचा बहुधा अभाव आहे, असें दिसून येतें. एकाच दृष्टीचा अभ्यास म्हणजे तुलनात्मक अभ्यास नव्हे आणि तोहि अभ्यास पूर्णतया नसल्यास परिणामीं सत्यदृष्टि उत्पन्न होणें शक्य नाही. केवळ पाश्चात्यांच्या जीवनदृष्टीचा विचार करून आमच्या संस्कृतींतील आकरग्रंथांना व त्यांतील विचारांना विमुख राहून लिखाण करणें हिंदुस्थानच्या भावी उत्कर्षाच्या दृष्टीने कितीसें हितावह ठरेल ह्याचा, हल्ली होत आहे यापेक्षा, अधिक विचार व्हावयास पाहिजे असें वाटतें. मी आल्पस् पर्वतांत प्रवास केला, पण हिमालय पाहिला नाही; [फ्रान्समधलें] नॉत्रदाम् पाहिलें, पण बदरीनाथाची यात्रा केली नाही आणि इटलीमधलें व्हेटिकन् पाहिलें, पण मदुरा, श्रीरंगम् आणि रामेश्वर पाहिलें नाही, असें म्हणणाऱ्या हिंदुस्थानी मनुष्याविषयी आपणास काय वाटेल ? फ्रॉईड वाचला, परंतु योगेश्वर पतंजलीने लिहिलेलें मानसशास्त्र वाचलें नाही; हेगल्चा Being आणि Becomingचा वाद वाचला व आइन्स्टाइनचा सापेक्षवाद पाठ आहे, परंतु आचार्यांचा अध्यासवाद माहीत नाही, आणि मोपॉसाँच्या लघुकथा वाचल्या पण विष्णुगुप्ताचें पंचतंत्र माहीत नाही, शेक्सपिअरचें हॅम्लेट वाचलें, परंतु उत्तररामचरिताचा संपर्क नाही, बायबल अभ्यासिलें, पण ज्ञानेश्वरी पाहिली नाही, अशा सारखी परिस्थिति पुष्कळशी दिसते. त्यामुळे वाङ्मयाला हल्ली एकदेशीय आणि आमच्या संस्कृतीस विसंगत असें वळण लागत चाललें आहे की नाही ह्याचा आपण खोल विचार केला पाहिजे.

शासन साहित्य परिषदेच्या विद्यमानें मी जीं 'साहित्याची प्रेरणा, पद्धति व ध्येय' यांसंबंधीं चार व्याख्यानें दिलीं त्यांतून व आपल्यासमोर मी जें निवेदन करीत आहे त्यांतून व्यक्तींचा उल्लेख किंवा व्यक्तीचा दुरूनहि अंगुलिनिर्देश मी शक्य तितका टाळला आहे. कारण अशा निर्देशामुळे अप्रस्तुत वाद माजण्याचा आणि अकारण गैरसमज होण्याचा पुष्कळ संभव असतो. तथापि मी जें सांगण्याचा यत्न करीत आहे त्याचें उदाहरण म्हणून केवळ माझ्या म्हणण्याच्या स्पष्टीकरणार्थ मी येथे एकदोन उल्लेख करतों. त्याची आपण क्षमा कराल अशी मला आशा आहे.

अनुक्रमणिका

(१४)

एकांगी विचारपद्धतीने लिहिलेल्या उद्वेगजनक गोष्टी

एका प्रतिष्ठित मासिकांतून नुकती एक गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. तिचा आशय असा— धाकटया भावाने वडील भावाच्या बायकोस म्हणजे आपल्या मातृतुल्य वहिनीस भ्रष्ट केलें आणि ती पूर्ण कह्यांत आल्यानंतर तिला असें सांगितलें की माझ्या वडील भावाचें आणि माझें वितुष्ट असल्यामुळे त्याच्यावर सूड घेण्याकरिता तुझ्याशीं हा व्यवहार केला आणि त्या सूडाची पूर्ति म्हणूनच आता मी तुझा त्याग करतों. तुझ्याविषयी मला प्रेम होतें म्हणून हा व्यवहार घडला ह्या भ्रमांत तूं राहूं नकोस. संपलें. पुढे त्या बिचारीचें व त्या भावाचें काय झालें, तें लेखक जाणे की देव जाणे. (लेखकाच्या हिशेबीं देव असल्यास.) प्रथितयश साहित्यिकाने लिहिलेली ही एक गोष्ट. ह्यापासून समाजाने काय बोध घ्यायचा? हा वास्तववादहि नाही आणि वास्तववाद असेल तर तो जगापुढे ठेऊन काय मिळविलें? केवळ करमणुकीकरिता ही गोष्ट लिहिली असेल तर अशा गोष्टीमुळे ज्या मनाची करमणूक होते त्या मनाच्या उन्नतीची पातळी कोणती? अशा मनाला अधिक उन्नत करण्याचा यत्न व्हावा, की त्याला नैतिक घसरगुंडी वरून खाली ढकलण्याकरिता धक्का देण्यांत यावा! दुसरी एक गोष्ट सांगतों. दुसऱ्या एका फार प्रतिष्ठित मासिकांतून अगदी परवा अशी एक गोष्ट प्रसिद्ध झाली आहे की, एका बाईला अकारण क्रूरपणें लहान मुलांचा प्राण घेण्याची सवय होती. पाळण्यांतल्या पाळण्यांत तीन अर्भकांचा तिने अशा तऱ्हेने प्राण घेतला आणि शेवटच्या गुन्ह्याकरिता तिची कोर्टांत चौकशी झाली तेव्हा पुराव्याच्या अभावीं ती सुटली. परंतु एका डॉक्टरने त्या बाईवर मेस्मेरिझम्‌चा प्रयोग करून तिच्याकडून सत्य वदविलें. गोष्ट संपली. जगांत अशीं क्रूर माणसें असतात, एवढेंच सांगण्याचा ह्या गोष्टीचा उद्देश आहे काय, आणि असेल तर त्यापासून लाभ काय! प्रत्यहीं जगामध्ये अमानुष क्रूर कृत्यें घडतात एवढी गोष्ट पुरेशी उद्वेगजनक नाही, म्हणून त्या उद्वेगांत काल्पनिक भर घालावयाचा यत्न आहे काय? की न्यायालयांमध्ये न्याय मिळत नाही एवढेंच लोकांस सांगावयाचें! मला या गोष्टीवर फ्राईडच्या मनोविश्लेषणाची स्पष्ट छाया दिसते. इड् व लिबिडो या गोष्टी मागे डोकावतात. असें असेल तर त्या तत्त्वज्ञानाच्या समर्थनार्थ मी गोष्ट लिहिली आहे असें जगास लेखकाने स्पष्ट कां सांगूं नये? ही गोष्ट अवतरित आहे. अर्थात् पाश्चात्य संग्रहांतून घेतली असली पाहिजे. मी हीं एकदोन उदाहरणें माझ्या म्हणण्याच्या स्पष्टीकरणार्थ म्हणून दिलीं आहेत. कोणाचाहि अधिक्षेप करण्याच्या बुद्धीने दिलेलीं नाहीत. सर्वच कथा अशा हिणकस असतात असेंहि माझें म्हणणें नाही. परंतु बरेंचसें लिखाण ह्या वळणाचें असून त्याची उत्तरोत्तर वाढ होत आहे हें जर खरें असेल तर तें आजच्या आणि पुढच्या पिढीच्या हिताचें नाही असें वाटतें.

अनुक्रमणिका

तुलनात्मक अध्ययनावरील आक्षेप व त्यास उत्तर

यावर आक्षेप असा कदाचित् घेण्यांत येईल की सर्वच तुलनात्मक अध्ययन करणें सर्वांसच शक्य नाही. आणि असाच आग्रह धरल्यास लिखाणाची सीमा फार संकुचित होऊन कदाचित ती पूज्यावरहि येण्याचा संभव आहे. जो तो आपापल्या परिस्थितीप्रमाणे आणि मनोरचनेप्रमाणे जगाकडे पाहतो आणि त्यास पटेल, रुचेल तें लिहितो व बोलतो. शिक्षणक्षेत्रांत ख्यातनाम असलेल्या एका महाशयांनी नुकताच विद्यार्थ्यांस असा आदेश दिला की, तुमच्या बुद्धीस जें पटत नाही तें ग्रहण करूं नका. सदर्हु महाशयांच्या व्याख्यानाचें वर्तमानपत्रांत आलेल्या उल्लेखावरून मी हें विधान केलें आहे.

आता आपण वरील आक्षेपाचा आणि विधानाचा एकत्र विचार करूं.

हा आक्षेप आणि हें विधान एका विशिष्ट सीमेपर्यंत खरें असलें तरी त्यास एक पुष्टि जोडल्याखेरीज तें पूर्ण होत नाही.

मनुष्याच्या चेहऱ्याचें एक स्वरूप निश्चित ठरलेलें असलें तरी प्रत्येकाच्या चेहऱ्याच्या ठेवणींत त्यांतील अवयवांचें प्रमाण भिन्न असतें आणि म्हणूनच प्रत्येक चेहरा दुसऱ्याहून निराळा असतो आणि तो ओळखण्याचें साधन हेंच आहे. सगळेच चेहरे सारखे असते तर जगांत केवढा घोटाळा झाला असता, ह्याची कल्पना करणें कठीण नाही. कांही चेहऱ्यांत साम्य असल्यामुळे कसे घोटाळे होतात याविषयीं पूर्वी उल्लेख केलाच आहे. जसें चेहऱ्याचें तसेंच आपल्या मनाचें. मनुष्याच्या मनाचा एक विशिष्ट घाट ठरलेला असला तरी प्रत्येकाच्या मनाचे घटक व गुणधर्म ह्यांचें प्रमाण सारखें असणें शक्य नाही. असें असल्यामुळे भोवतालचें जग समजून घेण्याची पात्रता प्रत्येक मनाची निरनिराळी आहे. आणि प्रत्येकजण हें जग आपल्या कुवतीप्रमाणे समजून घेतो हें उघड आहे. प्रत्येकजण आपल्या परिस्थितीनुरूप जगाकडे पाहतो आणि त्याला आकलन होईल तेवढेंच खरें आणि त्याचप्रमाणे त्याने वागावें हें म्हणत असतांना सर्वज्ञतेचा आवेश न आणतां चुकीचा संभव गृहीत धरूनच प्रत्येकाने लिहिलें अगर बोललें पाहिजे असें सिद्ध होतें. त्याऐवजीं प्रत्येकाचा अभिनिवेश असा दिसतो की जणू कांही त्याच्या मताप्रमाणे जग वागेल तरच तरेल, नाही तर अधोगतीस जाईल. हा अभिनिवेश चुकीचा आहे. ज्याच्या बुद्धीस जें पटेल तेवढेंच खरें धरून जर सगळे वागतील, तर त्यांच्यापेक्षा अधिक उन्नत व विचारवंतांच्या अनुभवाला ते मुकतील हें उघडच आहे.

त्यांतून थोडया विचाराअंतीं आपणास असें आढळून येईल की बहुसंख्य लेखक कदाचित् शेंकडा ९०, आणि हें प्रमाण अधिक ठरल्यास नवल नाही, दुसऱ्या कोणाचे तरी विचार बोलून

लिहून दाखवीत असतात आणि त्यांस ते विचार स्वतःस पटलेसे वाटल्याकारणानें स्वतःचेच वाटूं लागतात, आणि खऱ्या आवेशापेक्षा हा उसना आवेश बराच अधिक तीव्र असतो.

आजचे लेखक एकदेशीय सत्य सांगत असतात

अशा परिस्थितींत स्वतःला पटलेलें म्हणजे दुसऱ्याचें खरें वाटत असलेलें एवढाच त्याचा अर्थ होतो. त्यांत लेखकाचें स्वतःचें असें अवाक्षर नसतें. मी एक आपल्याला दुसरें उदाहरण देऊन हें अधिक स्पष्ट करूं इच्छितों. प्रत्येक पक्षी त्याच्या पंखांत असलेल्या शक्तीप्रमाणे उडत असला तरी त्याहीवर अनंत आकाश पसरलेलें आहे, हें त्याने लक्षांत ठेवलें पाहिजे; आणि त्याची उडण्याची सीमा ही जशी आकाशाची सीमा नव्हे, त्याचप्रमाणे प्रत्येक मनाच्या विचाराची पोच ही सत्याची सीमा नव्हे हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. आणि प्रत्येक मनुष्य केवळ आपल्या बुद्धीवर विसंबून राहील तर त्याच्या सत्य-दृष्टीची सीमा संकुचितच राहील हें उघड आहे. मला दिसतें तेवढेंच क्षितिज व तेवढाच जगाचा विस्तार आहे असें प्रत्येकाने म्हटल्यास कोणाचें जग १० यार्ड परिघाचें तर कोणाचें १० मैल परिघाचें असेल व प्रत्येकजण आपल्या जगास संपूर्ण जग म्हणूं लागला तर जसे वाद माजतील, व टेलिस्कोप ज्याच्याजवळ आहे तो सर्वांच्याच मतें मूर्खांत काढला जाईल, तसें आज प्रत्येकाने पटेल तेवढेंच मानावें या तत्त्वाने होईल. वरील आक्षेपांत नमूद केल्याप्रमाणे सर्वांस सारखीच विस्तृत दृष्टि येणें शक्य नाही असें म्हटल्यानंतर, आणि प्रत्येकाने आपापल्या बुद्धीप्रमाणेच सत्य बोलावें असें गृहीत धरल्यानंतर; आपण एकदेशीय प्रादेशिक सत्य वा असत्य बोलत आहों हें प्रत्येकाने सदा लक्षांत ठेवलें पाहिजे. मी जगत्कल्याणाचें परमसत्य बोलतों असें म्हणणाऱ्याचा असामान्य, अत्यंत उच्च अधिकार असला पाहिजे यांत संशय नाही. आणि त्यास असामांन्य म्हणावयाचें कारण तसें म्हणणें सामान्यास शक्यच नाही.

आपल्या चुकीचा संभव गृहीत धरून, आपल्या बुद्धीचा पोच व विस्तार ओळखून जो बोलतो व लिहितो तो परमतसहिष्णु होतो, आणि "बहूनामेमि प्रथमः बहूनामेमि मध्यमः" असें तो ओळखतो आणि गर्वहीन होतो आणि आपण प्रतिपादिलेल्या मतानुसरणावर जगताचें कल्याण आहे, समाजाचें कल्याण आहे, ही भाषा त्याच्या तोंडीं येत नाही. सारख्या बदलत्या कल्पना (Theories) बोलणारांनी हें लक्षांत ठेविल्यास हल्लीच्या लिखाणांतील पुष्कळसे आक्षेपार्ह भाग वजा होतील असें वाटतें.

बुद्धीचें माध्यम मागे टाकून एकत्वप्रतिपत्तीने विश्वाशीं समरस होऊन सत्याचा अनुभव घेतल्यानंतर "आधी केलें मग सांगितलें" अशी छातीठोकपणे सत्याची ग्वाही देणारे, अमर कीर्तीचें

अनुक्रमणिका

धनी, विश्वाचें गूढ सांगणारे आमच्या सात्म्याच्या संस्कृतींत अनेक महापुरुष आहेत. त्यांची नामावलि मीच कशाला द्यायला पाहिजे! ते आपल्या परिचयाचे आहेत. ऋग्वेदकालीन श्री वशिष्ठ व विश्वामित्रापासून आज पृथ्वीवर संचार करून "I have attained" असें छातीठोकपणें निर्भयवाणीने बोलणाऱ्या श्री कृष्णमूर्तींपर्यंत विगतवार यादी केली तर ती वाचायला आयुष्याचा दिवस पुरणार नाही एवढी होईल. त्यांनी सात्म्याचें वाङ्मय, विश्वाशीं एकरूप होऊन जगदुद्धारार्थ लिहून ठेवलेलें आहे. कलहवादी माणसास तें उलगडत नाही, केवळ बुद्धिजीवी माणसास त्यांतील खोली आकलन होत नाही आणि समुद्रावरचे तरंग कितीहि मोजले मापले तरी ज्याप्रमाणे समुद्र म्हणजे काय हें कळत नाही त्याप्रमाणे कलहाचे हेलकावे खाणाऱ्याला कलहापलीकडे असलेल्या अनंताच्या समुद्रांत बुडी मारतां येत नाही.

कलह हा सात्म्यांत शिरण्याचें एक लहानसें द्वार आहे आणि मनुष्याचें जीवितसर्वस्व, विचारसर्वस्व आणि भावनासर्वस्व आणि अंतरात्म्याचा साक्षात्कार कलहांत नसून विश्वांतल्या नानात्वांत, एकत्व आणि सात्म्य पाहण्यांत आहे. परबुद्धि उसनी घेऊन आम्हाला आमच्या वाङ्मयांत विविधता आणतां येईल; परंतु ती समृद्धि नव्हे आणि या विविधतेकडे तिची किंमत लावून तेवढ्यापुरतेंच तिचें मोजमाप केलें पाहिजे. तें होत नाही असें कष्टाने म्हणावें लागतें.

जातां जातां शेवटीं हल्ली प्रचारांत येणाऱ्या भाषेसंबंधी मला चार शब्द सांगावेसे वाटतात. तेहि मोकळ्या मनाने सांगून टाकतों.

रूढ कल्पनांचा उपमर्द करणें म्हणजे नावीन्य नव्हे !

व्युत्पत्तिदृष्ट्या शब्दार्थ लक्षांत घेऊन, शब्द निवडून, निसून पुसून वापरले जात नाहीत असें दिसतें. कांही लिखाणांत ग्रामीणतेचा भास उत्पन्न करण्याकरिता किंवा मुद्दामच ओबड-धोबड शब्दांचे अपप्रयोग केलेले दिसतात व ओढूनताणून परकीय भाषेंतले शब्द वापरलेले असतात. त्यामुळे आमच्या परंपरागत कांही शब्दांना, पुष्कळ काळ ते शब्द एकाच विशिष्ट अर्थाने वापरले गेले असल्यामुळे जो एक त्यांभोवतीं ध्वन्यर्थ चिकटलेला असतो त्याची हानि होते. पोवाड्यांतून वगैरे जुन्या प्रकारची भाषा वापरली जाते तें ठीकच आहे. कारण नाटकांतील पात्रांना ज्याप्रमाणे तत्कालीन वेष द्यावे लागतात त्याप्रमाणे ज्या काळाचें वर्णन पोवाड्यांत असेल त्याकाळीं वापरल्या जाणाऱ्या शब्दांची योजना करणें अनुरूपच आहे. परंतु इतरत्रहि तशा प्रकारची भाषा वापरणें साहित्याच्या सौंदर्याच्या दृष्टीने इष्ट वाटत नाही. इंग्रजी शब्द

अनुक्रमणिका

मिसळून लिहिण्याची पद्धत तर आढळतेच, पण त्याहिबरोबर भाषेला खुमारी आणण्याच्या दृष्टीनें किंवा वैचित्र्य आणण्याच्या इच्छेनें उर्दू आणि पर्शियन शब्द अगदी अनाठायीं वापरलेले दिसतात. उदाहरणार्थ, हा मनुष्य कांही "औ़र" दिसतो. यांत और शब्दाचा काय अर्थ ? त्या शब्दानें वाक्याला सौंदर्य येतें की अर्थनिष्पत्ति वाढते ? हें शुद्ध मराठी वाढविण्याच्या दृष्टीनें अभिनंदनीय वाटत नाही. ग्रामीण ओबडधोबड भाषा वापरतांना असें म्हणतात की, खालच्या थरांतील लोकांना समजण्यांकरिता त्यांच्याच भाषेंत बोलणें अवश्य आहे. हेंहि मला तितकेंसें बरोबर वाटत नाही. अशा लोकांकरिता लिहिलेलें लिखाण त्यांना समजेल अशा सोप्या आणि शुद्ध भाषेंत लिहिणें शक्य आहे असें वाटतें; आणि त्याहि लोकांना थोडा अधिक शुद्ध व सरळ भाषेचा परिचय करून देणें त्यांच्याहि दृष्टीनें इष्टच आहे. स्फुट कवितांतून आणि दीर्घ काव्यांतूनहि ग्राम्य आणि अश्लील शब्द वापरलेले आढळतात. अश्लील आणि ग्राम्य शब्द निःशंकपणें वापरणें कांहींनी तर आपलें वैशिष्टय करून ठेवलें आहे. रूढ कल्पनांचा उपमर्द करणें म्हणजे नावीन्य उत्पन्न करणें आहे, असें त्याचें समर्थन केलें जातें. आणि ह्यांतच "Genius"चा प्रादुर्भाव दिसतो, असेंहि त्याचें क्वचित् समर्थन केलेलें आढळतें. ह्या सुजनांचें असें म्हणणें आहे की, स्वयंस्फूर्त बुद्धीचा महाकवि किंवा लेखक नेहमीच रूढ शब्दप्रचार सोडून बोलतो; रूढ कल्पनांवर आघात करतो आणि आपलें वैशिष्टय स्थापन करतो आणि तो तसें करीत असतांना जरी तो त्याच्या स्वतःच्या कालीं भोवतालच्या पुराणवादी लोकांच्या दृष्टीनं दोषार्ह ठरत असला तरी कालांतरानें तो क्रांतिकारकच ठरतो व ही क्रांति हितावह होती, असें कालांतरानें परिणामीं अनुभवास येतें. क्रांतिकारी नवा प्रचार रूढ करणारा महापुरुष त्याच्या भोवतालीं असलेलीं तत्कालीन बंधनें तोडून आपला स्वतंत्र मार्ग आखतो, ही गोष्ट जरी खरी असली तरी केवळ प्रचलित बंधनें तोडल्यानें, पूर्वींचे वाक्प्रचार पायाखाली तुडविल्यानें किंवा हीन उपमांचा सुळसुळाट केल्यानें मनुष्य मोठा युगप्रवर्तक होत नाही, हीहि गोष्ट खरीच आहे. मोठीं माणसें जसें करतात तसें आपणहि केलें म्हणजे आपणहि मोठे ठरूं, ही दुराशा आहे; आणि अशा प्रकारें मोठे ठरूं पाहणारे आणि युगप्रवर्तक म्हणविणारे खरोखरी तसे आहेत की नाही, हें वर्तमानकालींहि पारखून पाहणें विचारवंतांस कठीण नाही.

महापुरुषांसंबंधीं लिहितांना आदर व्यक्त करणारे शब्दप्रयोग वापरावे

तसेंच पाश्चात्यांच्या संपर्कामुळे आपणांस एकेरी प्रयोग करण्याची सवय लागली आहे. पूज्यपाद श्री शंकराचार्यासंबंधी बोलतांना "शंकर म्हणतो", "शंकराचें असें म्हणणें आहे", "शंकराचें म्हणणें चुकीचें आहे", वगैरे प्रयोग केलेले आढळतात. ह्यांच प्रकार इतर महापुरुषां-

संबंधीहि, अर्थात्, चालू आहेच. पाश्चात्यांच्या भाषेंत, निदान आपल्यास परिचित असलेल्या इंग्रजी भाषेंत, बहुमानार्थी अनेकवचन वापरण्याचा प्रघात नाही. त्यांचेजवळ ती कल्पनाच नाही. ते बहुमानार्थी विशेषणें वापरतात आणि त्यालाच जोडून तृतीयपुरुषी एकवचनी सर्वनामें वापरतात. पण असें करण्याचें आपल्यास कांहीच कारण नाही. वर उदाहरणादाखल दिलेल्या शब्दप्रयोगामुळे लेखकाच्या मनांत त्या त्या महापुरुषांविषयी विशेष आदर वसत नाही, असें तर व्यक्त होतेंच, परंतु असे एकेरी प्रयोग वारंवार करून ते रूढ केल्याकारणाने ते प्रयोग करणाऱ्याच्या मनांत आदरबुद्धि असली तरी ती हळूहळू कमी होते, आणि वाचकांच्या मनांत असलेली आदरबुद्धि त्यामुळे नाहीशी होण्याच्या मार्गास लागते. असें होणें राष्ट्राची सांस्कृतिक दृष्ट्या हानि आहे. ह्या महापुरुषांविषयी बोलत असतांना, मोठेपणाच्या दृष्टीने, उन्नतीच्या दृष्टीने व बुद्धिवैभवाच्या दृष्टीने त्यांच्यांत व आपल्यात बरेंच अंतर आहे, असें दर्शविणाऱ्या शब्दांचाच प्रयोग करणें उचित आहे. लोकमान्य टिळकांविषयी बोलत असतां किंवा गोपाळ कृष्ण गोखले यांच्यासंबंधी बोलत असतां, "टिळक म्हणतो", "गोखले म्हणतो", असा प्रयोग आपण करीत नाही. असें जर खरें, तर "शिवाजी म्हणतो", "शंकर म्हणतो", "वल्लभ म्हणतो", "निंबार्क म्हणतो", असे तरी प्रयोग कां करावेत हें लक्षांत येत नाही. मी आपलें लक्ष इकडे वेधूं इच्छितों, आणि आपल्यांतील महापुरुषांविषयी बोलत असतांना त्यांच्याविषयी नितान्त आदर व्यक्त करणारे शब्द वापरणेंच योग्य आहे व आपल्या संस्कृतीस धरून आहे, मग त्यांत थोडें वाचेस, किंवा लेखणीस परिश्रम झाले तरी हरकत नाही.

विदर्भाची थोर साहित्यिक परंपरा

गेल्या वर्षाच्या माझ्या अध्यक्षीय भाषणांत विदर्भाच्या थोर साहित्यिक परंपरेविषयीं मी जें सांगितलें त्याचा थोडा उल्लेख पुनश्च करणें अप्रस्तुत ठरणार नाही.

आपला विदर्भ फार प्राचीन प्रांत आहे. मला असें वाटतें की, इतक्या प्राचीन प्रांताचा उल्लेख आज इतर प्रांतांविषयीं फार क्वचित् सापडेल. बृहदारण्यक उपनिषदामध्ये कौंडिण्य शिष्याविषयी "वैदर्भि कौंडिण्यः" असा उल्लेख आहे. माझ्या स्मरणाप्रमाणे या उपनिषदांत विदर्भाविषयीं दोनदा उल्लेख आहे. यावरून या उपनिषत्कालींहि विदर्भ देश भरभराटींत होता व विद्यार्जनाविषयी तत्पर होता असें दिसतें. विदर्भाचा महाभारतांत उल्लेख आहे हें आपणांस विदित आहेच. "मालविकाग्निमित्र" नाटकांत कालिदासाने विदर्भाचा उल्लेख केला आहे. रुक्मिणी, दमयंती, लोपामुद्रा, जिजाबाई ह्या प्रातःस्मरणीय सती साध्वी, आपल्या विदर्भांतूनच निर्माण झाल्या. रुक्मिणीचें हरण भगवान श्रीकृष्णांनी आमच्या अमरावतीस असलेल्या अंबेच्या देवालयापासूनच केलें अशी दंतकथा आहे. हल्ली चिखलदरा नांवाचा डोंगर प्रसिद्ध आहे त्याचें

अनुक्रमणिका

मूळचें नांव कीचकदरा आहे. कीचकाचा वध त्या ठिकाणीं झाला अशी आख्यायिका आहे. वैराट नांवाचें गाव अद्यापहि मेळघाटांत आहे. या प्रदेशाची वाङ्मयपरंपराहि फार थोर व प्राचीन आहे.

"वैदर्भी रीती" म्हणून प्रसिद्ध असलेली लेखनपद्धति आपल्या विदर्भाचीच ! कालिदासांनीहि या पद्धतीचा अवलंब केला आणि कालिदास हे सर्वोत्तम कवि मानले जाण्यास जीं कारणें आहेत, त्यांपैकी एक म्हणजे त्यांनी वैदर्भी रीतीचा आपल्या लिखाणांत उपयोग केला, हें आहे. भवभूतीहि आपल्या विदर्भांतलेच ! भवभूतींनी वैदर्भी रीतीचा उपयोग केलाच आणि इतरहि रीती वापरल्या हा त्यांचा विशेष आहे. त्यांच्या लेखनपद्धतीचा त्यांच्या उत्तररामचरित् या अमर नाटकांत उत्तम आविष्कार झाला आहे. भारवीने आपलें महाकाव्य अचलपुरास लिहिलें. मला अभिमानाने सांगावेसें वाटतें की माझाहि जन्म अचलपुरासच झाला आहे. माझ्या जन्मस्थळीं भारवीने काव्य लिहिलें असें म्हणतां न आलें तरी भारवीने ज्या ठिकाणीं आपलें महाकाव्य लिहिलें त्या ठिकाणीं माझा जन्म झाला एवढें तरी निर्विवादपणें म्हणतां येतें. या योगायोगाचा मला सहजच अभिमान वाटतो.

मराठीची जन्मभूमि आपला हा विदर्भच ! मराठीचे आद्यकवि मानले गेलेले मुकुंदराज आपल्या विदर्भांतले. खेर्डा या गांवीं त्यांची समाधि आहे. श्रीज्ञानेश्वर, श्रीसमर्थ व त्याचप्रमाणे मोठाल्या कवि व संतांनी ही भूमि भूषविली आहे. बालरामायण नांवाच्या आपल्या ग्रंथांत राजशेखराने या भूमीस 'सारस्वती जन्मभूः' असें म्हटलें आहे. श्रीज्ञानेश्वरांच्यानंतरहि संतांची व संतवाङ्मयाची परंपरा महानुभाव पंथाने चालू ठेवली आणि त्या पंथाचें प्रारंभी–प्रारंभींचें वाङ्मय आपल्या विदर्भांतच लिहिलें गेलें. त्यानंतरच्या काळांतहि देवनाथ, दयाळनाथ इत्यादि सर्वोत्तम काव्य लिहिणारे संतकवि आपल्या विदर्भांतच झाले. ही विद्वत्तेची आणि कवित्वाची परंपरा आधुनिक काळांतहि अखंड चालू आहे. कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, श्री. वीर वामनराव जोशी, श्री. ना. रा. बामणगांवकर, श्री. बा. वा. भोळे, श्री. नानासाहेब जोग, श्री. वि. रा हंबर्डे, असे नाटककार; कै. गो. अ. उर्फ दादासाहेब ओगले, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांसारखे पत्रकार; श्री. बा. सं. गडकरी, श्री. पु. य. देशपांडे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांसारखे कादंबरीकार; श्री. आ. रा. देशपांडे (अनिल), श्री. आनंदराव टेकाडे, श्री. ब. ग. उर्फ अण्णासाहेब खापर्डे, कै. कवि 'बी', श्री. गु. ह. देशपांडे, श्री. वा. ना. देशपांडे, प्रा. भ. श्री. पंडित, श्री. ना. घ. देशपांडे, प्रा. या. मु. पाठक यांसारखे कवि; श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख, यांसारखे समीक्षक; कै. या. मा. काळे; म. म. वा. वि. मिराशी, डॉ. य. खु. देशपांडे, कै. नीळकंठ बळवंत उर्फ बापूसाहेब भवाळकर, कै. ह. ना. नेने, प्रा. श्री. ना.

वनहट्टी, डॉ. वि. भि. कोलते, यांसारखे संशोधक; कै. विष्णु मोरेश्वर महाजनी, कै. दादासाहेब खापर्डे, विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दफ्तरी, लोकनायक डॉ. मा. श्री. अणे, डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. घुलेशास्त्री, प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, श्री. मा. ज. कानेटकर, श्री. बाळशास्त्री हरदास, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, डॉ. वा. ना. पंडित यांसारखे विद्वान् आपल्यां विदर्भांतच झाले व आहेत.

तसेंच, प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे, श्री. शं. बा. शास्त्री, प्रा. वा. कृ. चोरघडे, श्री. पु. भा. भावे, श्री. गो. रा. दोडके, प्रा. के. ज. पुरोहित (शांताराम) आणि श्री. ना. रा. शेंडे, श्री. शरच्चंद्र टोंगो, श्री. य. बा. शास्त्री, श्री. केशव केळकर, श्री. व्यं. नी. पंडित, सौ. इंदुमति शेवडे, श्री. वसंत वरखेडकर, यासारखे लघुकथाकार, लघुनिबंधकार व कादंबरीकार; प्रा. अ. ना. देशपांडे, श्री. वा. ना. देशपांडे, श्री. पां. ब. गाडगीळ यांसारखे समीक्षक व टीकाकार; श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध, श्री. द. चिं. सोमण, श्री. ना. ना. हूड, श्री. राजा बढे, श्री. नारायण गणेशपूरकर, श्री. मामा रामभजनी, आणि श्री. मा. नी. गलगलीकर, प्रा. म. ना. सरपटवार, प्रा. मा. ल. व्यवहारे, श्री. तु. ना. काटकर, श्री. म. म. देशपांडे, सौ. उषा लिमये, सौ. प्रमिला भागवत, सौ. अनुराधा परांडे, श्री. मा कृ. पारधी, श्री. वसंत वऱ्हाडपांडे, श्री. बाबा मोहोड, श्री. मधू वाबगावकर, श्री. वसंत निनावे, श्री. गणेश पाठक, श्री. भा. आ. पांढरीपांडे आदि कवि; श्री. ना. रा. शेंडे, श्री. पां. श्रा. गोरे, श्री. वि. वा. जोशी, यांसारखे लोकवाङ्मयाचे संशोधक व संकलनकार; श्री. दे. गो. लांडगे, डॉ. श्रीराम अत्तरदे, श्री. शं. गो. चट्टे, प्रा. सुरेश डोळके, प्रा. कृ. व्यं. पेशकार, यांसारखे संशोधक; श्री. वसंत वरखेडकर, श्री. पु. त्र्यं. दारव्हेकर, प्रा. मधुकर आष्टीकर, श्री. राम डोंके, यांसारखे नभोनाट्यकार; श्री. ज. रा. जोशीसारखे चरित्रकार; श्री. श्री. वि. गंधेसारखे व्यायामविषयक लेखक, श्री. म. अ. चान्सरकरसारखे अर्थशास्त्रज्ञ इत्यादि साहित्यिक मंडळी सर्वांच्या परिचयाची आहे. आज विदर्भात अनेक तरुण कवि, कथाकार, निबंधकार व पत्रकार पुढे येत आहेत. या तरुण साहित्यिकांचें लेखन कौतुकास्पद आहे.

ही वाङ्मयपरंपरा पुढे चालविली पाहिजे, व ती हल्लीच्या पिढीवर फार मोठी जबाबदारी आहे. ह्यानंतर वाङ्मयनिर्मिति डोळसपणेंच झाली पाहिजे. डोळसपणे म्हणजे आपल्या परंपरेला व संस्कृतीला धरून, पाश्चात्यांचें अनुकरण न करतां व्हावयास पाहिजे. असें होईल तरच वेदकालापासून चालत आलेली, विदर्भाची सरस्वती–सेवा अखंडित ठेवण्याची पुण्याई आपल्याला संपादन करतां येईल.

गेल्यां १९५४–५५ सालीं मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेतर्फे प्रा. सौ. कुसुमावती देशपांडे यांच्या "मराठी कादंबरी'' या समीक्षणात्मक ग्रंथाबद्दल, प्रा. अ. ना. देशपांडे यांच्या

"आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास" या ग्रंथाबद्दल, श्री. ना. रा. शेंडे यांच्या "लोकसाहित्य संपदा" या लोकवाङ्मयाच्या ग्रंथाबद्दल, डॉ. वि. भि. कोलते यांच्या "सह्याद्रि महात्म्य" या अप्रकाशित ग्रंथाच्या संपादनाबद्दल, सौ. वनमाला भवाळकर यांच्या "संसाराचा सारीपाट" ह्या नाटकाबद्दल आणि प्रा. वा. कृ. चोरघडे यांच्या 'प्रदीप' या कथासंग्रहाबद्दल व श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांच्या 'कल्पनेचा खेळ' या एकांकिका संग्रहाबद्दल पारितोषिकें देऊन त्यांचा गौरव करण्यांत आला. मी या सर्वांचें मन:पूर्वक अभिनंदन करतों.

माझे स्नेही व विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष डॉ. शं. दा. पेंडसे हे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवडून आल्याबद्दल मी त्यांचें अंत:करणपूर्वक अभिनंदन करणें हें माझें कर्तव्य आहे. डॉ. पेंडसे यांच्यासारख्या विद्वान् अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली पंढरपूरचें महाराष्ट्र साहित्य संमेलन पूर्णांशाने सफल होईल यांत संदेह नाही.

महामहोपाध्याय वा. वि. मिराशी हे आपल्या विदर्भातील पुराणइतिहास संशोधक आहेत. ह्यांनी गेलीं वीस वर्षें उपलब्ध ताम्रपटांचा आणि शिलालेखांचा सतत अभ्यास करून पुराणसंशोधन पुस्तकांच्या मालिकेंत फार मोठी भर घातलीं आहे. पुराणइतिहासाचा त्यांचा फार सखोल अभ्यास आहे आणि तत्कालीन गव्हर्मेंट ऑफ इंडियाने "Corpus Inscriptionum of Indicarum" या मालिकेंतील "Inscriptions of the Kalacluri Chedi Era" हें हल्ली प्रसिद्ध होत असलेला ग्रंथ लिहिण्याचें म. म. मिराशी यांच्यावर सोपवून त्यांचा बहुमान केला. अशा थोर योग्यतेचे विद्वान् आपल्या प्रांतास लाभावे हें प्रांताचें सुदैव होय. पूर्वी निर्दिष्ट केलेल्या सर्व लेखकांचे मी आपल्या वतीने अंत:करणपूर्वक अभिनंदन करतों आणि परमेश्वर त्यांचेकडून भारताची अशीच चिरकालीन सेवा घडवो अशी प्रार्थना करतों.

हल्लीच्या वाङ्मयासंबंधी मी माझे विचार आपल्या समोर विचारार्थ मांडले आहेत. तसें करीत असतां नामनिर्देश किंवा जेणेंकरून विशिष्ट व्यक्तींचा बोध होईल अशीं वर्णनें मी उद्देशत: गाळलीं आहेत. मी थोडया वेळापूर्वी म्हटल्याप्रमाणे त्यांचा उपयोग होत नाही व वाद मात्र माजतो. थोडी मोकळ्या मनाने आपल्या समक्ष केलेली ही चर्चा आणि मांडलेले हे विचार आपणा सर्वांस सारखेच संमत होतील अशीहि माझी अपेक्षा नाही. तथापि आपण त्यांचा कृपा करून विचार करावा एवढीच माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

आपण कृपा करून माझें हें भाषण शांतपणें ऐकून घेतलें याबद्दल मी आपला फार आभारी आहें.

जय-भारत

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाट्यगृह बांधणें.

२. वि सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रातिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें.

मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. * सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे यांनी वि. सा. संघाकरितां नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर येथे मुद्रित करून संघ-कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १ येथे प्रकाशित केलें.